कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ६ जून २०२६

किंमत ४₹

## भीषण अपघातात सायकलस्वार ठार

**रेवदंडा :** रेवदंडा-साळाव पुलावर गुरुवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात एका सायकलस्वाराचा मृत्यू झाला. भरधाव वेगाने आलेल्या मोटारसायकलने मागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला.मिळालेल्या माहितीनुसार, गणेश मिणमिणे (४१, रा. साळाव) हे सायकलवरून जात असताना रेवदंडा बाजूकडून साळावच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या मोटारसायकलने त्यांना मागून जोरदार धडक दिली. हा अपघात रात्री सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास घडला. धडक इतकी भीषण होती की, गणेश मिणमिणे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना तातडीने अलिबाग शासकीय रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, पान २ वर

## महावितरणच्या अधिकाऱ्याला धमकी

**पाली :** स्मार्ट मीटर बसवल्याच्या कारणावरून महावितरणचे उपकार्यकारी अभियंता बालाजी चात्रे यांना अडवून कॉलर पकडत जीवे मारण्याची व हात-पाय तोडण्याची धमकी दिल्याप्रकरणी पाली पोलिसांनी पेडली येथील राम पवार आणि दिनेश पवार या पिता-पुत्रांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महावितरणकडून आरडीएसएस योजनेअंतर्गत जुने वीजमीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू आहे. याच कामादरम्यान मीटर बदलल्याचा राग मनात धरून संबंधित पिता-पुत्रांनी अधिकाऱ्यांना रस्त्यात अडवून धमकावल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच शासकीय कामात अडथळा आणल्याचा ठपकाही पान २ वर

### वेधक

## मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार

**नवी दिल्ली :** मणिपूरमधील हिंसाचार पुन्हा एकदा उफाळून आला असून कांगपोकपी जिल्ह्यातील एका गावावर सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या हल्ल्यात एका महिलेसह तिघांचा मृत्यू झाला. हल्लेखोरांनी अनेक मिनिटे गोळीबार केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले, तर किमान सात घरे आगीत जळून खाक झाली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी पहाटे सुमारे चार वाजण्याच्या सुमारास सैतू-गामफाझोल उपविभागातील लोइबोल खुल्लेन या गावावर सशस्त्र हल्लेखोरांनी हल्ला चढवला. प्रतिस्पर्धी गटांमध्ये झालेल्या गोळीबारामुळे ग्रामस्थांनी जीव वाचवण्यासाठी जवळच्या जंगलांमध्ये आश्रय घेतला. या घटनेत लेटखोंगाम हाओकिप, टिनमेरी हाओकिप आणि जांगमिनलाल हाओकिप यांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका महिलेचाही समावेश आहे.

# मच्छिमार संस्था संकटात

### डिझेलच्या अतिरिक्त दरवाढीचा फटका

### युद्धाचे कारण सांगून डिझेलच्या दरामध्ये भरमसाठ वाढ

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

युद्धजन्य परिस्थितीचे कारण पुढे करत डिझेलच्या दरात करण्यात आलेल्या भरमसाठ वाढीमुळे रायगड जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्था अभूतपूर्व आर्थिक संकटात सापडल्या आहेत. खासगी पंपावर ९२ ते ९४ रुपये प्रतिलीटर दराने मिळणारे डिझेल मच्छिमार संस्थांना तब्बल १५३ रुपये प्रतिलीटर दराने खरेदी करावे लागत असल्याने संस्थांचा आर्थिक गाडा विस्कळीत झाला आहे. ना नफा, ना तोटा या तत्त्वावर चालणाऱ्या संस्थांचे व्यवहार ठप्प होण्याच्या मार्गावर असून, अनेक संस्थांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून डिझेल दरवाढ मागे घ्यावी, अन्यथा मच्छिमार क्षेत्राला मोठा फटका बसण्याची भीती रायगड जिल्हा मच्छिमार सहकारी संघाने व्यक्त केली आहे.



रायगड जिल्हा मच्छिमार सहकारी संघाचे अध्यक्ष प्रल्हाद पाटील व उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी ही गंभीर बाब मांडत शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार शरद पवार यांना निवेदन दिले आहे.

प्रल्हाद पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, रायगड जिल्ह्यात ४० मच्छिमार सहकारी संस्थांकडे डिझेल पंप आहेत. या संस्थांमार्फत १ हजार ९६१ मासेमारी नौकांना डिझेल पुरवठा केला जातो. शासनाकडून या संस्थांना वर्षाकाठी सुमारे ४७ हजार ८४० किलोलीटर डिझेलचा कोटा मंजूर आहे. समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या मच्छिमारांना सवलतीच्या दरात डिझेल उपलब्ध करून देण्याची जबाबदारी या संस्थांवर आहे.

> शासनाच्या धोरणांमुळे पारंपरिक मच्छिमार आणि त्यांच्या संस्था अडचणीत सापडल्या आहेत. राज्य शासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन मच्छिमार संस्थांना आर्थिक दिलासा द्यावा, अन्यथा किनारपट्टीवरील हजारो मच्छिमार कुटुंबांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होईल. शेतकरी कामगार पक्ष मच्छिमारांच्या न्याय्य मागण्यांसाठी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे.
>
> – जयंत पाटील, सरचिटणीस, शेतकरी कामगार पक्ष

मासेमारी हा कृषी क्षेत्राशी निगडित व्यवसाय असून, हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह त्यावर अवलंबून आहे. शिवाय, मासेमारीतून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळवून पान २ वर

#### मच्छिमारांचे साकडे!

मच्छिमार सहकारी संस्थांवरील आर्थिक संकट दिवसेंदिवस गडद होत असल्याने या प्रश्नात तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खा. शरद पवार आणि शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्याकडे केली आहे. डिझेल दरवाढ, घटते कमिशन आणि वाढता आर्थिक भार यामुळे अनेक संस्था अडचणीत सापडल्या असून, शासन स्तरावर दिलासा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे साकडे मच्छिमारांनी घातले आहे.

## आज रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा

### शिवभक्तांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा ऐतिहासिक सोहळा शनिवारी (दि. ६) किल्ले रायगडावर मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो शिवभक्त रायगडावर दाखल होणार असल्याने त्यांच्या सुरक्षेसह आरोग्याच्या दृष्टीने पोलीस प्रशासन आणि आरोग्य विभागाने कंबर कसली



आहे. सुमारे दीड हजार पोलीस अधिकारी व कर्मचारी, होमगार्ड जवान, स्वयंसेवक तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी पान २ वर

#### शिवभक्तांच्या सेवेसाठी ७५ एसटी बसेस

शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या रायगड विभागाकडून विशेष बससेवा सुरू करण्यात आली आहे. शुक्रवारी ७५ बसेस सोडण्यात आल्या असून, शनिवारीही आणखी ७५ बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. शिवभक्तांची ने-आण सुरळीत व्हावी यासाठी महाड, रोहा, श्रीवर्धन आणि माणगाव आगारांतून या बसेस सोडण्यात येणार असल्याची माहिती एसटी प्रशासनाने दिली आहे.

## ..तोपर्यंत पाकला पाणी देणार नाही!

**नवी दिल्ली :** गतवर्षी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबतचा सिंधू पाणी करार स्थगित केला होता. तसेच भारतातून सिंधू नदीमधून पाकिस्तानमध्ये वाहून जाणारे पाणी रोखण्याचा निर्णय घेतला होता. दरम्यान, भारतातून पाकिस्तानात जाणाऱ्या पाण्याबाबत आज परराष्ट्र मंत्रालयाने परखड भूमिका मांडली आहे. जोपर्यंत पाकिस्तान दहशतवादाला संपुष्टात आणत नाही, तोपर्यंत पाकिस्तानला पाणी मिळणार नाही, असे भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तानने सिंधू पाणी कराराबाबत हल्लीच दिलेल्या विधानाचं खंडन केलं आहे. त्यावर त्यांनी स्पष्ट शब्दात खडसावले आहे.

## भाच्यांकडून मावशीचा खून

**रायगड/पोलादपूर | जिल्हा प्रतिनिधी |**

दागिने बळकावण्यासाठी वयोवृद्ध चुलत मावशीचे अपहरण करून भाच्यांनीच खून केला. ही घटना सारळ आदिवासीवाडी ते तिनविरादरम्यान घडली असून, पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह आंबेनळी घाटातील खोल दरीत फेकून दिल्याची कबुली आरोपींकडून देण्यात आली. आरोपींच्या कबुलीजबाबानंतर गुरुवार, दि. ४ जून रोजी तब्बल १०० फूट खोल दरीतून मृतदेह बाहेर काढण्यात आला. या घटनेने रायगड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी मांडवा पोलिसांनी दोघांना अटक केली असून, त्यांना न्यायालयात हजर केले असता मंगळवारपर्यंत त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.



- दागिन्यांच्या हव्यासापोटी गळा आवळून मारले
- बेपत्ता तक्रारीवरून मांडवा पोलिसांनी उलगडला गुन्हा
- दोन्ही आरोपींना ठोकल्या बेड्या

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुनंदा लक्ष्मण पाटील (८५) असे या वयोवृद्ध पान २ वर

#### आंबेनळी घाट पुन्हा चर्चेत

मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी आंबेनळी घाटाचा वापर झाल्याने हा घाट पुन्हा चर्चेत आला आहे. यापूर्वीही अशा अनेक गुन्ह्यांमध्ये मृतदेह घाटातील खोल दऱ्यांमध्ये फेकून दिल्याच्या घटना उघड झाल्या आहेत. त्यामुळे कशेडी आणि आंबेनळी घाट किल अँड थ्रोसाठी कुप्रसिद्ध होत असल्याची चर्चा पुन्हा रंगू लागली आहे.

## सर्व्हे नको, शेतकऱ्यांचा एल्गार!

**| उरण | प्रतिनिधी |**

तिसरी मुंबई प्रकल्पाविरोधात उरण, पनवेल, पेण, कर्जत आणि अलिबाग परिसरातील शेतकऱ्यांचा संताप आता टोकाला पोहोचला असून, सरकार आणि एमएमआरडीएविरोधातील संघर्ष अधिकच तीव्र बनला आहे. एकीकडे हजारो शेतकरी आपल्या जमिनी वाचविण्यासाठी रस्त्यावर उतरले आहेत.



- अधिकाऱ्यांना चिरनेरकरांनी हुसकावून लावले
- तिसरी मुंबईला कडाडून विरोध

एकीकडे येत्या रविवारी माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या ऐतिहासिक शेतकरी मेळाव्याची जय्यत तयारी सुरू असतानाच, दुसरीकडे शुक्रवारी सकाळी चिरनेर गावात जमिनीच्या सर्व्हेसाठी सरकारी अधिकारी दाखल झाल्याने संतप्त शेतकऱ्यांचा रोष अनावर झाला. ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना स्पष्ट शब्दांत विरोध दर्शवत तेथून हुसकावून लावले.

शेतकऱ्यांच्या मते, हा प्रकार म्हणजे आंदोलनाची धार बोथट करण्याचा आणि जनतेच्या भावना डिवचण्याचा सरकारचा आणखी एक प्रयत्न आहे.

भूसंपादनाच्या विरोधात हजारो हरकती दाखल झालेल्या असताना, त्या हरकतींवर साधी सुनावणी घेण्याचे सौजन्यही शासनाने दाखविलेले नाही. मात्र दुसरीकडे सर्व्हे, मोजणी आणि अन्य प्रशासकीय प्रक्रिया सुरू ठेवून शेतकऱ्यांच्या माथी प्रकल्प लादण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा गंभीर आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

तिसरी मुंबई प्रकल्पासाठी उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ महसुली गावे तसेच कर्जत व अलिबागमधील वाढीव ७४ महसुली गावे अशा एकूण १९८ गावांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे हजारो कुटुंबांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला असून, शेतकरी गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने संघर्ष करत आहेत.

भूसंपादनाविरोधात तब्बल २५ हजारांहून पान २ वर

## मुंडेंच्या रडारवर वडापाव विक्रेते

**मुंबई :** मुंबईतील एका प्रसिद्ध वडापाव विक्रेत्याकडून अन्न पॅक करण्यासाठी आणि वाढण्यासाठी वर्तमानपत्राचा वापर केला जात असल्याचे अलीकडेच निदर्शनास आल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी संयुक्तपणे कारवाई केली. छपाईच्या शाईमध्ये अनेक हानिकारक रंग, रंगद्रव्ये, बाइंडर्स आणि रसायने असतात, विशेषतः यात शिसे आणि इतर जड धातूंचा समावेश असतो, जे अन्नपदार्थांमध्ये उतरू शकतात आणि त्यामुळे आरोग्याच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे वडापावच्या पॅकिंगसाठी वृत्तपत्राचा कागद वापरू नये, असे आदेश दिले असून, वडापाव व्यावसायिक मुंढे यांच्या रडारवर आले आहेत.

## ४८ तासांत मान्सून महाराष्ट्रात

**| मुंबई | प्रतिनिधी |**

केरळ आणि गोव्यात धडक दिल्यानंतर मान्सून आता महाराष्ट्राच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. पुढील ४८ तासांत कोकणासह दक्षिण महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली असून, राज्यातील उकाड्याने त्रस्त नागरिकांना दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.

केरळमध्ये तीन दिवस उशिराने दाखल झालेला मान्सून आता वेगाने पुढे सरकत असून, शुक्रवारी गोव्यात पोहोचला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही मान्सून आगमनाची प्रतीक्षा संपण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील ४८ तासांत कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात मान्सून दाखल होण्यासाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे.

हवामान विभागाचे तज्ज्ञ प्रवीण कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, मान्सूनचा प्रवास यंदा काहीसा संथ असला तरी पुढील दोन दिवसांत तो महाराष्ट्रात प्रवेश करेल. राज्यात यंदाही मान्सून वेळेत पोहोचण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, सिंधुदुर्ग जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. कुडाळसह विविध भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळल्या. जिल्ह्यात १० ते २० मिलीमीटर पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे.

दुसरीकडे, परभणी जिल्ह्यातही मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. विजांचा पान २ वर

## ग्रामसभेलाच प्रशासकांची दांडी

### नेरळ ग्रामस्थ संतप्त; कारवाईची मागणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेरळ ग्रामपंचायतीची ग्रामसभा गुरुवारी आयोजित करण्यात आली होती. मात्र, ग्रामसभेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायतीचे प्रशासक सुजित धनगर हेच गैरहजर राहिल्याने ग्रामसभा रद्द करण्याची वेळ आली. त्यामुळे उपस्थित ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, प्रशासकांनी ग्रामस्थांची फसवणूक केल्याचा आरोप करत त्यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्यभर ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार



नेरळ ग्रामपंचायतीचीही ग्रामसभा बोलावण्यात आली होती. यासाठी आठ दिवसांपूर्वी अजेंडा प्रसिद्ध करून ग्रामस्थांना सूचना देण्यात आल्या होत्या. ग्रामसभा सुरू होण्यापूर्वीच मोठ्या संख्येने ग्रामस्थ ग्रामपंचायत कार्यालयातील सभागृहात दाखल झाले होते. कर्जत पंचायत समिती सदस्य भगवान चंचे तसेच माजी सदस्य सुगावेकर यांचीही उपस्थिती होती. ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले हे नियोजित वेळेत उपस्थित राहिले होते.

गेल्या काही महिन्यांपासून विविध कारणांमुळे तहकूब होत असलेल्या ग्रामसभेची ग्रामस्थ आतुरतेने वाट पाहात होते. सभेसाठी आवश्यक कोरमही पान २ वर

### मराठा आंदोलन

## मृतांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेल्या विविध आंदोलनांतील मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. आठ जिल्ह्यांतील ३४ व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी दहा लाख रुपयांप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

मराठा समाजाच्या मागण्यांसाठी राज्यातील विविध ठिकाणी झालेल्या आंदोलनांत एकूण ३०९ कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने या मृत व्यक्तींच्या वारसदारांसाठी २७ कोटी ५० लाख रुपये मंजूर केले आहेत. यापैकी ३४ व्यक्तींच्या कुटुंबांना मदत मिळणे अद्याप बाकी होते.

अंतरवाली सराटी येथील मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी मृतांच्या वारसदारांना दिल्या जाणाऱ्या मदतीचा प्रश्न उपस्थित केला होता. यासंदर्भात जलसंपदामंत्री कृष्णा व गोदावरी खोरे मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून उर्वरित वारसांना तातडीने मदत देण्याची ग्वाही दिली होती.

राज्य सरकारने मागील दोन दिवसांत केलेल्या कार्यवाहीमुळे विविध जिल्ह्यांतील पान २ वर

### प्लास्टिकमुक्तीसाठी नगरपरिषदेचा अभिनव उपक्रम | शुक्रवारी उत्साहात लोकार्पण

## अलिबाग स्थानकात 'बॉटल बीन'

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिकमुक्त अलिबाग घडविण्याच्या दिशेने अलिबाग नगरपरिषदेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. प्लास्टिक कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन आणि जनजागृती करण्याच्या उद्देशाने अलिबाग एसटी स्थानक परिसरात 'बॉटल बीन' बसविण्यात आली असून, तिचे लोकार्पण शुक्रवारी करण्यात आले.

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स (आरसीएफ) यांच्या सहकार्याने उपलब्ध करून देण्यात आलेल्या या बॉटल बीनचे उद्घाटन अलिबाग नगरपरिषदेचे वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक



यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आले.यावेळी उपनगराध्यक्षा अ‍ॅड. मानसी म्हात्रे, नगरसेविका अश्विनी ठोसर, नगरसेवक अनिल चोपडा, समीर ठाकूर, सागर भगत, अ‍ॅड. ऋषीकेश माळी, आनंद पाटील, जमाल सय्यद, अलिबाग एसटी आगाराचे व्यवस्थापक राकेश देवरे, आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी राकेश कवळे, योगेंद्र भोईर, सुरेश चौधरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

अलिबाग एसटी स्थानक हे जिल्ह्यातील महत्त्वाचे वाहतूक केंद्र असून, येथे दररोज मोठ्या संख्येने प्रवाशांची वर्दळ असते. परिणामी, स्थानक परिसरात प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, शीतपेयांच्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या, कागदी व प्लास्टिक वेष्टनांचा कचरा मोठ्या प्रमाणात साचत असल्याचे चित्र दिसून येते. या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अलिबाग नगरपरिषदेने हा उपक्रम हाती घेतला आहे. स्थानक परिसरात बसविण्यात आलेल्या बॉटल बीनमध्ये प्रवाशांनी वापरलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या व अन्य पुनर्वापरयोग्य प्लास्टिक कचरा टाकावा, यासाठी जनजागृतीही करण्यात येणार आहे. या माध्यमातून स्थानक परिसर स्वच्छ राहण्यास मदत होणार असून, प्लास्टिक कचऱ्याचे योग्य संकलन आणि विल्हेवाट लावणेही शक्य होणार आहे.

अलिबाग नगरपरिषदेच्या सहकार्याने आणि आरसीएफच्या सहभागातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले. पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनीही पुढाकार घेऊन स्थानक परिसरातील प्लास्टिक कचरा बॉटल बीनमध्येच टाकावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## रानवली धरण कोरडेठाक

### प्रशासकीय नाकर्तेपणामुळे श्रीवर्धनकरांवर पाणीसंकट

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

गेल्या वर्षी समाधानकारक पाऊस होऊनही श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणारे रानवली धरण ऐन उन्हाळ्यात कोरडे पडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. धरणातील पाण्याची गळती रोखण्यात आणि उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत असून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी धरणातील गळती रोखण्यासाठी तसेच पाणीसाठ्याचे नियोजन करण्यासाठी वेळोवेळी प्रशासनाकडे लेखी आणि तोंडी मागण्या केल्या होत्या. मात्र या सूचनांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप होत आहे. योग्य वेळी उपाययोजना केल्या असत्या तर धरणातील मोठ्या प्रमाणावर वाया जाणारे पाणी वाचवता आले असते आणि आज निर्माण झालेली पाणीटंचाई टाळता आली असती, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

धरणाच्या दुरुस्ती आणि देखभालीच्या कामात अनियमितता झाल्याचाही संशय व्यक्त केला जात आहे. संबंधित कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात असून, याप्रकरणी सखोल चौकशीची मागणी करण्यात येत आहे. पान २ वर

# दूषित पाण्याचा प्रश्न ऐरणीवर

## कामोठेवासियांसाठी नगरसेवकांचे महापालिकेला निवेदन; तातडीच्या उपाययोजनांची मागणी

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

कामोठे परिसरात सिडकोमार्फत होत असलेल्या दूषित व गढूळ पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी कामोठे परिसरातील नगरसेवकांनी महानगरपालिकेकडे केली आहे.



यासंदर्भात नगरसेवक विकास घरत, नगरसेवक रवींद्र जोशी, नगरसेवक प्रदीप भगत, नगरसेविका हेमलता गोवारी, नगरसेविका कुसुम म्हात्रे तसेच समाजसेवक भाऊ भगत यांनी पनवेल महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे विभागप्रमुख विलास चव्हाण यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

कामोठेतील विविध सेक्टरमध्ये गेल्या काही दिवसांपासून गढूळ व दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने प्राप्त होत आहेत. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. दूषित पाण्यामुळे आरोग्यविषयक समस्या उद्भवण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज असल्याचे शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले.

यावेळी महापालिकेने सिडको प्रशासनाशी समन्वय साधून पाणीपुरवठा व्यवस्थेवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवावे, पाण्याच्या गुणवत्तेची नियमित तपासणी करावी, नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत तसेच वितरण यंत्रणेची सखोल पाहणी करून दोषी कारणांचा शोध घेऊन तातडीने उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली.

कामोठेकरांना स्वच्छ, सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ देता कामा नये. या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करून नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवणार असल्याची भूमिका नगरसेवक विकास घरत यांनी यावेळी व्यक्त केली.

# ‘आदर्श’कडून मृत कर्जदाराच्या वारसांना दहा लाखांचा अपघात विमा प्रदान

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग येथील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या मृत सभासद-कर्जदाराच्या वारसांना न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीकडून दहा लाख रुपयांच्या अपघात विमा भरपाईचा धनादेश प्रदान करण्यात आला. पतसंस्थेच्या संजीवनी कर्ज योजनेंतर्गत घेतलेल्या कर्जावर हा विमा संरक्षण लाभ उपलब्ध करून देण्यात आला होता.



अलिबाग तालुक्यातील ढवर येथील रहिवासी रघुनाथ विष्णु पाटील यांनी आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेकडून संजीवनी योजनेतून ५० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जासोबत पतसंस्थेने न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीमार्फत त्यांचा अपघात विमा उतरविला होता. दरम्यान, सर्पदंशामुळे रघुनाथ पाटील यांचे दुर्दैवी निधन झाले.

त्यानंतर न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीने विमा दाव्याची पूर्तता करून १० लाख रुपयांची भरपाई मंजूर केली. या भरपाईचा धनादेश रघुनाथ पाटील यांच्या पत्नी रविना रघुनाथ पाटील, मुलगा आणि अन्य नातेवाईकांना आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात सुपूर्द करण्यात आला.

यावेळी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, अध्यक्ष अभिजित पाटील, तज्ज्ञ संचालक संजय राऊत, सहकार भारती सहकार प्रशिक्षणचे महामंत्री डॉ. उदय जोशी तसेच न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या डेप्युटी जनरल मॅनेजर शशिकला श्रीधरन, रिजनल मॅनेजर किशोर सूर्यवंशी, चीफ बिझनेस मॅनेजर किशोर पाटील आणि बिझनेस असोसिएट श्रीकांत शिंदे उपस्थित होते.

# एमएमआरडीएविरोधी लढ्यात काँग्रेस उतरणार

## विनोद म्हात्रे यांची घोषणा

। चिरनेर । प्रतिनिधी ।

एमएम आरडीएविरोधात उभ्या राहिलेल्या जनआंदोलनात काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीने सहभागी होणार असून, जनतेच्या हक्कांच्या लढ्यात खांद्याला खांदा लावून उभा राहील, अशी घोषणा माजी तालुका काँग्रेस अध्यक्ष विनोद म्हात्रे यांनी केली. महेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस कार्यकर्ते या संघर्षात सक्रिय सहभाग घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एमएमआरडीए संघर्ष समितीच्या वतीने ७ जून रोजी चिरनेर येथे माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संघर्ष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर विनोद म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. बैठकीत एमएमआरडीए प्रकल्पामुळे स्थानिक शेतकरी, भूमीपुत्र आणि नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या भीती व नाराजीवर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना विनोद म्हात्रे यांनी सरकारच्या विस्थापनवादी धोरणावर टीका करत जनतेच्या जमिनी आणि मालकी हक्क अबाधित राहिले पाहिजेत, असे मत व्यक्त केले. स्थानिकांच्या संमतीशिवाय कोणताही विकास प्रकल्प लादला जाऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. जनतेच्या भावना आणि मागण्यांचा विचार न करता प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला तीव्र विरोध केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. या बैठकीला अलंकार परदेशी, जिल्हा परिषद सदस्य अविनाश ठाकूर, विक्रांत पाटील, नितेश पाटील, राजेंद्र भगत, विनया पाटील, सारिका पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. येत्या ७ जूनच्या संघर्ष मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून जनतेच्या हक्कांच्या लढ्याला बळ द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# राजिप शाळा नवघरचे देदीप्यमान यश

- एनएमएमएस परीक्षेत चार विद्यार्थी उत्तीर्ण
- दोन विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती जाहीर

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

एनएमएमएस परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यात रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघरच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षेत शाळेतील एकूण चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, दोन विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता असते, हे त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.





उत्तीर्ण झालेल्या चार विद्यार्थ्यांपैकी सृष्टी गणेश अडसूळ व प्रचिती प्रल्हाद अडसूळ या दोन विद्यार्थिनींनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर थेट गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. गुणवत्ता यादीत नाव पटकावून या दोन्ही विद्यार्थिनींनी मानाची राष्ट्रीय शिष्यवृत्ती आपल्या नावे केली आहे. त्यांच्या या यशामुळे नवघर शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशात त्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका शीतल पाटील यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी केलेल्या अचूक व योग्य मार्गदर्शनामुळे आणि विद्यार्थ्यांनी घेतलेल्या अपार मेहनतीमुळेच हे कौतुकास्पद यश साध्य झाले असल्याचे बोलले जात आहे.

या ऐतिहासिक यशानंतर शाळा व्यवस्थापन समिती नवघर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद आणि ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष कौतुक केले आहे. याप्रसंगी पालकांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आदर्श शाळा नवघरने शिक्षणाचा दर्जा खऱ्या अर्थाने उंचावला असून, ही शाळा आता गुणवंत विद्यार्थी घडवण्याचे प्रमुख केंद्र बनली आहे.

या घवघवीत यशामुळे नवघर परिसराचे नाव संपूर्ण रायगड जिल्ह्यात उज्ज्वल झाले असून, आगामी काळात हे विद्यार्थी अधिक जोमाने प्रगती करतील, असा विश्वास सर्व स्तरांतून व्यक्त केला जात आहे.

# आपटा ग्रामपंचायतीची ग्रामसभा तहकूब

**आपटा** : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपटा ग्रामपंचायतीने गुरुवारी (दि. ५) विशेष ग्रामसभेचे आयोजन केले होते. मात्र, ग्रामस्थांनी सभेकडे पाठ फिरवल्याने आवश्यक गणसंख्या पूर्ण न झाल्यामुळे ही ग्रामसभा तहकूब करण्यात आली. ग्रामसभेसाठी ग्रामविकास अधिकारी, सरपंच, पत्रकार तसेच दोन महिला ग्रामस्थ उपस्थित होते. मात्र, इतर ग्रामस्थ अनुपस्थित राहिल्याने सभा घेणे शक्य झाले नाही. परिणामी, ग्रामपंचायत प्रशासनाला सभा तहकूब करण्याचा निर्णय घ्यावा लागला. दरम्यान, आपटा ग्रामपंचायतीत ग्रामसभा पूर्ण गणसंख्येसह पार पडण्याचे प्रमाण अत्यंत कमी असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे.

**जाहीर सूचना**

याद्वारे सर्वसामान्य जनतेला **सूचना** देण्यात येत आहे की, **किरण रघुनाथ मोहिते (आधार क्रं. ५६३७ २८५४ ८४८१ आणि पॅन: एआरएचपीएम ९३५५जे)** ज्यांचा पत्ता ६४१, राजनपाडा, आवास, रायगड, महाराष्ट्र ४०२२०१ आहे (“**मालक**”), हे खालील **अनुसूची**मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (“**मालमत्ता**”) विक्रीसाठी आमच्या अशिलांशी वाटाघाटी करत आहोत.

सर्व व्यक्ति/संस्था ज्यामध्ये इतरांबरोबरच कोणतिही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा प्राधिकरण ज्यांना सदर मालमत्ता किंवा त्याच्या कोणत्याही भाग/हिस्सा संदर्भात किंवा विरुद्ध कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दावा, आक्षेप, मागणी, भाग, हक्क, शीर्षक, हितसंबंध, लाभ असलेले विक्री, हस्तांतरण, बेचनपत्र, देवाण घेवाण, हक्क, शीर्षक, हितसंबंध, भाग, लाभ, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, भाडेकरार, पोट-भाडेकरार, लीव्ह अँण्ड लायसन्स, परवाना, धारणाधिकार, गहाण, तारण, भार, बोजा, मालकी हक्काच्या कागदपत्रांची ठेव, तारण, हक्क, नुकसान भरपाई, दावे, विभाजन, मुखत्यारपत्र, व्यवसाय, मृत्युपत्र, काळजीवाहक तत्त्वावर, करार, ट्रस्ट, वहिवाटीचा हक्क, देणगी, वारसा, लाभार्थ/र्थी, वारसा, वील, निर्वाह, ताबा, आरक्षण, प्रलंबित खटला, एफआर, एफएसआय, विकास मुक्तता, त्याग, किंवा कोणत्याही मार्गाने इतर कोणत्याही पध्दतीने कोणत्याही कौटुंबिक तजवीज / सेटलमेंट, खटला, करार, डीड, दस्तऐवज, लेखन, करार, हस्तांतरण दस्तऐवज, विकास हक्क, इरादापत्र, मृत्युपत्र, वसीयत, उत्तराधिकार, कोणत्याही न्यायलयचा हुकूम किंवा आदेश, कोणत्याही न्यायालयाच्या किंवा इतर कोणत्याही वैधानिक किंवा न्यायनिर्णायक प्राधिकरणाच्या निर्देशानुसार किंवा सरकार किंवा कोणत्याही संस्थेद्वारे केलेल्या अधिग्रहणामुळे, प्रतिबंध किंवा मालमत्तेसंबंधी इतर कोणत्याही अडथळयामुळे किंवा इतर कोणत्याही पध्दतीने किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, किंवा मालमत्तेसंबंधी कोणताही दावा, विवाद, याचिका, अपील किंवा इतर कार्यवाही आधीच दाखल केली असेल किंवा कोणतीही मागणी सूचना पाठवली असेल किंवा मालमत्ता, किंवा तिचा कोणताही भाग, कोणतेही करार, भागीदारी किंवा वाटप किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हुकूमनामा, निर्णय, निवाडा किंवा इतर आदेश मिळवला असेल त्यांनी याद्वारे कृपया लेखी स्वरुपात त्याची सूचना कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय पेनिन्सुला कॉर्पोरेट पार्क, युनिट क्र. ७०३ आणि ७०४, पिरामल टॉवर, गणपतराव कदम मार्ग, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०००१३ आणि ईमेलच्या स्वरुपाद्वारे **objections@dhavalvussonji.com**, आणि **roopali.gosar@dhavalvussonji.com**, येथे ह्या सूचनेच्या तारखेपासून **१४ (चौदा)** दिवसाचा आत सूचित करावे, अन्यथा, मालमत्तावरील किंवा तिच्या कोणत्याही भागावरील दावा किंवा दावे सर्व हेतूं आणि उद्देशासाठी सोडून देण्यात आले आहेत, वापरात नाहीत, त्याग केले आहेत, सोडले आहेत असे मानले जाईल.

**येथे उपरोक्त उल्लेखित अनुसूची**

जमीनीचे सर्व तुकडे आणि हिस्से ज्याचे गट क्र. १०२ क्षेत्रफळ ५३६० चौरस मीटर आणि ज्याचे जुना गट क्र. ५६५ (आणि त्यापूर्वी आवास गावाचा जुना सर्वेक्षण क्र. १३७/१) जे राजनपाडा गाव, तालुका अलिबाग, जिल्हा परिषद रायगड येथे स्थित आणि आवास ग्रामपंचायतीच्या हद्दीत आणि चतु:सीमा खालील प्रमाणे:

पूर्वेस किंवा पूर्वीकडे: राजनपाडा गावातील गट क्र. १३५ द्वारे;

पश्चिमेस किंवा पश्चिमेकडे: राजनपाडा गावातील गट क्र. ९९ आणि १०० द्वारे;

दक्षिनेस किंवा दक्षिणेकडे: राजनपाडा गावातील गट क्र. १०३ आणि ९४ द्वारे; आणि

उत्तरेस किंवा उत्तरेकडे: राजनपाडा गावातील गट क्र. १०१ आणि १०० द्वारे.

६ जून, २०२६ रोजी दिनांकित.

**रुपाली गोसर**
भागीदार
DV
**धवल वसनजी अँण्ड असोसिएट्स**
**अॅडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स**

पान १ वरून

## मच्छिमार संस्था संकटात

देत देशाच्या अर्थव्यवस्थेलाही हातभार लागतो. मात्र, शासनाने मच्छिमार सहकारी संस्थांची वर्गवारी आजही घाऊक ग्राहक (बल्क कन्झ्युमर) म्हणून कायम ठेवल्याने हा संपूर्ण प्रश्न निर्माण झाला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

१७ मार्चपासून डिझेलच्या दरात झालेल्या वाढीनंतर ऑईल कंपन्यांकडून मच्छिमार संस्थांना सुमारे १५३ रुपये प्रतिलीटर दराने डिझेल घ्यावे लागत आहे. दुसरीकडे खासगी पंपावर हेच डिझेल ९२ ते ९४ रुपये दराने उपलब्ध आहे. त्यामुळे प्रत्येक लीटरमागे ५० ते ६० रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार संस्थांवर पडत आहे.

या वाढीव दरामुळे मच्छिमार संस्थांमधील डिझेल पंपांवरून डिझेल खरेदी करणे मच्छिमारांना परवडेनासे झाले आहे. परिणामी, गेल्या अनेक दिवसांपासून अनेक संस्थांनी डिझेल खरेदीच केलेले नाही. त्यामुळे संस्थांचे आर्थिक व्यवहार जवळपास ठप्प झाले असून, भविष्यात अनेक संस्था बंद पडण्याची भीती व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, कर्नाटक राज्यात मच्छिमारांना व्हॅट वजा करून डिझेल उपलब्ध करून दिले जाते. गुजरातमध्येही पूर्वीप्रमाणेच डिझेल पंपाच्या दरात मच्छिमारांना डिझेल मिळत आहे. मग महाराष्ट्रातील मच्छिमारांनाच वेगळा न्याय का, असा सवाल प्रल्हाद पाटील यांनी उपस्थित केला आहे.

आधीच वारंवार येणारी वादळे, अवकाळी पाऊस, बदलते हवामान आणि घटते मासेमारी उत्पन्न यामुळे मच्छिमार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच डिझेल दरवाढीच्या नव्या संकटामुळे अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून डिझेल पुरवठा विस्कळीत झाल्याने झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी तसेच पूर्वीप्रमाणेच डिझेल दर लागू करावेत, अशी मागणी रायगड जिल्हा मच्छिमार सहकारी संघाने केली आहे.

या मागण्यांसाठी शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील तसेच राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांना निवेदन सादर करण्यात आले असून, शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास मच्छिमार क्षेत्रात तीव्र असंतोष निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## भाच्यांकडून मावशीचा खून

मृत महिलेचे नाव आहे. ही महिला सारळ येथील आदिवासीवाडी येथे एकटीच राहात होती. गेल्या काही दिवसांपासून ती महिला बेपत्ता होती.त्यामुळे हरविल्याची तक्रार मांडवा सागरी पोलीस ठाण्यामध्ये करण्यात आली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तपास सुरु केला. त्यांच्या संपर्कात असलेल्या अनेकांची चौकशी केली. अखेर तिनवीरा येथील दोन तरुणांची नावे पोलिसांसमोर आली. पोलिसांनी या दोघांना संशयित म्हणून ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली. मात्र, त्यांच्याकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. त्यामुळे या दोघांनी वयोवृध्द महिलेचे अपहरण केल्याचा संशय पोलिसांचा बळावला. खाकी वर्दीचा दणका मिळाल्यावर दोघेही पोपटासारखे बोलू लागले. पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आला. या पथकामार्फत तपासाची सूत्रे वेगात हलविण्यात आली.

वयोवृद्ध महिला ही आरोपींची चुलत मावशी होती. तिच्याकडे लाखो रुपयांचे दागिने होते. ते दागिने बळकाविण्यासाठी त्यांनी वयोवृद्ध महिलेचे अपहरण केले. त्यानंतर तिचा गळा दाबून खून केला. खून केल्याची माहिती उघड होऊ नये, म्हणून त्यांनी पुरावा नष्ट करण्यासाठी आंबेनळी घाटातील बावली टोक ते दाभिळ टोकदरम्यानच्याखोल दरीत महिलेचा मृतदेह टाकून दिल्याचे कबूल केले. हा प्रकार ३१ मे रोजी सकाळी दहा ते २ जून दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास करण्यात आला.

आरोपींच्या माहितीनुसार अलिबाग पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मात्र, घाटातील धोकादायक कडे, दाट झाडी आणि खोल दरीमुळे मृतदेह शोधणे मोठे आव्हान ठरले. यासाठी प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीम आणि महाबळेश्वर ट्रॅकर्सच्या सदस्यांची मदत घेण्यात आली.

रेस्क्यू टीमचे सदस्य अजित जाधव यांना पोलादपूर पोलिसांकडून माहिती मिळाल्यानंतर दोन्ही टीम तात्काळ घटनास्थळी रवाना झाल्या. सुमारे दीड तासांच्या अथक शोधमोहिमेनंतर १०० फूट खोल दरीत एका काळ्या रंगाच्या पिशवीत मृतदेह आढळून आला. त्यानंतर रोप आणि विशेष साहित्याच्या साहाय्याने रेस्क्यू टीमचे सदस्य दरीत उतरले. दरम्यान, पावसानेही हजेरी लावल्याने अडचणी वाढल्या होत्या. तरीही जीवाची पर्वा न करता जवळपास एक तासाच्या प्रयत्नांनंतर मृतदेह सुरक्षितपणे दरीतून बाहेर काढण्यात यश आले. या धाडसी मोहिमेत सुनीलबाबा भाटिया, अनिल केळगणे, जयवंत बिरामणे, ऋषिकेश जाधव, अजित जाधव, मुन्ना उतेकर, ओमकार सोनवणे, शरद सावंत, निखिल सावंत आणि संकेत सावंत यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

अनदर्श हिराजी शेडगे (३२) व रितेश नरेश लोहार (२०) अशी मारेकऱ्यांची नावे आहेत. अनदर्श हा पिकअप चालक असून, रितेश हा गार्डनिंगची कामे करतो. मात्र, अधिक पैसे मिळविण्याबरोबरच दागिन्यांच्या हव्यासापोटी त्यांनी चुलत मावशीचा खून केला. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली असून, दोघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. सध्या ते दोघेही पोलीस कोठडीमध्ये असून, अधिक तपास पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे करीत आहेत.

## ४८ तासांत मान्सून महाराष्ट्रात

कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. काही ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचले, तर शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. विदर्भात मात्र अद्याप उष्णतेची तीव्रता कायम राहणार असून तापमान ४० ते ४२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे. १० जूननंतर तापमानात घट होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

केरळ, गोवा आणि आता महाराष्ट्र असा मान्सूनचा प्रवास सुरू असून, पुढील दोन दिवसांत कोकण किनारपट्टीवर मान्सूनच्या सरी बरसण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाचे लक्ष आता मान्सूनच्या अधिकृत आगमनाकडे लागले आहे.

## ग्रामसभेलाच प्रशासकांची दांडी

पूर्ण झाला होता. त्यामुळे गावातील रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, वीज, स्ट्रीट लाईट, रखडलेली नळपाणी योजना आणि इतर प्रलंबित प्रश्नांवर चर्चा होऊन त्यावर मार्ग निघेल, अशी अपेक्षा ग्रामस्थांना होती.

मात्र, तब्बल तासभर प्रतीक्षा करूनही प्रशासक सुजित धनगर ग्रामसभेसाठी उपस्थित न राहिल्याने अखेर सभा रद्द करण्यात आली. ग्रामसभेचे अध्यक्षच गैरहजर राहिल्याने उपस्थित ग्रामस्थांचा संताप अनावर झाला. कडक उन्हात उपस्थित राहिलेल्या ज्येष्ठ नागरिकांनीही प्रशासनाच्या या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

वारंवार ग्रामसभा तहकूब होणे आणि यावेळी प्रशासक गैरहजर राहिल्याने ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. प्रशासकांना निलंबित करून लवकरात लवकर ग्रामसभा घेण्यात यावी आणि गावातील रखडलेले प्रश्न मार्गी लावावेत, अशी मागणी ग्रामस्थ गोरख शेप यांनी केली. तसेच या प्रकाराबाबत रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

## आज रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा

शिवभक्तांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहेत.

सध्या राज्यात तीव्र उष्णतेची लाट जाणवत असल्याने रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांच्या सोयीसाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने विशेष नियोजन केले आहे. गडावर तसेच पायथ्याशी विशेष वैद्यकीय पथके, २४ तास कार्यरत रुग्णवाहिका आणि मुबलक औषधसाठ्यासह आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. शिवराज्याभिषेक सोहळ्यादरम्यान १३ विशेष वैद्यकीय पथके कार्यरत राहणार असून, रायगड परिसरातील विविध ठिकाणी तसेच पाचाड येथील राजमाता जिजाऊ समाधी परिसरात तात्पुरती वैद्यकीय मदत केंद्रे उभारण्यात आली आहेत.

आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी गडाच्या पायथ्याशी आणि प्रमुख मार्गांवर रुग्णवाहिका २४ तास तैनात ठेवण्यात आल्या आहेत. शिवभक्तांना आरोग्यविषयक कोणतीही अडचण निर्माण झाल्यास तात्काळ उपचार मिळावेत यासाठी डॉक्टर, परिचारिका आणि पॅरामेडिकल स्टाफची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक वैद्यकीय केंद्रावर पिण्याच्या पाण्याचीही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

दरम्यान, महाड आणि माणगाव मार्गे येणाऱ्या शिवभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रशासनाने स्वतंत्र पार्किंग व्यवस्था केली आहे. बस, चारचाकी आणि दुचाकी वाहनांसाठी वेगवेगळी पार्किंग स्थळे निश्चित करण्यात आली आहेत. अनेक शिवभक्त शुक्रवारीच रायगडावर दाखल झाले असून, शनिवारी सकाळपासून आणखी मोठ्या संख्येने शिवभक्त गडावर पोहोचणार आहेत.

लाखो शिवभक्तांच्या उपस्थितीच्या पार्श्वभूमीवर रायगडावर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पायथ्यापासून गडाच्या माथ्यापर्यंत ठिकठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात असून, रायगड पोलिसांसह इतर जिल्ह्यांतील पोलीस अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड जवान आणि विविध संस्थांचे स्वयंसेवक सेवेत सहभागी झाले आहेत.

## सर्व्हे नको, शेतकऱ्यांचा एल्गार!

अधिक शेतकऱ्यांनी लेखी हरकती नोंदवल्या आहेत. मात्र, शासनाने या हरकतींची दखल घेण्याऐवजी शेतकऱ्यांच्या भावना पायदळी तुडवण्याचे काम सुरू ठेवल्याचा आरोप होत आहे.

गावोगावी आयोजित बैठका, जनजागृती मोहिमा आणि आंदोलनांतून आता एकच संदेश दिला जात आहे. ‘‘जमीन देणार नाही, गाव उद्ध्वस्त होऊ देणार नाही!’’ शेतकऱ्यांचा आरोप आहे की, सरकारने अद्यापही या प्रकल्पाचा सविस्तर आराखडा, पुनर्वसनाचे धोरण, गावांचे भवितव्य, स्थानिकांच्या घरांचे आणि व्यवसायांचे काय होणार याबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका मांडलेली नाही.

विशेष म्हणजे, अनेक गावांमध्ये भूमीपुत्रांनी आपल्या वडिलोपार्जित जमिनीवरच घरे, दुकाने आणि व्यावसायिक आस्थापने उभारली आहेत. शासनानेच गेल्या चार-पाच दशकांपासून गावठाण विस्ताराचा प्रश्न प्रलंबित ठेवला. परिणामी, आज हजारो घरे आणि आस्थापना शासनाच्या नजरेत अनधिकृत ठरण्याचा धोका निर्माण झाला आहे. या सर्वांना क्लस्टर डेव्हलपमेंटसारख्या स्थानिकांना मान्य नसलेल्या योजनांमध्ये जबरदस्तीने ढकलले जाणार का, असा सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर येत्या रविवारी होणारा शेतकरी मेळावा हा आंदोलनाचा निर्णायक टप्पा मानला जात आहे. या मेळाव्यात माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील शेतकऱ्यांना कायदेशीर आणि घटनात्मक लढ्याची दिशा देणार आहेत. त्यामुळे या मेळाव्याकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, शुक्रवारी सकाळी चिरनेर गावात सर्व्हेसाठी अधिकारी दाखल झाल्याची माहिती मिळताच शेतकरी नेते संतोष ठाकूर, सुरेश पाटील, प्रफुल्ल खारपाटील यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ घटनास्थळी जमा झाले. ‘‘आमच्या जमिनींबाबत निर्णय घेण्यापूर्वी आमच्याशी चर्चा करण्याची हिंमत नाही आणि सर्व्हे करायला मात्र धाडस दाखवता? हा कोणता न्याय?’’ असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना केला. ‘‘तिसरी मुंबईसाठी आम्ही जमीन देणार नाही. आमच्या संमतीशिवाय कोणताही सर्व्हे, मोजणी किंवा सरकारी प्रक्रिया आम्ही होऊ देणार नाही. सरकारने आधी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत,’’ अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली. वाढता विरोध आणि संतप्त वातावरण पाहता अधिकाऱ्यांना अखेर माघार घ्यावी लागली.

चिरनेरमधील ही घटना केवळ एका गावापुरती मर्यादित नसून, संपूर्ण प्रकल्पग्रस्त पट्ट्यातील उफाळून आलेल्या असंतोषाचे प्रतीक मानली जात आहे. सरकार आणि एमएमआरडीएने अद्यापही शेतकऱ्यांच्या भावना समजून घेतल्या नाहीत तर आगामी काळात आंदोलन अधिक उग्र होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

## मृतांच्या वारसांना प्रत्येकी दहा लाख

एकूण ३४ मृत व्यक्तींच्या वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपये, याप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपयांची मदत तातडीने मंजूर केली आहे. यामध्ये बीड जिल्हयातील १५, धाराशिव ५, परभणी ४, हिंगोली ४, नांदेड ३, जालना १, छत्रपती संभाजीनगर १ आणि लातूर १ अशा वारसांचा समावेश आहे, अशी माहिती उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

आंदोलनादरम्यान सरकारच्या वतीने देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता तातडीने करण्यात येत आहे. उपसमितीच्या बैठकीत सर्वच मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली असून, त्यावर वेगाने कार्यवाही सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## रानवली धरण कोरडेठाक

दरम्यान, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सून आगमनास विलंब झाल्यास श्रीवर्धन शहराला गंभीर जलसंकटाचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पर्यायी उपाययोजना हाती घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

रानवली धरणातील पाणीसाठा संपुष्टात आल्याने शहरात मोफत टँकरद्वारे नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच धरणाच्या दुरवस्थेस जबाबदार असलेल्या कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल घेऊन ठोस निर्णय न घेतल्यास श्रीवर्धनकर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

## महावितरणच्या अधिकाऱ्याला धमकी

ठेवण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन निकम करीत आहेत. दरम्यान, संबंधित पिता-पुत्रांनीही महावितरण अधिकाऱ्यांविरोधात तक्रार अर्ज देत घरात कोणी नसताना मीटर बदलल्याचा आणि जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप केला आहे.

## भीषण अपघातात सायकलस्वार ठार

डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

याप्रकरणी अर्जुन यादव (५२, रा. साळाव) यांनी फिर्याद दिली असून मोटारसायकलस्वार मुकुंद चवरकर (२६, रा. निडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच रेवदंडा पोलीस ठाणे येथील पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण आणि इतर बाबींचा पुढील तपास पोलीस करीत आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे साळाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून, रेवदंडा-साळाव पुलावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# माणगावची वाट शिवभक्तांसाठी जीवनवाहिनी

| माणगाव | प्रतिनिधी |

रायगड किल्ल्यावर शनिवारी (दि.६) छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५२ वा राज्याभिषेक सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी उपस्थित राहण्यासाठी दरवर्षी लाखो शिवभक्त रायगडाच्या दिशेने निघतात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून, तसेच मुंबई आणि पुण्यासारख्या महानगरांतून येणाऱ्या शिवप्रेमींसाठी रायगड हे केवळ पर्यटनस्थळ नसून श्रद्धा, स्वाभिमान आणि इतिहासाची पवित्र भूमी आहे. अशा वेळी रायगडाकडे जाणारा माणगाव-ढालघर आणि निजामपूर मार्ग हजारो शिवभक्तांसाठी खऱ्या अर्थाने जीवनवाहिनी ठरत आहे.

किल्ल्यावर जाण्यासाठी पारंपरिकरित्या महाड मार्गाचा वापर केला जात असला, तरी गेल्या काही वर्षांत माणगाव येथील ढालघर जोड रस्ता आणि निजामपूर मार्गे थेट रायगडाच्या पायथ्याशी पोहोचण्याचा पर्याय अधिक लोकप्रिय झाला आहे. या मार्गामुळे शिवभक्तांचे सुमारे २० ते २५ किलोमीटर अंतर कमी होते. तसेच, प्रवासाच्या वेळेतही मोठी बचत होते. परिणामी, मुंबई-पुण्यातून येणारे बहुसंख्य शिवभक्त महाड मार्ग टाळून माणगाव आणि निजामपूर मार्गाला प्राधान्य देत आहेत. राज्याभिषेक सोहळ्याच्या काळात या मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ दिसून येते. या मार्गावरून पहाटेपासूनच भगवे झेंडे फडकवत, शिवरायांच्या जयघोषात निघालेली वाहने माणगाव शहरातून रायगडाच्या दिशेने जाताना पाहायला मिळतात. अनेक कुटुंबे, युवक मंडळे, शिवप्रेमी संघटना आणि दुर्गप्रेमी याच मार्गाने गडाच्या पायथ्याशी पोहोचतात. त्यामुळे माणगाव शहर हे राज्याभिषेक सोहळ्याच्या काळात शिवभक्तांच्या स्वागताचे प्रवेशद्वार बनते.

### इतिहासाशी जोडणारा भावनिक दुवा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाकडे जाणाऱ्या प्रत्येक शिवभक्तांसाठी हा मार्ग केवळ रस्ता नाही, तर इतिहासाशी जोडणारा भावनिक दुवा आहे. शिवरायांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी निघालेल्या प्रत्येक मावळ्याच्या प्रवासात माणगावची ही वाट आज अभिमानाने उभी आहे. राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने रायगडावर उमटणाऱ्या लाखो पावलांमध्ये या मार्गाचे योगदान तितकेच महत्त्वाचे आणि स्मरणीय ठरत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, ढालघर-निजामपूर मार्गामुळे केवळ वेळ आणि इंधनाची बचत

### ढालघर, निजामपूर मार्ग ठरतोय वरदान
### छोट्या गावांमध्येही आर्थिक चैतन्य निर्माण

होत नाही, तर प्रवास अधिक सोयीस्कर आणि सुरक्षितही होतो. रायगडाकडे जाणाऱ्या हजारो वाहनांमुळे या मार्गावरील छोट्या गावांमध्येही आर्थिक चैतन्य निर्माण होते. हॉटेल, भोजनालये, पेट्रोल पंप, किराणा दुकाने आणि स्थानिक व्यावसायिकांच्या व्यवसायाला चालना मिळते. यंदाच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी प्रशासनाने आरोग्य, सुरक्षा, पिण्याचे पाणी आणि वाहतूक व्यवस्थेची व्यापक तयारी केली असली, तरी या सर्व व्यवस्थेच्या यशामागे माणगाव-ढालघर-निजामपूर मार्गाची महत्त्वाची भूमिका आहे. कारण




लाखो शिवभक्तांना रायगडाच्या चरणी पोहोचवण्याचे काम हा मार्ग शांतपणे आणि सातत्याने करत आहे.

# मुरूड परिसरात पेरणीला सुरुवात



| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड शहरांसह पंचक्रोशी भागांमध्ये खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला आहे. शेतकरी शेतात बियाणे पेरणीचे काम सुरू करताना दिसत आहेत. पावसाचे आगमन जवळ आल्याने अनेक ठिकाणी मशागतीची कामे पूर्ण करून बियाणे व खतांची जुळवाजुळव करण्यात शेतकरी व्यस्त आहेत. अनेक ठिकाणी ट्रॅक्टरच्या साहाय्याने नांगरणी, मशागत आणि पेरणीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

मुरूड कुंभार वाड्यातील शेतकरी प्रसाद विलास जळगावकर व प्रसन्न जाळगावकरांनी आपल्या शेतात मशागतीची कामे पूर्ण करून भात पिकांसाठी बियाणे पेरणीची तयारी केली आहे. तालुक्यात ३३०० हेक्टर भात लागवडीचं क्षेत्र आसुन या क्षेत्रामध्ये शेतकरी सुवर्णा, जया, रूपाली, चिंटू, वाडा कोलम, रत्ना, शुभांगी, कर्जत व खारपट्यात जमिनीवर-पनवेल, आदी भाताच्या जातीची लागवड केली जाते.

# खांदेश्वर सरोवर सुकण्याच्या मार्गावर

| पनवेल | प्रतिनिधी |



खांदा वसाहत सेक्टर-२ येथील खांदेश्वर सरोवर वाढत्या उन्हाच्या तडाख्यामुळे सुकण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. पाणीपातळी मोठ्या प्रमाणावर घटल्याने सरोवराच्या विविध भागांमध्ये चिखल आणि उघडा तळ दिसू लागला आहे. परिणामी, सरोवरातील कासवेही मोठ्या संख्येने एका बाजूला एकत्र येताना नागरिकांच्या निदर्शनास येत आहेत.

खांदेश्वर सरोवर हे परिसरातील महत्त्वाचे जलस्रोत मानले जाते. दरवर्षी गणेशोत्सव तसेच नवरात्रोत्सवा दरम्यान लहान-मोठ्या मूर्तींचे विसर्जन येथे केले जाते. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या विसर्जनामुळे सरोवराच्या तळामध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे सरोवराची खोली कमी झाली असून पाणी साठवण्याची क्षमता घटली आहे.

सकाळी आणि सायंकाळी फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी सिडको प्रशासनाने तातडीने सरोवरातील गाळ काढण्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी केली आहे. गाळ उपसा केल्यास सरोवराची खोली वाढेल आणि आगामी पावसाळ्यात अधिक प्रमाणात पाणी साठवता येईल, असा विश्वास ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केला आहे.

या सरोवरात अनेक नागरिक मासेमारीसाठीही येत असतात. अजून मान्सूनला सुमारे आठ ते दहा दिवसांचा अवधी असल्याने याच कालावधीत गाळ काढण्याचे काम सुरू केल्यास सरोवराचे संवर्धन होण्यास मदत होईल. खांदेश्वर सरोवराचे पर्यावरणीय महत्त्व लक्षात घेता प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# रहाटाड येथे भात पिकाची शाळा

**तळा :** कृषी विभागामार्फत खरीप नियोजन मौजे राहटाड येथे क्रॉप सॅप अंतर्गतभात पिकाची शेती शाळा उत्साहात पार पडली. यावेळी २५ शेतकऱ्यांची शेती शाळेसाठी निवड करण्यात आली. सहाय्यक कृषी अधिकारी अतुल बाबर यांनी भात पिकासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या सहा वर्गांची माहिती, शेती शाळेची कार्यपद्धती तसेच विविध सुधारित व संकरित भात वाणांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी घरगुती बियाण्यांची निवड व बीज प्रक्रिया याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सचिन लोखंडे यांनी शेतकरी गट निर्मितीचे महत्त्व सांगून गोकृपाअमृताद्वारे बीज प्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक केले. उपविभागीय कृषी अधिकारी बोराडे यांनी खताचा संतुलित वापर आदी कृषी योजनांची माहिती दिली.

# मुरूड आगाराच्या विरोधात जनतेचा आक्रोश

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड जंजिरा एसटी आगारातील नादुरुस्त असलेली एसटी बसेस तात्काळ कायम स्वरुपी बंद करण्यासाठी मुरूड जनतेचा आक्रोश थेट राज्याचे परिवहन मंत्र्यांना लेखी निवेदनाची प्रत मुरूड तहसीलदार आदेश डफळ यांना देण्यात आले.

यावेळी जनतेच्या वतीने नगरसेवक ॲड. रुपेश पाटील यांनी एसटी बसेसची दुरवस्थे संदर्भात तहसीलदार आदेश डफळ यांच्याकडे समस्या मांडण्यात आल्या. या संदर्भात तात्काळ बैठक बोलवावी तसेच रायगड विभागीय नियंत्रक डॉ. सुहास चौरे यांना आमंत्रित करावे अशी विनंती तहसीलदारांकडे जनतेच्या वतीने करण्यात आली.

निवेदन असे म्हटलं आहे




की, एसटी आगारातील रोजच्या रोज एसटी बसेस रस्ता बंद पडत आहेत. जनतेला अतिशय वाईट दर्जाची सुविधा मुरुड मधील नागरिकांना देण्यात येत असुन या बससेवेसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची अवस्था पुर्ण पणे नादुरुस्त असुन सतत काहीना काही विपरीत परिणाम त्यांचे दिसून येत आहेत. मागील काही दिवसांत गाडी रस्त्यात बंद पडणे वाहनांचे चाक निखळुन पडणे फाटलेला टायर गाडीस लावणे, चालक वाहक उपलब्ध नसणे वाहन कधीच वेळेवर न सुटणे अश्या अनेक समस्यांने मुरूड आगारास व्यापलेले आहे.

याबाबत अनेक नागरिकांनी भेटी गाठी केल्या, बैठाका घेतल्या केवळ आश्वासन देण्यात आली. यावर कारवाई मात्र कोणतीच केली नाही. थोड्याच दिवसांत शाळा सुरू होणार असून या एसटी बस सेवेवर ग्रामीण भागातील जनता व विद्यार्थी अवलंबून असून यांची संख्या सुध्दा अधिक आहे. याही बाबींचा आपण गांभीर्याने विचार करावा व मुरुडमधील सर्वात जास्त गंभीर व सतत वाढत चाललेल्या समस्येचे निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आपल्या दालनात बोलवुन जनतेचा समक्ष बैठक आयोजित करावी असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी ॲड. रुपेश पाटील, ललीत जैन, कुणाल सतविडकर, जाहिद फकजी, जनार्दन कंधारे, भारत रांजणकर, राजेंद्र कजबजे, अनंत जोशी, सुशील ठाकुर, अजित गुरव, अजित कासार, विशाल कोलवणकर, उमेश भोईर, मॉन्टी दांडेकर, महेश मानकर, स्वप्निल कवळे उपस्थित होते.

# रस्ता खोदल्याने मार्ग झाला बंद

| तळा | प्रतिनिधी |

तळा शहरासाठी १३ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेचे काम चालू असून ठेकेदाराने वावेहवेली ते बामणघर तळा रस्त्यावर रस्त्याच्या मधूनच पाइपलाईन टाकण्यासाठी खोदलेल्या खड्ड्यामुळे शेतकरीवर्ग व नागरिकांना मनस्ताप होत असून शेतकरी वर्गातून संतप्त प्रतिक्रिया उमटतांना दिसत आहे. हा रस्ता खोदकाम केल्यामुळे बंद झाल्याने सदर ठेकेदाराला नागरिकांची व शेतकऱ्यांची कदरच नसल्याचे यातून समोर येत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. हे काम करताना वावेहवेली येथील कोणत्याही ग्रामस्थाला विचारात न घेताच ठेकेदाराने हे काम केले आहे.

सध्या पावसाची शेतकऱ्यांची कामे चालू असून या मार्गावरून शेतावर साहित्य घेऊन जाणे, तसेच तळा बाजारात वावेहवेली येथील नागरिक सतत ये जा करत असतात व बामणघर गौळवाडी येथील ही शेतकरी व नागरिक शेतीची कामे व इतर कामे करण्यासाठी या मार्गाचा वापर करत असतात. या रस्त्यावरून कोणतेही वाहन नेणे शक्य नाही. तसेच रात्रीच्या वेळी जर का एखादे वाहन आले तर मोठा धोका निर्माण होऊन अपघात होण्याचा धोका आहे. तसेच एखादा माणूस आजारी पडला तर त्यास डॉक्टरकडे कसे न्यावे हाही गंभीर प्रश्न उपस्थित राहू शकतो. तरी ठेकेदाराने रस्त्यावर खोदलेला खड्डा भरून काम पुर्ण करावे व पाईपलाईन रस्त्याच्या कडेने घेण्यात यावी अशी संतप्त मागणी वावेहवेली गावच्या नागरिकांतून होताना दिसत आहे.

# सीसीटीव्हीच्या मदतीने चोराचा शोध

**पनवेल :** कोपरा-खारघर येथे चोरीला गेलेली रिक्षा अवघ्या तीन दिवसांत शोधून काढण्यात खारघर पोलिसांना यश आले. रिक्षा (क्रमांक एमएच - ४६, एझेड-, ५२९९) पोलिसांनी हस्तगत करून तिचे मालक व चालक राकेश कामोठेकर यांच्या ताब्यात दिली. चोरीची घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती. फुटेजमध्ये पहाटे सुमारे ३ वाजता एक व्यक्ती रिक्षा घेऊन जाताना दिसून आला. या धाग्यांच्या आधारे पोलिसांनी तांत्रिक तपास आणि खबऱ्यांच्या मदतीने रिक्षाचा माग काढला. रिक्षा परत मिळाल्याने कामोठेकरांनी पोलिसांच्या तत्पर कारवाईचे कौतुक केले. वेळेत केलेल्या तपासामुळे मोठा दिलासा मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# गाढी नदीला जलपर्णीचा विळखा

| पनवेल | प्रतिनिधी |

माथेरानच्या निसर्गरम्य आणि अथांग डोंगररांगांमधून उगम पावून, विविध गावे आणि परिसराला समृद्ध करत पुढे अरबी समुद्राला जाऊन मिळणारी गाढी नदी सध्या एका अत्यंत गंभीर आणि चिंताजनक समस्येचा सामना करत आहे. पनवेल जवळील विचुंबे गावाच्या हद्दीतून वाहणाऱ्या या नदीच्या विस्तीर्ण पात्रावर गेल्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर जलपर्णी पसरली आहे. या जलपर्णीच्या अनिर्बंध साम्राज्यामुळे नदीचे मूळ निसर्गदत्त आणि विहंगम सौंदर्य पूर्णपणे कुरूप झाले आहे. संपूर्ण नदीचे पात्र या हिरव्यागार जलपर्णीने कशाप्रकारे वेढून टाकले आहे. नदीच्या पाण्याचा प्रवाह कुठेही दिसत नसून, संपूर्ण पात्रावर जणू काही एखाद्या मोठ्या मैदानासारखा



किंवा गवताळ जमिनीसारखा भास होत आहे.

वास्तविक पाहता, ज्या गावाला किंवा परिसराला नदीचे सान्निध्य लाभते, ते गाव खऱ्या अर्थाने निसर्गाने उधळण केलेले समृद्ध गाव मानले जाते. विचुंबे गावालाही गाढी नदीच्या रूपाने निसर्गाचे असेच एक अद्भूत आणि सुंदर वरदान लाभले आहे. वर्षानुवर्षे ही नदी या भागाची जीवनवाहिनी राहिली आहे. मात्र, सध्या या नदीची झालेली दुरवस्था पाहून पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमधून तीव्र हळहळ व्यक्त होत आहे. जलपर्णीच्या या अवाढव्य वाढीमुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्णपणे संथ झाला आहे. संथ झालेल्या पाण्यात कचरा अडकून पडत असून, त्यामुळे पाण्याचा दर्जा खालावत चालला आहे. नदीतील ऑक्सिजनचे प्रमाण कमालीचे कमी होण्याची भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात असून, याचा थेट आणि घातक फटका नदीतील जलचरांना व माशांना बसत आहे. याशिवाय, संथ पाण्यामुळे परिसरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला असून, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांची भीती निर्माण झाली आहे, तसेच परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरत आहे.

निसर्गाचे एवढे मोठे वरदान लाभलेल्या या गावाचे आणि नदीचे सौंदर्य अशा प्रकारे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नष्ट होऊ देणार नाही, अशी आक्रमक भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. गाढी नदीचे अस्तित्व वाचवणे, तिचे प्रदूषण रोखणे आणि स्थानिक नागरिकांना या त्रासातून मुक्त करण्यासाठी तात्काळ पावले उचलली जात आहेत. या गंभीर समस्येबाबत शासनाकडे, प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे आणि संबंधित स्थानिक प्रशासकीय विभागाकडे स्वतः अधिकृतपणे लेखी पत्रव्यवहार करून हा प्रश्न तातडीने तडीस नेणार आहेत . जर प्रशासनाने यावर वेळेत कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिक पातळीवर दिला जात आहे.

# विमानतळावर सुखोईचे यशस्वी लँडिंग

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने गुरुवारी (दि.४) आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. भारतीय हवाई दलाच्या अत्याधुनिक सुखोई-३० लढाऊ विमानाचे नव्याने उभारण्यात आलेल्या या विमानतळाच्या धावपट्टीवर यशस्वी लँडिंग करण्यात आले. या विमानतळावर उतरलेले हे पहिलेच लष्करी लढाऊ विमान ठरल्याने देशाच्या विमान वाहतूक क्षेत्रात या घटनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या ऐतिहासिक घटनेमुळे पनवेल आणि नवी मुंबई परिसरातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याची भावना व्यक्त होत आहेत.

# महामार्गावरील क्रॅश बॅरियरचे काम निकृष्ट ?

| पेण | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पेण ते पळस्पे दरम्यान टोलवसुली सुरू होण्यापूर्वी मोठ्या प्रमाणात क्रॅश बॅरियर अर्थात लोखंडी संरक्षक भिंती उभारण्याचे काम करण्यात आले. मात्र, हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचा गंभीर आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. ठेकेदाराने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी नियमांना हरताळ फासल्याची चर्चा रंगू लागली आहे.

क्रॅश बॅरियरच्या उभारणीसाठी साधारणतः सहा फूट लांबीचे लोखंडी खांब किमान तीन फूट खोल खड्डा खोदून सिमेंट, खडी व वाळूच्या साहाय्याने मजबुतीने बसविणे आवश्यक असते. त्यानंतर काही दिवसांनी लोखंडी पत्रे नट-बोल्टच्या सहाय्याने जोडली जातात. मात्र, प्रत्यक्षात या ठिकाणी अनेक खांब जेसीबीच्या सहाय्याने थेट जमिनीत दाबून बसविण्यात आल्याचे दिसून येत आहे.

विशेष म्हणजे हे खांब रस्त्याच्या भरावावर बसविण्यात आले आहेत. पावसाळ्यात भरावाची माती सैल झाल्यानंतर हे खांब अधिकच कमकुवत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत




- **आर्थिक फायद्यासाठी नियमांना हरताळ**
- **वाहनचालकांच्या जीवाशी खेळ**

### कोट्यवधीचा खर्च

कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या या सुरक्षाव्यवस्थेची प्रत्यक्ष तपासणी झाली होती का, असा सवाल आता वाहनचालक आणि नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

एखाद्या वाहनाची धडक क्रॅश बॅरियरला बसल्यास वाहन थांबण्याऐवजी संपूर्ण बॅरियरसह रस्त्याखाली जाण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. ज्या सुरक्षेसाठी हे बॅरियर उभारण्यात आले, तो उद्देशच त्यामुळे फोल ठरणार असल्याची भीती व्यक्त होत आहे.

साध्या धडकेनेही खांब उपटून निघू शकतील इतके हे काम कमकुवत दिसत असल्याने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या गुणवत्ता नियंत्रण व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी इंगोले यांच्याशी भ्रमणध्वनीवरून वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे या कथित निकृष्ट कामाबाबत प्राधिकरणाची भूमिका अद्याप स्पष्ट होऊ शकलेली नाही.



## ओम पर्यावरणायनमः

सत्यनारायणाच्या पूजेचे मंत्र भटजी म्हणतात. त्याकडे कोणाचेही लक्ष नसते. त्या मंत्रांचा काय अर्थ होतो याचे कोणालाही काही पडलेले नसते. मात्र मंत्र म्हटले नाहीत तर पूजा होऊ शकत नाहीत हा सर्वांचा ठाम विश्वास असतो. दर दिवशी कोणत्या ना कोणत्या विशेष दिवसांच्या किंवा आठवड्यांच्या नावाने आपल्याकडे अशाच पूजा घातल्या जात असतात. उपचार म्हणून त्यांचे मंत्रही म्हटले जात असतात. पाच जूनला पर्यावरणदिन साजरा होतो. त्याचाही असाच उपचार झाला आहे. त्यासाठी सरकारी संस्था आणि हौशी कार्यकर्ते विविध कार्यक्रम घेतात. या सगळ्यांची तळमळ खोटी असते असे नव्हे. पण एक दिवस पृथ्वी वाचवा म्हणायचे, प्लास्टिकला विरोध करायचा, झाडांची रोपे वाटायची किंवा हिरवे फलक घेऊन एखादी मिरवणूक काढायची की पर्यावरणाची पूजा झाली असे अनेकांना वाटते. आपले एरवीचे आयुष्य, आपले खानपान, प्रवास यातून आपण ज्याची पूजा होते त्याच पर्यावरणाची हानी होत असते हे लक्षात घेतले जात नाही. दुसरीकडे सरकार नावाचा एक मठ्ठ काळा बैल आहे. हा बैल तर जे जे चांगले व हितकारक आहे ते ते तुडवत निघाला आहे. सतत निवडणुका जिंकणे, त्यासाठी प्रचंड पैसे मिळवणे, विकासाचा आभास निर्माण करणे हाच या सरकार नामक संस्थेचा धंदा झाला आहे. या संदर्भात राज्यातील फडणवीस सरकारचे अलिकडचे काही निर्णय पाहण्यासारखे आहेत. पहिला निर्णय थेट कोकणाशी व आपल्या सर्वांच्या प्रिय अशा सह्याद्रीशी संबंधित आहे. या सह्याद्रीमध्ये तब्बल ५९ पंप स्टोरेज आधारित विजेचे प्रकल्प सुरु करण्याचा घाट फडणवीस सरकारने घातला आहे. इंडी जर्नल या पुण्याच्या पत्रकारांच्या संस्थेने याबाबत यूट्यूबवर अत्यंत माहितीपूर्ण असे वृत्तपट बनवले आहेत. त्यानुसार कागदावर २३ प्रकल्प दाखवले जात असले तरी मुख्यमंत्र्यांनी तब्बल ५९ प्रकल्प उभारले जातील असे एप्रिल महिन्यात सांगितले आहे. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये संशयास्पद अशी गुप्तता पाळली जात असून धड माहिती दिली जात नाही असा अनुभव आहे.

### पंप स्टोरेज प्रकल्प

हे विजेचे प्रकल्प आहेत. सह्याद्रीच्या खाली कोकणात व वर डोंगरमाथ्यावर घाटावर असे पाण्याचे तलाव किंवा धरणक्षेत्रे निर्माण करणे ही यातली कल्पना आहे. सध्या सौर आणि पवनउर्जेमुळे दिवसा बरीच वीज उपलब्ध होत असते. त्या काळात पाण्यावरच्या म्हणजेच हायड्रो इलेक्ट्रिसिटीचा वापर कमी होतो. मात्र सौरउर्जा उपलब्ध नसेल तेव्हा या विजेची गरज लागते. घाटमाथ्यावर धरणे करण्याला मर्यादा आहेत. त्यासाठी डोंगरावरून खाली कोसळणारे पाणी कोकणातल्या सह्याद्रीच्या कडेच्या गावांमध्ये प्रचंड मोठे तलाव बांधून त्यात साठवले जाईल. जेव्हा विजेची गरज असेल तेव्हा हे खालच्या तलावातले पाणी विजेच्या साह्याने वरच्या तलावात चढवले जाईल. त्यानंतर ते वरच्या तलावातून खाली सोडून त्यातून विजेची निर्मिती केली जाईल. यामध्ये एरवी वाया जाणाऱ्या पाण्याचा उपयोग होणार आहे असा प्रचार सरकारतर्फे केला जात आहे. मात्र या प्रकल्पामध्ये अनेक गोंधळ आहेत. एक तर घाटमाथ्यावर व खाली कोकणात पाणी साठवण्यासाठी जे धरणासारखे जलाशय बांधले जातील त्याकरिता बरीच जमीन संपादन करावी लागणार आहे. म्हणजेच त्या त्या गावांचे व माणसांचे विस्थापन होणार आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात अनेक गावांवर अशा विस्थापनाची टांगती तलवार उभी राहिली आहे. त्यासाठी ते लढाही देत आहेत. या गावांना सरकारने धड विश्वासात घेतलेले नाही. नेमकी कोणती व किती जमीन जाणार आहे याबाबत स्पष्टता नाही. अचानक नोटिसा येत आहेत. त्याच्या जनसुनावणीमध्ये कंपनीचे अधिकारी म्हणवणारे लोक धड उत्तरे देऊ शकत नाहीत. जमिनी जबरदस्तीने पाण्याखाली जाणार आहेत अशीही चर्चा सुरू करून देण्यात आली आहे. हे सर्व प्रकल्प अदानी किंवा तत्सम कंपन्यांचे आहेत अशीही बोलवा आहे. यात टोरेंट नावाची एक वादग्रस्त कंपनी आहे. मात्र या सर्व कंपन्या सरकारला पुढे करून हा सर्व खेळ करीत आहेत. सरकारने जमिनी संपादन करून द्याव्यात. त्यावर या कंपन्यांनी कबजा करावा आणि नंतर त्यांचे उद्योग करायला त्या मोकळ्या.

### डेटा सेंटरचे मायाजाल

या प्रकल्पात खालच्या जलाशयातले पाणी वर डोंगरावर विजेच्या साह्यानेच चढवले जाणार आहे. म्हणजे त्यासाठीही वीज खर्च होणार आहेच. ही खर्च होणारी वीज, नंतर नव्याने निर्माण होणारी वीज यांच्या लाभ-हानीचे गणित सध्या तरी फारच गोंडस व गुलाबी आहे असे भासवले जात आहे. ते गणित खरे की खोटे हा पुढचा प्रश्न आहे. पण सध्या तरी जे नफ्याचे हिशेब मांडले जात आहेत तितकेही प्रत्यक्षात यायचे तर त्यासाठी जमिनी ताब्यात घेण्याचा खर्च हा कमीत कमी ठेवला जाणे हे अपरिहार्य आहे. म्हणजेच या जमिनीवरील गावकरी, आदिवासी इत्यादींना नगण्य पैसे देऊन हाकलून काढणे हाच पर्याय अवलंबला जाणार आहे. दुसरे म्हणजे या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज नक्की कशासाठी वापरली जाणार आहे याचा खुलासा झालेला नाही. मात्र सध्या राज्यात येऊ घातलेल्या डेटा सेंटरसाठी हा सर्व खटाटोप असावा असा संशय आहे. गुगल, अमेझॉन अशासारख्या बड्या आयटी कंपन्यांना डेटा साठवण्यासाठी प्रचंड क्षमतेचे सर्व्हर्स उभे करावे लागतात. यासाठी प्रचंड उर्जा लागते. या केंद्रातले संगणक व हे सर्व्हर्स प्रचंड गरम होतात. त्यांना थंड करण्यासाठी प्रचंड प्रमाणात पाणी लागते. इतके की हे पाणी वापरल्यामुळे अमेरिकेत अनेक राज्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ पडला आहे. त्यामुळे तेथे आंदोलने होऊन डेटा सेंटर्स उभारण्यावर बंदी आली आहे. सबब ही डेटा सेंटर्स आता तिसऱ्या जगात उभारण्याची शर्यत सुरू झाली आहे. भारतासारख्या गरीब देशांना अशी सेंटर्स आपल्याकडे येणे म्हणजे मोठा विकास वाटतो. त्यातून काही रोजगार निर्माण होतील हे खरे आहे. पण त्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी कितीतरी प्रचंड आहे. सध्या मुंबई, नवी मुंबईच्या परिसरात ही डेटा सेंटर्स आकाराला येत आहेत. त्यांना पाण्याचा पुरवठा करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील पाण्यावर सर्वांचा डोळा आहे. या पंप स्टोरेज प्रकल्पांच्या निमित्ताने हे जे प्रचंड जलाशय तयार केले जाणार आहेत त्यातील पाण्याचा वापरही भविष्यात विजेऐवजी डेटा सेंटर्ससाठी केला जाण्याची एक शक्यता आहे. समजा तसे झाले नाही व हे वीज प्रकल्प म्हणनच कार्यरत राहिले तरीही त्यातून होणारी पर्यावरणाची हानी प्रचंड आहे. त्याचा हिशेब मांडण्याची व मागण्याची गरज आहे. दुर्दैवाने आपले राज्यकर्ते एकीकडे पर्यावरणाच्या मंत्राचा जप करून वार्षिक सत्यनारायण घालत असले तरी दुसरीकडे त्यांचे वेगळेच उद्योग चालू आहेत. पूजा झाली व प्रसाद मिळाला या आनंदात लोकांचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे.

विचार

# अनपेक्षित राजकीय वळणाच्या निमित्ताने...

***द्रमुक-आणि काँग्रेसमधील तणाव आणि द्रमुक भाजपकडे झुकणे ही केवळ अफवा नाही. पुढील वर्षांमध्ये तामिळनाडू आणि राष्ट्रीय राजकारणात कोणती नवी समीकरणे आकार घेतात, यावर देशाचे राजकीय भविष्य काही प्रमाणात अवलंबून राहील. काँग्रेसला धडा शिकवण्याची भावना, भाजपची दक्षिणेतील महत्त्वाकांक्षा आणि द्रमुकची राजकीय व्यूहनीती यांचा संगम झाल्यास राजकीय पटावर एक नवा अध्याय लिहिला जाऊ शकतो.***



महेश जोशी

भारतीय राजकारणात मैत्री आणि वैर हे कायमस्वरूपी नसते, तर हितसंबंध कायमस्वरूपी असतात, असे अनेकदा म्हटले जाते. गेल्या काही दशकांमध्ये राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या आघाड्या, त्यातील बदलती निष्ठा आणि सत्तासमीकरणांनुसार होणारी राजकीय पुनर्रचना यामुळे हे विधान वारंवार खरे ठरले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस आणि द्रमुक यांच्यातील कथित दुरावा तसेच भविष्यात द्रमुकने तटस्थ भूमिका स्वीकारण्याची किंवा अगदी भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे (एनडीए) झुकण्याची शक्यता याविषयी चर्चा सुरू झाली आहे. या घडामोडी केवळ तामिळनाडूपुरत्या मर्यादित नाहीत, तर त्याचे परिणाम राष्ट्रीय राजकारणावरही होऊ शकतात. काँग्रेस आणि द्रमुक यांचे संबंध हे स्वतंत्र भारताच्या राजकीय इतिहासातील सर्वात दीर्घकालीन आणि प्रभावी राजकीय सहकार्यांपैकी एक मानले जात. द्रविड चळवळीच्या राजकीय वारशातून उदयाला आलेल्या द्रमुकने अनेकदा केंद्रातील काँग्रेसविरोधी भूमिका घेतली असली, तरी काळानुसार दोन्ही पक्षांमध्ये सहकार्याचे नवे अध्याय लिहिले गेले. विशेषतः १९८० नंतर आणि नंतरच्या संयुक्त पुरोगामी आघाडीच्या (यूपीए) काळात द्रमुक हा काँग्रेसचा महत्त्वाचा सहयोगी बनला. केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या संख्याबळात द्रमुकचे योगदान निर्णायक ठरत असे; मात्र राजकीय वास्तव सतत बदलत असते. आघाडीतील एखाद्या पक्षामध्ये स्वतःचा सन्मान, राजकीय वजन आणि प्रादेशिक हितसंबंध यांचा योग्य सन्मान होत नसल्याची भावना निर्माण झाली, तर तणाव अपरिहार्य ठरतो. द्रमुकच्या बाबतीतही अशीच परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसते.

अलिकडच्या काळात काँग्रेसने द्रमुकच्या अपेक्षांकडे दुर्लक्ष केले असेल किंवा निर्णयप्रक्रियेत अपेक्षित महत्त्व दिले नसेल, तर त्यातून नाराजी वाढणे स्वाभाविक आहे. द्रमुकची नाराजी ही केवळ भावनिक प्रतिक्रिया म्हणून पाहता येणार नाही. तामिळनाडूच्या राजकारणात द्रमुक हा एक प्रभावशाली आणि संघटित पक्ष आहे. त्याचे लोकसभेतील २२ आणि राज्यसभेतील आठ खासदार हे राष्ट्रीय पातळीवर लक्षणीय संख्याबळ मानले जाते. संसदेतील कोणत्याही महत्त्वाच्या विधेयकाच्या वेळी किंवा सत्तासंघर्षाच्या प्रसंगी हे संख्याबळ निर्णायक ठरू शकते. त्यामुळे द्रमुकने थेट विरोधाची भूमिका न घेता तटस्थता स्वीकारली, तरी भाजपला त्याचा अप्रत्यक्ष लाभ मिळू शकतो. भारतीय संसदीय व्यवस्थेत अनेकदा एखाद्या पक्षाचा पाठिंबा जितका महत्त्वाचा असतो, तितकीच त्याची तटस्थताही प्रभावी ठरते. सरकारविरोधी मतदानाच्या वेळी अनुपस्थित राहणे, काही मुद्द्यांवर स्पष्ट विरोध न करणे किंवा संसदीय प्रक्रियेत आक्रमक भूमिका टाळणे यामुळे सत्ताधारी पक्षाचे काम तुलनेने सोपे होते. द्रमुकने अशा प्रकारची भूमिका स्वीकारली, तर काँग्रेसच्या विरोधी राजकारणाला फटका बसू शकतो. काँग्रेस आणि द्रमुकची युती असली, तरी द्रमुकपुढे काँग्रेसला कायम दुय्यम भूमिका घ्यावी लागायची. केंद्रात काँग्रेसबरोबर मंत्रिमंडळात सहभागी होताना गेल्या सहा दशकांमध्ये काँग्रेसला राज्याच्या मंत्रिमंडळात कधीही सहभागी करून घेतले जात नव्हते. या वेळी विधानसभेच्या आधी काँग्रेसने मंत्रिमंडळात स्थान देण्याची तसेच सन्मानजनक जागा देण्याची मागणी केली होती; परंतु तमिळनाडूत आता आपल्याला कुणीच विरोधक उरले नाही, अशा थाटात स्टॅलिन यांचा कारभार होता. त्यामुळे काँग्रेसनेही द्रमुकपासून अंतर राखले.

विधानसभेच्या निवडणुकीत द्रमुकचा मोठा पराभव झाला. अशा वेळी अस्थिरतेच्या काळात निवडून आलेल्या पाच आमदारांच्या जीवावर सत्तेत सहभागी होता येत असल्यास संधी कशाला सोडायची, अशी काँग्रेसची मानसिकता झाली असल्यास नवल नाही. स्थानिक नेत्यांचे ऐकले नसते तर पाचही आमदार सत्तेबरोबर गेले असते आणि काँग्रेसवर नामुष्की ओढवली असती. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने 'टीव्हीके' या पक्षाबरोबर सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे संतप्त झालेल्या द्रमुकने सहा दशकांपासून असलेली काँग्रेसबरोबरची युती तोडली. सध्या या पक्षाने तटस्थतेची भूमिका घेतली असली, तरी अण्णाद्रमुक या मित्रपक्षात पडलेली फूट पाहता भाजप आणि द्रमुक एकत्र आले, तर आश्चर्य वाटायला नको. दुसरीकडे, भाजपच्या दृष्टीने पाहता दक्षिण भारतातील विस्तार हा दीर्घकालीन राजकीय उद्देश राहिला आहे. उत्तर आणि पश्चिम भारतात मजबूत पाया निर्माण केल्यानंतर भाजपने दक्षिणेकडे लक्ष केंद्रित केले आहे. कर्नाटकमध्ये सत्ता मिळवणे, तेलंगणामध्ये मताधिक्य वाढवणे आणि केरळ तसेच तामिळनाडूमध्ये संघटन विस्तार करणे या दिशेने पक्ष सातत्याने प्रयत्न करत आहे; मात्र तामिळनाडूमध्ये भाजपला अद्याप स्वतंत्रपणे मोठे यश मिळालेले नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे तेथील द्रविड राजकारणाची खोलवर रुजलेली परंपरा. अशा परिस्थितीत द्रमुकसारख्या प्रभावशाली प्रादेशिक पक्षाशी सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करणे भाजपसाठी फायदेशीर ठरू शकते. अर्थात, द्रमुक आणि भाजप यांची वैचारिक पार्श्वभूमी भिन्न आहे.

द्रविड अस्मिता, भाषिक स्वायत्तता, संघराज्यवाद आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवर द्रमुकची भूमिका पारंपरिकरीत्या भाजपपेक्षा वेगळी राहिली आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये औपचारिक आघाडी होईल, असे म्हणणे धाडसाचे ठरेल; तरीही भारतीय राजकारणात वैचारिक भिन्नतेवर राजकीय व्यवहारवाद अनेकदा मात करताना दिसला आहे. तामिळनाडूतील दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे अण्णाद्रमुकची सध्याची अवस्था. एके काळी द्रमुकला थेट आणि सक्षम आव्हान देणारा हा पक्ष गेल्या काही वर्षांमध्ये अंतर्गत संघर्ष, नेतृत्वावरील वाद आणि संघटनात्मक कमकुवतपणामुळे अडचणीत सापडला आहे. पक्षातील गटबाजी आणि फुटीमुळे त्याची राजकीय ताकद कमी झाल्याची धारणा निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय स्पर्धेचे स्वरूप बदलत आहे. अण्णाद्रमुक कमकुवत होत असताना भाजप स्वतःची स्वतंत्र ताकद वाढवण्याचा प्रयत्न करत आहे; मात्र तामिळनाडूसारख्या राज्यात प्रादेशिक पक्षांच्या प्रभावाशिवाय मोठी राजकीय झेप घेणे कठीण आहे. त्यामुळे भाजपला भविष्यात नव्या सहयोगींची गरज भासू शकते. द्रमुक आणि भाजप यांच्यातील संवाद वाढल्यास किंवा विशिष्ट मुद्द्यांवर सहकार्याची भूमिका निर्माण झाल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण राहणार नाही. राजकारणात 'शत्रूचा शत्रू तो मित्र' हे समीकरण अनेकदा दिसून येते. काँग्रेसने आपल्या राजकीय योगदानाचा पुरेसा सन्मान न केल्यास राजकीय संदेश देण्यासाठी द्रमुक पर्यायी मार्गांचा विचार करू शकतो. तटस्थता, विषयनिहाय सहकार्य किंवा भविष्यातील संभाव्य आघाडी हे त्यातील पर्याय असू शकतात.

अशा निर्णयामागे केवळ भावना नसून राजकीय गणित आणि दीर्घकालीन हितसंबंध महत्त्वाचे असतील; मात्र द्रमुकसमोरही काही आव्हाने आहेत. तामिळनाडूतील त्याचा मुख्य मतदारवर्ग सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि प्रादेशिक स्वाभिमान या मुद्द्यांशी जोडलेला आहे. भाजपशी अतिजवळीक निर्माण झाल्यास या मतदारवर्गात संभ्रम किंवा नाराजी निर्माण होऊ शकते. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना द्रमुकला आपल्या सामाजिक आधाररचनेचाही विचार करावा लागेल. पक्ष नेतृत्वासाठी हा संतुलनाचा कस लागणारा काळ असेल. काँग्रेससाठीही हा इशारा मानला पाहिजे. राष्ट्रीय स्तरावर प्रादेशिक पक्षांच्या पाठिंब्याशिवाय प्रभावी पर्याय उभा करणे कठीण आहे. विविध राज्यांमधील प्रादेशिक पक्ष त्यांच्या प्रदेशातील जनमताचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे त्यांच्याशी सन्मानपूर्वक आणि समन्वयाने संबंध ठेवणे काँग्रेससाठी महत्वाचे आहे. सहयोगी पक्षांच्या अपेक्षा, स्थानिक वास्तव आणि नेतृत्वाच्या आकांक्षा यांचा योग्य विचार न झाल्यास आघाडीची एकजूट कमकुवत होऊ शकते. याउलट, भाजप या परिस्थितीकडे संधी म्हणून पाहू शकतो. विरोधी आघाड्यांमधील मतभेद वाढवणे, नाराज पक्षांशी संवाद ठेवणे आणि राष्ट्रीय राजकारणात स्वतःचे संख्याबळ सुरक्षित ठेवणे ही कोणत्याही सत्ताधारी पक्षाची नैसर्गिक रणनीती असते.

द्रमुकने थेट 'एनडीए'मध्ये प्रवेश केला नाही, तरी त्याची मवाळ भूमिका किंवा तटस्थतादेखील भाजपसाठी लाभदायक ठरू शकते. आगामी काळात संसदेतील महत्त्वाची विधेयके, राष्ट्रपती किंवा उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुका तसेच राष्ट्रीय स्तरावरील राजकीय घडामोडी या संदर्भात द्रमुकची भूमिका विशेष लक्षवेधी ठरेल. आजच्या बहुपक्षीय राजकारणात मध्यम आकाराच्या प्रादेशिक पक्षांकडेही सत्ता-समीकरणे बदलण्याची क्षमता असते. एकूणच, काँग्रेस आणि द्रमुक यांच्यातील वाढता दुरावा हा केवळ दोन पक्षांमधील मतभेदांचा विषय नाही, तर भारतीय राजकारणातील बदलत्या प्रवाहांचे प्रतीक आहे. आघाड्यांचे राजकारण, प्रादेशिक पक्षांचे वाढते महत्त्व, राष्ट्रीय पक्षांची विस्तारनीती आणि सत्तेसाठीची नवी समीकरणे यांचा तो भाग आहे. द्रमुक तातडीने 'एनडीए'मध्ये सहभागी होईल, असे म्हणणे घाईचे ठरेल; परंतु तटस्थता स्वीकारणे, मुद्द्यानुसार भूमिका बदलणे किंवा भविष्यातील नव्या राजकीय शक्यता खुल्या ठेवणे हे पर्याय त्याच्यासमोर नक्कीच आहेत.

चर्चा आजची

# वृक्षारोपणाबरोबर संवर्धन गरजेचे

अंतरा पारंगे

विकासाच्या नावाखाली आज पर्यावरणीय साधनांना अक्षरशः पायदळी तुडवल्याचे दिसून येत आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण यामुळे पाणी, जमीन, हवा या सगळ्यांमधील प्रदूषणाची पातळी वाढत असल्याचे पाहावयास मिळत आहे. हवा, पाणी आणि माती यांचे प्रदूषण मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे. शुद्ध पर्यावरण असेल तरच निरोगी जीवन जगणे शक्य आहे. सजीव आणि निर्जीव घटकांमधील समतोल टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. मानवाच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे व प्रदूषणामुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे, मानवी आरोग्य, हवामान बदल आणि भावी पिढ्यांचे अस्तित्व यासाठी पर्यावरण संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. आणि पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षरोपणाबरोबर संवर्धन गरजेचे आहे.

यंदाच्या उन्हाळ्यात अनेक भागांत विक्रमी तापमानाची नोंद झाली असून काही ठिकाणी उष्माघाताच्या घटनाही घडल्या आहेत. आपण दरवर्षी म्हणतो, यावर्षी उष्णता अधिक आहे. जंगलतोड आणि प्रदुषणामुळे जागतिक तापमानवाढ वाढत आहे. यासाठी जास्तीत जास्त झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संवर्धन करणेही तितकेच गरजेचे आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अनेक ठिकाणी वृक्षारोपणासारखे उपक्रम राबविले जातात. निसर्ग संवर्धन ही काळाची गरज आहे, झाडे लावा, झाडे जगवा अशा अनेक मोठ-मोठ्या घोषणा दिल्या जातात. तसेच वृक्षारोपण करतानाचे फोटो काढून गाजावाजा केला जातो. मात्र केवळ फोटो काढण्यासाठी वृक्षारोपण न करता प्रत्येकाने एक तरी झाड लावून, ते मोठे होईपर्यंत त्याची निगा राखणे महत्वाचे आहे.

दिवसेंदिवस वाढणारा दुष्काळ, पाणीटंचाई, अनियमित पाऊस आणि वाढते तापमान यामुळे पर्यावरण संतुलनाचा प्रश्न अधिक गंभीर होत चालला असल्याचे दिसून येत आहे. पर्यावरणाचे हे बिघडलेले संतुलन पाहून मग अनेक योजना आणि उपक्रम उदयास येतात. जसे की, पाणी आडवा, पाणी जिरवा, एक मूल, एक झाड, प्लास्टिक बंदी, सामाजिक वनीकरण, स्वच्छता अभियान, पाटबंधारे अशा एक ना अनेक उपक्रम आणि योजना सुरु असतात.

जागतिक पर्यावरण दिन आणि पावसाळा जवळ आल्यावर करोडो रोपांची लागवड करण्याचा मानस शासनाकडून केला जातो. ग्रामीण व शहरी पातळीवरील सर्वच यंत्रणा या अभियानामध्ये सहभागी होऊन वृक्षारोपणाकडे भर देतात. शासकीय यंत्रणेसह सामाजिक, शैक्षणिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षकही या उपक्रमात उत्स्फुर्तपणे सहभागी होतात. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांची महत्वपुर्ण भुमिका आहे. त्यामुळे झाडांची लागवड करण्याबरोबरच त्यांचे संवर्धनही करणे महत्वाचे आहे. मात्र नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे हा कारभार चालत असल्याचे चित्र आजही समाजात आहे. जिल्ह्यातील रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे विकासाच्या नावाखाली नष्ट करण्यात आली आहे. सिमेंटचे जंगल उभे राहू लागले आहे. वन क्षेत्रातदेखील मोठ मोठे बंगले, इमारती मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहेत. त्यामुळे वन क्षेत्रही दिवसेंदिवस कमी होत आहे. झाडांची विकासाच्या नावाखाली कटाई होते. परंतू त्या जागी अन्य झाडांची लागवड फक्त कागदावर असल्याचे चित्र आजही आहे. वृक्षारोपण अभियानाच्या निमित्ताने लाखो रुपये खर्च केले जातात. परंतू हा सर्व खर्च पुन्हा वाया जात आहे. रोपांचे संगोपन आणि संवर्धन करण्यास शासकीय यंत्रणा उदासीन ठरत आहे. त्याचा परिणाम वातावरणात अमुलाग्र बदल होत आहे. झाडांची सावली गायब झाल्याने कडक उन्हातून ये-जा करण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. ३५ अंश सेल्सिअसचे असलेले तापमान आता ४० पेक्षा अधिक वाढत आहे. रस्त्यांच्या दूतर्फा असलेल्या सावलीचा आधार सिमेंटच्या जंगलाने नष्ट केला आहे.

वृक्षारोपण करीत असताना त्यांचे संवर्धनही करणे तितकेच गरजेचे आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. वनाचे क्षेत्रही सुरक्षीत ठेवण्यासाठी वन विभागानेदेखील पुढाकार घेणे आवश्यक आहे. अन्यथा भविष्यात जंगल, वनांमधील प्राणी मानवी वस्तीमध्ये यायला वेळ लागणार नाही. झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश आता फक्त कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. झ्झाडे तोडा सिमेंटचे जंगल वाढवाफ अशी परिस्थिती सध्या आहे. परंतु याबाबत गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

लोकसंसद

## लाडकी बहीण योजना अपात्र

लाडकी बहीण योजना विधानसभेच्या निवडणुकी अगोदर घोषित झाली. त्यावेळी अनेक महिलांनी अर्ज केले. ज्या अटी सरकारने ठरविल्या होत्या, त्याप्रमाणे ही योजना सुरु झाली. विशेष म्हणजे स्वघोषणापत्राच्या आधारे हे अर्ज स्वीकारले गेले. त्याचा फायदा अनेकांनी घेतला. विशेष म्हणजे ही योजना केवळ लाडक्या बहिणीसाठीच होती. पण त्याचा फायदा तब्बल चौदा हजार पुरुषांनी घेतला अनेक सरकारी नोकरीतील लाभार्थी या योजनेचा फायदा घेऊन गेले. या योजनेसाठी उत्पन्नाची अट अडीच लाख एवढी होती. तथापि या उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिलांनी या योजनेचा फायदा गेले सुमारे २२ महिने घेतला अशांची संख्या दहा लाख एवढी प्रचंड आहे एका बातमीनुसार ५ लाख अपात्र महिलांकडून रक्कम वसूल न करण्याची भूमिका सरकारने घेतली आहे हे सारे पैसे सरकारचे म्हणजे जनतेचे आहेत जे जनतेकडून वसूल करण्यात आले आहेत केवळ मते जातील या भावनेतून परत वसूल न करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे तो कितपत योग्य आहे? वास्तविक पाहता ज्या वेळी योजना सुरु झाली त्यावेळी त्याचे चेकिंग न करताच ती कार्यवाहीत करण्यात आली होती काय? २६ हजार कोटी रुपयातून अनेक कल्याणकारी योजना राबविता आल्या असत्या येणाऱ्या अधिवेशनात विरोधी आघाडीने हा प्रश्न धसास लावला पाहिजे


– शांताराम वाघ, पुणे

# रायगड जिल्ह्याचा 'एनसीसी मॅन' हरपला

जयंत पाटील

खारेपाटातील शहाबाज गावचे ज्येष्ठ शिक्षक, शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व आणि विद्यार्थ्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे टी.डी. पाटील सर यांच्या निधनाने शैक्षणिक, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. एनसीसी क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावरील सन्मान मिळविणारे आणि हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. इंग्रजी विषयावर प्रभुत्व, प्रभावी अध्यापनशैली आणि विद्यार्थ्यांमध्ये शिस्त रुजविण्याची हातोटी यामुळे टी.डी. पाटील सर हे विद्यार्थ्यांसाठी केवळ शिक्षक नव्हते, तर प्रेरणास्थान होते. अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी पोलीस दल, सैन्य दल आणि विविध शासकीय सेवांमध्ये जाण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज उच्च पदांवर कार्यरत आहेत. सुरवातीला ते उरणमध्ये नोकरी करीत होते.

स्व.ना.ना.पाटील यांनी त्यांना पोयनाड हायस्कूलमध्ये आणले आणि ते शेवटपर्यंत राहिले. टी.डी. पाटील यांनी शेवटपर्यंत शिक्षण क्षेत्रात योगदान दिले. त्यांचा दरारा असा होता की, ते वर्गात आले की विद्यार्थ्यांमध्ये शांतता पसरत असे; मात्र त्या दराऱ्यामागे विद्यार्थ्यांबद्दल असलेली माया आणि त्यांना घडविण्याची तळमळ होती. गरीब परिस्थितीतून स्वतःचा संघर्ष करत उभे राहिलेले टी.डी. पाटील यांनी सामाजिक आणि राजकीय बांधिलकीही जपली. शेकापच्या विचारांशी अखेरपर्यंत निष्ठावान राहणारे पाटील सर यांनी कधीही आपल्या तत्वांशी तडजोड केली नाही. खारेपाटातील पोयनाडचे मामलेदार पाटील यांच्या नातीसोबत त्यांचा विवाह झाला. ते घराणे एक प्रतिष्ठित



घराणे म्हणून तेव्हापासून ते आजपर्यंत ओखळले जाते. त्या कुटूंबाची एक वेगळी छाप होती. टी.डी.पाटील त्या कुटूंबांचे जावई झाले, हे पाहून अनेक लोकांना त्यावेळी आश्चर्य वाटले. आठवीत असताना वक्तृत्व स्पर्धेत मी भाग घेतला होता. लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त मी भाषण केले. ते प्रभावी भाषण ऐकून पाटील सरांनी पाठ थोपटली. ज्यावेळी विधिमंडळात पहिल्यांना उत्कृष्ट संसदपटू म्हणून सन्मान करण्यात आला, त्यावेळी सरांच्या शाबासकीची आठवण झाली. घरी परतल्यावर त्यांनी मला आशीर्वाद दिला. त्यांच्या शिकवणीमुळे हा सन्मान मिळाल्याचे सांगताच त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले. त्यांना झालेला आनंद माझ्या कामाची पोचपावती आहे.

क्रीडा क्षेत्रातही त्यांचे योगदान तितकेच मोठे होते. कबड्डी, विविध खेळ आणि एनसीसी क्षेत्रात त्यांनी असंख्य खेळाडू घडवले. खालापूरचे माजी नगराध्यक्ष संतोष जंगम यांचे वडील गुरुनाथ जंगम यांना घडविण्यामागे टी.डी. पाटील सरांचा मोठा वाटा होता. त्यांच्या कठोर शिस्तीच्या आणि मार्गदर्शनाच्या तालमीत गुरुनाथ जंगम यांनी महाराष्ट्रातील अव्वल एनसीसी कॅडेट म्हणून नाव कमावले. राज्यस्तरापुरतेच नव्हे, तर राष्ट्रीय पातळीवरही त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. मात्र, पाटील सरांचे योगदान इतक्यावर थांबले नाही. एनसीसीमधील यशानंतर त्यांनी गुरुनाथ जंगम यांना पोलीस सेवेत जाण्यासाठी मार्गदर्शन केले आणि त्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली. विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण देणे नव्हे, तर त्यांचे भविष्य घडवणे, हीच टी.डी. पाटील सरांची खरी ओळख होती. त्यांच्या विद्यार्थ्यांच्या आठवणी आजही जिवंत आहेत. त्यांच्या निधनानंतर अनेक जुने मित्र, विद्यार्थी आणि सहकारी श्रद्धांजली वाहण्यासाठी घरी आले. "इतके लोक भेटायला आले की, त्यांना सगळ्यांना ओळखतही नव्हतो," असे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची व्याप्ती पुन्हा एकदा समोर आली. पाटील सरांचे शहाबाजचे बालमित्र आगरी समाजासाठी झटणारे भाऊ पाटील, आदर्श शिक्षक गोपीनाथ पाटील यांची जीवलग मैत्री होती. त्यांनी शेवटपर्यंत मैत्री जपल्याचे आम्ही बघितलं. स्व. नाना पाटील यांनी अनेक शिक्षक घडविले. पण टी.डी. पाटील हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होतं, हे आमचे खारेपाट विसरू शकणार नाही. पाटील सर यांनी घडवलेले विद्यार्थी, रुजवलेली शिस्त, दिलेली मूल्ये आणि शिक्षण क्रीडा क्षेत्रातील योगदान यामुळे खारेपाट त्यांना कधीच विसरणार नाही. खऱ्या अर्थाने खारेपाटातील एक रत्न काळाच्या पडद्याआड गेले आहे. माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात त्यांनी प्रेरणा निर्माण केली. यश मिळाल्यावर त्यांनी दिलेली शाबासकी, पाठीवर मारलेली थाप आणि डोळ्यांमध्ये दिसणारा आनंद आजही आठवतो. त्यांच्या निधनाने खारेपाटाने एक शिक्षक नाही, तर एक संस्कारवंत व्यक्तिमत्त्व गमावले आहे. आज ते आपल्यात नसले तरी त्यांनी घडवलेली पिढी आणि दिलेले संस्कार कायम त्यांची आठवण करून देत राहतील. टी.डी. पाटील सरांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# भातशेती लागवडीचे प्रमाण घटले

## • ‘भाताची कोठार’ होऊ लागली ‘पर्यटन निवास’

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

‘भाताचे कोठार’ अशी ओळख असलेल्या श्रीवर्धन तालुक्यात आता झपाट्याने बदल होत असून भातशेती लागवडीचे प्रमाण घटले आहे. शेतकरी आता पर्यटन व्यवसायाकडे वळू लागला असून भातशेतीच्या अनेक जमिनीवर ‘पर्यटन निवास’ दिसायला लागली आहेत.

अधिक ज्येष्ठाचे वेध लागले की शेतकरी वर्गाची जमीन मशागत, भातबीयाणे खरेदी व पेरणी साठी लगबग असायची. मात्र, बदलते हवामान, मजुरांची टंचाई, वाढलेला उत्पादन खर्च आणि त्या तुलनेत भाताला मिळणारा कमी भाव यांमुळे शेतकरी हवालदिल झाला होता. पारंपरिक शेती आता आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने शेतकऱ्यांना पर्यटन व्यवसाय या माध्यमातून वर्षभर खात्रीशीर उत्पन्नाचे स्रोत मिळाले आहे. पर्यटन व्यवसायातील बारमाही नफा ओळखून बहुतांश शेतकऱ्यांनी आपल्या जमिनींवर



पर्यटन निवास उभारण्यास सुरुवात केली. ज्या जमिनींवर कधीकाळी भाताची सुगी व्हायची, तिथे आता रिसॉर्ट्स, हॉटेल्स उभी राहिली आहेत.

श्रीवर्धन तालुक्यातील भातशेती कमी होण्याची अनेक कारणे आहेत. जसे की, श्रीवर्धन तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर तरुण पिढी नोकरी-रोजगारासाठी मुंबई, पुणे शहरात स्थलांतरित झाली आहे. यामुळे गावांत केवळ वयोवृद्ध शेतकरी राहिले असून शेतीसाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ मिळेनासे झाले आहे.

निसर्गाच्या लहरीपणाचा फटका भात शेतीला सर्वाधिक बसत आहे. ऐन भात कापणीच्या काळात दरवर्षी परतीचा मुसळधार पाऊस किंवा अवकाळी पाऊस हजेरी लावतो.यामुळे हातातोंडाशी आलेले भात पीक शेतातच कुजते किंवा जमिनीवर लोळते.

ग्रामीण आणि डोंगराळ भागांमध्ये रानडुक्कर, माकडे आणि इतर वन्यप्राण्यांचा उपद्रव खूप वाढला आहे. रात्रीच्या वेळी रानडुकरे उभी पिके नष्ट करतात. वर्षभर मेहनत करूनही एका रात्रीत पीक उद्ध्वस्त होत असल्याने बहुतांश शेतकरी भात शेती करण्याऐवजी जमीन पडीक ठेवणे पसंत करत आहेत.

पर्यटनस्थळ म्हणून श्रीवर्धनचा विकास होत असल्याने जमिनींचे भाव गगनाला भिडले आहेत. काही शेतकऱ्यांनी आपल्या भात शेतीच्या जमिनी मुंबई-पुण्यातील विकासक किंवा गुंतवणूकदारांना विकल्या आहेत. या जमिनींवर आता रिसॉर्ट्स, फार्महाऊस किंवा इतर बांधकामे उभी राहत आहेत, ज्यामुळे शेतीचे क्षेत्र कमी झाले आहे. श्रीवर्धन तालुक्यातील भातशेतीचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालल्याने भविष्यात तांदूळासाठी इतर तालुक्यांवर अवलंबून रहावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### शेतकरी वर्गाची निराशाजनक प्रतिक्रिया

भात शेतीसाठी ट्रॅक्टरने नांगरणीचे दर परवडत नाही. मशागत, पेरणी आणि कापणीकरीता मनुष्यबळाची आवश्यकता असते. परंतु मनुष्यबळाची कमतरता, वाढते मजुरी दर त्यातच बियाणे व खते यांचे वाढणारे दर, त्या तुलनेत भाताला बाजारभाव कमी मिळतो. शेतीत जितका पैसा खर्च करतो, तितका परतावा मिळत नाही. यामुळे शेतकरी वर्ग इतर पर्याय शोधू लागले आहेत, अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून उमटत आहे.

---

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ जून

१) श्री. विनायक महादेव बर्वे अलिबाग, ६-६-१९४९
२) डॉ. उषा रमेश मालपाणी कामार्ले, अलिबाग, ६-६-१९४२
३) श्री. राजेंद्र दत्तात्रेय पाटील अलिबाग, ६-६-१९५५
४) नागेश अंबादास वंजारे चेंढरे, अलिबाग, ६-६-१९५६

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



१. कै. लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग

श्री. सतीश नारायण कर्वे, वाढदिवस अलिबाग

श्री. निनाद राजेंद्र देव, वाढदिवस अलिबाग

---



## चिल्हे विद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम

| खांब-रोहा | प्रतिनिधी |

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण विभाग रोहा यांच्या वतीने पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमात पर्यावरण जनजागृती याबाबत वन अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करून वृक्षारोपण करण्यासाठी आवाहन केले. तर विद्यार्थी वर्गानेही पर्यावरण रक्षण काळाची गरज याबाबत माहिती सांगितली. त्यानंतर विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धनाचा संदेश दिला. अनेक वर्षांपासून सामाजिक वनीकरण विभाग रोहा व चिल्हे विद्यालय विविध उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करत आहे.

## आरसीएफतर्फे बाटली संकलन बिन्सचे वितरण

| अलिबाग | प्रतिनिधी |

प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालणे आणि समुद्रकिनारे तसेच सार्वजनिक परिसर अधिक स्वच्छ ठेवण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आर.सी.एफ.) तर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अलिबाग तालुक्यात चार मोठ्या आकाराच्या बाटली संकलन बिन्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

याअंतर्गत किहीम, नागाव आणि वरसोली या समुद्रकिनाऱ्यांवर प्रत्येकी एक तसेच अलिबाग शहरातील एस. टी. बसस्थानक परिसरात एक अशा एकूण चार बाटली संकलन बिन्सचे वितरण करण्यात आले आहे.




समुद्रकिनारे आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकच्या बाटल्यांचा कचरा साचत असल्याने पर्यावरणास तसेच सागरी जीवसृष्टीस धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर आरसीएफने सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून हा पुढाकार घेतला आहे.

या उपक्रमांतर्गत बाटली संकलन बिन्सची उपलब्धता आर. सी. एफ. कडून करण्यात आली असून त्यामधील प्लास्टिक कचऱ्याचे नियमित संकलन व व्यवस्थापन संबंधित ग्रामपंचायती तसेच अलिबाग नगरपालिकेमार्फत केले जाणार आहे. त्यामुळे आरसीएफ, ग्रामपंचायती आणि नगरपालिका यांच्या संयुक्त प्रयत्नातून परिसर स्वच्छ ठेवण्यास आणि प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यास मोठी मदत होणार आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनीही प्लास्टिकच्या बाटल्या व इतर कचरा सार्वजनिक ठिकाणी न टाकता या बिन्समध्येच जमा करावा, असे आवाहन आरसीएफतर्फे करण्यात आले आहे.

## विकासाच्या नावाखाली गावपण हरवू देऊ नका

### विलास गावंड यांचे आवाहन

| अलिबाग | प्रतिनिधी |

ग्रामीण भागातील शेतजमिनी, पर्यावरण आणि सामाजिक जीवनावर वाढत्या नागरीकरणाचा होणारा परिणाम लक्षात घेता, सामाजिक कार्यकर्ते विलास सीताबाई हसुराम यांनी ग्रामस्थांना जागृत राहण्याचे आणि आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठी संघटित होण्याचे आवाहन केले आहे.



ग्रामस्थांशी संवाद साधताना विलास गांवड म्हणाले की, आपल्या पूर्वजांनी अथक परिश्रमातून निर्माण केलेल्या सुपीक शेतजमिनी, आज विकासाच्या नावाखाली हस्तगत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र या जमिनी केवळ मालमत्ता नसून त्या आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि उपजीविकेचा आधार आहेत. त्यामुळे कोणताही विकास आराखडा राबविताना स्थानिकांच्या हिताचा आणि पर्यावरणाचा विचार होणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, मोठे महामार्ग, उंच इमारती आणि नागरी सुविधा यांनाच विकासाचे मोजमाप मानणे योग्य नाही. आज शहरांमध्ये राहणारे अनेक लोक शांतता, स्वच्छ हवा आणि निसर्गाच्या शोधात ग्रामीण भागाकडे येत आहेत. अशा वेळी गावातील नैसर्गिक संपत्ती आणि जीवनमूल्ये जपण्याची जबाबदारी आपलीच आहे.

‘गाव म्हणजे केवळ घरांची वस्ती नसते. तेथे नातेसंबंध, जिव्हाळा, परस्पर सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी असते. संकट काळात, सुख-दुःखात संपूर्ण गाव सहभागी होते. हीच ग्रामीण संस्कृतीची खरी ताकद आहे. नागरीकरणाच्या वेगात ही मूल्ये हरवू नयेत, असे त्यांनी सांगितले.

## अनधिकृत नर्सरी, शेडवर सिडकोची कारवाई

| पनवेल | प्रतिनिधी |

खारघर सेक्टर-२९ येथील कॉर्पोरेट पार्कसाठी राखीव असलेल्या सिडकोच्या भूखंडावरील अनधिकृत बांधकामांवर सिडकोने मोहीम राबविली. या कारवाईदरम्यान अंदाजे २० हजार चौरस मीटर क्षेत्रावरील तीन अनधिकृत नर्सरी शेड, तीन पत्रा शेड तसेच दोन पक्क्या विटांच्या बांधकामांचे निष्कासन करण्यात आले.

सिडकोच्या नियंत्रक, अनधिकृत बांधकामे विभागामार्फत ही मोहीम राबविण्यात आली. संबंधित बांधकामे सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचे उल्लंघन करून तसेच सिडकोची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आली होती. त्यामुळे नियोजित विकासकामांमध्ये अडथळा निर्माण होत असल्याने मुख्य दक्षता अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार मुख्य नियंत्रक विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर नोडचे नियंत्रक श्रीकांत पावसकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

## घारीला जीवदान



| चिरनेर | प्रतिनिधी |

कोपरखैरणेतील सेक्टर - १४ मधील निसर्ग उद्यानात वाढत्या उष्णतेमुळे पाण्याच्या शोधात आलेला घार जातीचा पक्षी गुरुवारी (दि.४) अडगळीच्या जागेत चक्कर येऊन पडला होता. ही गोष्ट नवी मुंबई महानगरपालिकेचे माळी कामगार संदिप गणपत वेटा व संतोष मधुकर पाटील यांच्या निदर्शनास येताच, त्यांनी या जखमी घारेला पाणी पाजून सुश्रुषा केली. त्यानंतर काही वेळाने घार पक्ष्याला निसर्गाच्या सानिध्यात सोडून दिले, अशी माहिती अविनाश भरत पाटील यांनी दिली.

## रेल्वे स्थानकाबाहेर चोरट्यांचा धुमाकूळ

**पनवेल :** बामणडोंगरी रेल्वे स्थानकाबाहेर दुचाकी चोरीच्या अनोख्या प्रकारामुळे वाहनधारकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानकाबाहेर पार्क केलेल्या दुचाकींमधील महत्त्वाचा मानला जाणारा ईसीएम (इलेक्ट्रॉनिक कंट्रोल मॉड्युल) हा भाग चोरण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. एका तरुणाने दुचाकी बामणडोंगरी रेल्वे स्थानकाबाहेर उभी करून पुढील प्रवासासाठी गेला होता. परत आल्यानंतर वाहन सुरू होत नसल्याने तरुणाने तपासणी केली असता इसीएमचा भाग गायब असल्याचे समोर आले.

## पर्यावरण दिनानिमित जंगल स्वच्छता

| नेरळ | प्रतिनिधी |

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरणप्रेमी राकेश कोकळे यांनी माधवजी पॉईंटच्या खालच्या जंगल परिसरात स्वच्छता अभियान राबविले. या अभियानातून माथेरान प्लास्टिकमुक्त करण्याचा छोटासा प्रयत्न करण्यात आला. या परिसराची सद्यस्थिती अत्यंत चिंताजनक असून जंगलामध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक व इतर कचरा साचलेला आढळून येत आहे. पर्यावरणप्रेमी राकेश कोकळे यांनी स्थानिक नागरिकांना पर्यावरण दिनानिमित स्वच्छतचे आवाहन केले.



जंगलातील कचरा याबाबत माथेरानचे संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच जबाबदार यंत्रणांनी पर्यावरण दिनाचे औचित्य साधून माधवजी पॉईंटच्या खालच्या जंगल परिसराची तात्काळ पाहणी करावी आणि आवश्यक स्वच्छता व संवर्धनात्मक उपाययोजना हाती घ्याव्यात, अशी मागणी केली आहे. अन्यथा या परिसरातील नैसर्गिक सौंदर्य, जैवविविधता आणि पर्यावरण धोक्यात येण्याची भीती आहे. माथेरान हे केवळ पर्यटनस्थळ नाही, तर एक अमूल्य नैसर्गिक वारसा आहे. त्याचे संरक्षण आणि संवर्धन करणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असा संदेशही त्यांनी दिला.

## इसम बेपत्ता

**पनवेल :** घरात झालेल्या भांडणाचा राग मनात धरून एक इसम कोठेतरी निघून गेले, ते परत आले नाहीत. याबाबत ते हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. दिनेश तुकाराम सावंत वय ५२ वर्षे, रा. उसर्ली खुर्द, रंग-सावळा, उंची अंदाजे ६ फुट ५ इंच, अंगाने जाड, चेहरा गोल, नाक-सरळ, डोळे काळे, सफेद रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट, काळ्या रंगाची पॅन्ट, काळया रंगाचे बुट परीधान केलेला, भाषा मराठी व हिंदी बोलतात. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा.

---

### शेतकऱ्यांनी तात्काळ अर्ज करावेत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे आवाहन

# महाडीबीटी पोर्टलवर बियाण्यांचे वितरण

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. खरीप हंगामासाठी आवश्यक असलेली प्रमाणित बियाणे आता महाडीबीटी पोर्टलवर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर



जाऊन तात्काळ अर्ज करावेत, असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

राज्यात यंदा खरीप हंगाम प्रमाणित बियाणे व प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांना विविध पिकांची गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यामध्ये सोयाबीन, मूग, उडीद, भूईमुग, बाजरी आणि कापूस या प्रमुख पिकांचा समावेश आहे.तसेच या कार्यक्रमांतर्गत राज्यभरात तब्बल २ लाख प्रात्यक्षिके राबविण्यात येणार असून त्याद्वारे शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञान, आधुनिक कृषी पद्धती आणि गुणवत्तापूर्ण निविष्ठांचा प्रत्यक्ष अनुभव दिला जाणार आहे.

योजनेअंतर्गत राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी सुमारे ३ लाख क्विंटल बियाण्यांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामध्ये ६६ हजार ७५० क्विंटल सोयाबीन तसेच ३५ हजार ५०० क्विंटल भूईमूग बियाण्यांचा समावेश असून इतर खरीप पिकांची बियाणेदेखील महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध राहणार आहेत.

यामुळे बियाणे वाटप प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, सुलभता आणि वेग येणार आहे.

> **“ खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठा उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल व्यवस्थेच्या माध्यमातून कृषी सेवा थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन खरीप हंगामाची तयारी वेळेत पूर्ण करावी.**
> **– दत्तात्रय भरणे, कृषी मंत्री ”**

---

## निवडक



### अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

**वावोशी :** खालापूर तालुक्यातील परखंदे (अहिल्यानगर) येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज, मल्हारराव होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमास विविध मान्यवरांनी उपस्थिती लावून अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने रात्री प्रबोधनात्मक भजनांचा डबल बारी सामना आयोजित करण्यात आला होता. या भजनांच्या कार्यक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत भरभरून दाद दिली. या कार्यक्रमामुळे परिसरात सामाजिक ऐक्य, इतिहासाविषयी जागरूकता आणि महापुरुषांच्या विचारांचा प्रसार करण्याचे कार्य घडून आल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



### एसटी ज्येष्ठ नागरिक पास नोंदणी शिबीर

**पनवेल :** पनवेल ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने संघाच्या सभागृहात ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष एस.टी. ज्येष्ठ नागरिक सवलत पास नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून लाभ घेतला. शिबिरामध्ये पाससाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरण्यासाठी स्वयंसेवकांनी मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे महिला ज्येष्ठ नागरिकांचाही उत्स्फूर्त सहभाग लाभला. अनेक ओळखीचे व प्रतिष्ठित ज्येष्ठ नागरिक या उपक्रमात सहभागी झाल्याने शिबिराला सामाजिक एकोप्याचे स्वरूप प्राप्त झाले. पनवेल ज्येष्ठ नागरिक संघाच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक करत, अशा लोकहिताच्या शिबिरांचे नियमित आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी संघ सातत्याने विविध उपक्रम राबवत असून, या शिबिरामुळे अनेकांना एस.टी. प्रवास सवलतीचा लाभ घेणे अधिक सुलभ झाले आहे.



### वडाळे तलावाची दूरवस्था

**पनवेल :** जगभरात जागतिक पर्यावरण दिन विविध उपक्रमांनी साजरा होत असताना, पनवेल शहरातील ऐतिहासिक पेशवेकालीन वडाळे सरोवराची मात्र दुरवस्था पाहून नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. सरोवर परिसरात मोठ्या वृक्षांचे पडलेले खोड अद्यापही हटविण्यात आलेले नाही. तसेच सरोवरातील पाण्याचे कारंजे अनेक दिवसांपासून बंद असून, सौंदर्यवर्धनासाठी उभारण्यात आलेल्या लाईट व्यवस्था व त्यावरील बटरफ्लाय आकर्षणही मोडकळीस आले आहे. विशेष म्हणजे या परिसरात दररोज सकाळी आणि सायंकाळी पनवेल महानगरपालिकेचे अनेक अधिकारी व कर्मचारी फेरफटका मारण्यासाठी येत असतात. तरीदेखील या समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. पर्यावरण संवर्धनाचे संदेश देण्याबरोबरच शहरातील नैसर्गिक व ऐतिहासिक वारशाचे जतन करणेही तितकेच महत्त्वाचे असून जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने तरी वडाळे सरोवराच्या सुशोभीकरण व देखभालीकडे पालिका प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.



### तळोजात पर्यावरण दिन साजरा

**पनवेल** : री सस्टेनेबिलिटी लिमिटेडच्या मुंबई वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्पात (एमडब्ल्यूएमपी) जागतिक पर्यावरण दिन विविध पर्यावरणपूरक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. एमआयडीसी तळोजा येथे आयोजित कार्यक्रमात शासकीय अधिकारी, पोलीस प्रशासन, आरोग्य क्षेत्रातील मान्यवर, कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि जबाबदार कचरा व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, श्रमदान, पर्यावरण संरक्षणासाठी स्वाक्षरी अभियान, कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती तसेच ‘बेस्ट आऊट ऑफ वेस्ट’ प्रकल्पाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. वृक्षारोपण मोहिमेत शेकडो रोपांची लागवड करण्यात आली. स्वच्छता आणि जनजागृती उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली. यावेळी बोलताना सोमनाथ माळगर यांनी पर्यावरण संवर्धन ही केवळ उद्योगांची नव्हे, तर समाज आणि प्रशासनाचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. परिपत्र अर्थव्यवस्था आणि शाश्वत पर्यावरणीय उपाययोजनांप्रती कंपनी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचा समारोप सर्व उपस्थितांनी पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छतेची सामूहिक शपथ घेऊन करण्यात आला.

### प्रदीप पवारांना पुरस्कार प्रदान

**महाड :** राजिप शाळा धारवली, ता.पोलादपूरचे मुख्याध्यापक प्रदीप पवार यांना यंदाचा मानाचा महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. वन व्हिजन फॅमिली आणि दर्शन प्रॉडक्शन्स यांच्या संयुक्त विद्यमाने, धडाडीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून पुण्याच्या ऐतिहासिक पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन (घोले रोड, पुणे) येथे या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक दिग्गजांच्या उपस्थितीत हा त्यांना सन्मानपूर्वक गौरविण्यात आले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करणाऱ्या एका खऱ्या शिक्षकाचा झालेला हा सन्मान संपूर्ण शिक्षण क्षेत्राची मान उंचावणारा ठरला. मूळचे सातारा जिल्ह्यातील बावडा (ता.खंडाळा) गावचे रहिवासी प्रदीप पवार यांनी अत्यंत गरिबीतून आणि कष्टांतून आपले शिक्षण पूर्ण केले आणि २६ जून १९९८ रोजी त्यांनी प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरीची सुरुवात केली. त्यांनी आपल्या २८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाकाळात रायगड जिल्ह्यातील पोलादपूर, श्रीवर्धन आणि महाड तालुक्यातील अत्यंत दुर्गम व डोंगराळ भागातील शाळांचा लोकसहभागातून चेहरामोहरा पूर्णपणे बदलून टाकला. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊनच त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# एक पेड... कर्जत के नाम

## उपक्रमातून पर्यावरण वाचविण्याचा संकल्प

**| नेरळ | प्रतिनिधी |**

'एक पेड... कर्जत के नाम' उपक्रमातून पर्यावरण वाचविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कर्जतमध्ये वृक्षलागवडीचा जागर भरणार आहे. दरम्यान, कर्जत तालुक्यात प्रकल्प उभारण्यासाठी लाखो झाडे तोडली जाणार असल्याने आम्ही कर्जतकर लाखो झाडे लावणार आहोत असा निर्धार कर्जत पर्यावरण बचावकडून करण्यात आला आहे.

जागतिक पर्यावरण दिनी कर्जत तालुक्यात एक पेड कर्जत पर्यावरण वाचवण्यासाठी अशी चळवळ राबविली जाणार आहे. टोरेंट, कोंढाणा, पोशिर आणि शिलार प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल होण्याची शक्यता आहे. सकारात्मक आणि प्रतिकात्मक पद्धतीने पर्यावरण रक्षणासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात आले आहे. कर्जत तालुका पर्यावरण बचाव संघर्ष समितीचे ॲड. कैलास मोरे यांनी नागरिकांना पर्यावरण रक्षणाच्या या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या तालुक्यात आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी अंदाजे १० ते १५ लाख झाडे तोडली जाण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारावी. एक जुने आणि विकसित झाड दरवर्षी सरासरी १०० ते १२० किलो ऑक्सिजन निर्माण करण्यास मदत करते, तर सुमारे २० ते २५ किलो कार्बन डायऑक्साइड शोषून घेते. त्यामुळे झाड हे केवळ निसर्गाचा भाग नाही तर ते प्रदूषणाविरोधातील नैसर्गिक शस्त्र आणि जीवनाचा आधार मानले जाते. याच पार्श्वभूमीवर ५ जून रोजी प्रत्येकाने आपल्या घराजवळ, शेतात, वाडीत, गावात किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन आले आहे.

# म्यानमारचे राष्ट्रपती जेएनपीएच्या दौऱ्यावर

**| उरण | प्रतिनिधी |**

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या उरण तालुक्यातील जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) येथे मंगळवारी (दि.२) जून रोजी म्यानमार प्रजासत्ताक संघराज्याचे राष्ट्रपती महामहिम मिन आंग हाइंग यांच्या भेटीचा सन्मान लाभला. या भेटीदरम्यान महामहिम राष्ट्रपती यांच्यासमवेत ६७ सदस्यीय अधिकृत शिष्टमंडळ उपस्थित होते. जेएनपीएमध्ये आगमनानंतर, म्यानमारच्या मान्यवर शिष्टमंडळाचे जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल, भा. प्र. से. आदरपूर्वक स्वागत केले.

भेटीदरम्यान जेएनपीएच्या बंदर पायाभूत सुविधा, कार्यक्षमता, क्षमता विस्तार उपक्रम, शाश्वतता उपाययोजना तसेच भविष्यातील विकास आराखड्याबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी भारतातील सर्वात मोठ्या खोल पाण्याच्या बंदरांपैकी एक म्हणून विकसित होत असलेल्या वाढवण बंदर प्रकल्पाची माहितीही देण्यात आली. हा प्रकल्प प्रादेशिक सागरी व्यापार वृद्धीस चालना देणारा आणि देशाच्या सागरी क्षेत्रातील महत्त्वाचा विकास टप्पा मानला जात आहे.

यावेळी शिष्टमंडळाने बंदर परिसराला भेट देऊन बंदराची कार्यक्षम कामकाज पद्धती, माल हाताळणी प्रक्रिया तसेच एकात्मिक लॉजिस्टिक्सची प्रत्यक्ष पाहणी केली. व्यापार, संपर्कक्षमता आणि शाश्वत आर्थिक विकासाला गती देण्यासाठी व्यापक इंडो-पॅसिफिक क्षेत्रात सागरी सहकार्य आणि प्रादेशिक भागीदारीची भूमिका अधिक बळकट होत असल्याचे या भेटीतून अधोरेखित झाले.

# 'अपघात टाळण्यासाठी चालकांनी नियम पाळा'

**| महाड | प्रतिनिधी |**

महामार्ग पोलीस केंद्र महाड येथील पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर ढाकणे यांनी महाड ते मुंबई प्रवास करणारे १५ ते २० प्रवाशांना पोलीस चौकी समोर सुरक्षित ठिकाणी थांबवून रस्ता वाहतुकीचे नियम सांगून संभाव्य अपघात टाळण्यासाठी घ्यावयाचे दक्षतेबाबत मार्गदर्शन करून, जनजागृती केली.

महामार्ग वाहतूक शाखेचे अधिकारी रामेश्वरढाकणे यांनी प्रवाशांना मार्गदर्शन करताना दिलेल्या माहितीमध्ये मोटार सायकल चालवताना नेहमी हेल्मेटचा वापर करावा, वाहन चालवितांना मोबाईल फोनचा वापर टाळावा, गाडीचे कागदपत्रे नेहमी सोबत ठेवावी, वाहनांवर विशेषतः पाठी मागील बाजू रिफ्लेक्टर लावावे, मद्य प्राशन करून वाहन चालवू नये, महामार्गावर धोकादायक परिस्थितीत कोणतेही वाहन थांबवू नये, नेहमी ओव्हरटेक करतांना उजव्या बाजूने करावे,वाहन चालविताना वेग मर्यादाचे पालन करावे असे यावेळी सांगितले.

त्याचबरोबर ज्या वाहनांवर प्रलंबित दंड आहेत त्यांनी महाड पो.केंद्राशी संपर्क साधून दंड भरून घ्यावेत याबाबत देखील मार्गदर्शन करुन मृत्युंजय दूत संकल्पनेची सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कुंभे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर मिळकतीचे मालक श्रीमती अस्मिता अजय भोसले यांचेकडुन विकत घेण्याची ठरवलेली आहे.

| सर्व्हे क्रमांक | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| १५/१ | ०.२५.०० | २.६० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदर जाहिर नोटीसी प्रसिध्द केल्यापासुन १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत दाखल न झालेस सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत.

दिनांक ०५/०६/२०२६

**ॲड. ऋषीकेश अनिल कांबळे**
बी.ए.एल.एल.बी. नेरळ, कुंभार आळी, जिल्हा परिषद शाळेसमोर, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९५६१७३४३७७

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

### क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबाग एस.टी.स्टॅन्डजवळ दूकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९.
- ऑफीस वर्कसाठी मुलगा/मुलगी पाहिजे. वेळ १० ते ६ कॉम्प्युटर नॉलेज व मराठी टायपिंग आवश्यक. पत्ता : धुमाळ हॉस्पिटलजवळ, चेंढरे-अलिबाग. अधिक माहितीकरीता संपर्क - ९३७३५८१३३५.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### जाहीर नोटीस

दिनांक ५/०६/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | बिनशेती सर्व्हे/हिस्सा क्रं. | क्षेत्रफळ आर. चौ.मी.चौ.से.मी. | आकार |
|---|---|---|---|
| अरेन्स इम्फाटेक प्रा. लि. | १८९/७१ | २.९४.०० | २९.४० |
| | १८९/७२ | २.९४.०० | २९.४० |
| | १८९/९३ | २.९४.०० | २९.४० |

बिनशेती जमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त बिनशेती जमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. पूजा प्रताप सुर्वे**
रा. पळसदरी, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ९२७१८७६०५

### कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक 05.06.2026**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे. **कामाचे नाव** - एसआर डिईएन/रत्नागिरी विभागाच्या अंतर्गत चिपळूण, भोके आणि नांदगाव स्थानक यार्डमध्ये संपूर्ण टर्नआउट बदलण्याचे काम. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-13, अंदाजित खर्च:** ₹74,30,131/-, **ईएमडी** ₹1,48,600/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 29.06.2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वेंडसे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर मिळकतीचे मालक श्री. शिवराम सिताराम कडू, श्री. काळुराम सिताराम कडू, श्री. वाळकु सिताराम कडू, इंदुताई भिकू म्हसे यांचेकडुन विकत घेण्याची ठरवलेली आहे.

| सर्व्हे क्रमांक | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| ३१/१/अ | १.२२.८० पैकी | ७.२५ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदर जाहिर नोटीसी प्रसिद्ध केल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत दाखल न झालेस सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत.

दिनांक ०५/०६/२०२६

**ॲड. ऋषीकेश अनिल कांबळे**
बी.ए.एल.एल.बी. नेरळ, कुंभार आळी, जिल्हा परिषद शाळेसमोर, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९५६१७३४३७७

### जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगाव यांचे न्यायालयात**

ज.नो प्रस्ताव क्र. १६०/२०२६

१. सिताराम भिकू जांबरे,
रा. रेपोली, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
ग्रामपंचायत तळेगाव तर्फे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी. ग्रामपंचायत तळेगाव तर्फे गोरेगाव, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव, दि. १८/०३/२० दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी कुंदा भिकू जांबरे, रा. रेपोली, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म २९/११/१९७१ रोजी मौजे रेपोली, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

कुंदा भिकू जांबरे, रा. रेपोली, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. २९/११/१९७१ रोजी मौजे रेपोली, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत तळेगाव तर्फे गोरेगाव, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच कुंदा भिकू जांबरे, रा. रेपोली, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत तळेगाव तर्फे गोरेगाव यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कुंदा भिकू जांबरे, रा. रेपोली, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. २९/११/१९७१ रोजी मौजे रेपोली, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : २०/०५/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार माणगाव

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमान मालक/कब्जेदार यांचेकडून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/ कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.-चौ.मी. | आकार रु. पै |
|---|---|---|---|---|
| अनंता महादू वर्तक | ३९४ | - | ०-१०.६० | ०.७८ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरिक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा - कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील अनंता महादु वर्तक यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. ०६/०६/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए २, जय नगर को. ऑप हौ. सोसा. लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि. रायगड.
मोबाईल नं. ९३२५००४००८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. संतोष शंकर मसणे व श्री. ज्ञानेश्वर शंकर मसणे यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालक श्रीम. संगीता तानाजी खंबाळे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. अवसरे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ५७ | ७/ब | ०-२३-०० | ०-०८ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दि. ०६/०६/२०२६.

**ॲड. सुमित दत्तात्रेय कराळे**
पत्ता-ममदापुर,नेरळ ता.कर्जत,जि.रायगड
मो.-९१६८९७८४३८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे आर्ढे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १३८ | ९ | १-७७-०० | ०=९१ |

आमचे अशिल श्रीम. कुसुम बबन शेळके व श्रीम. कविता खंडु म्हसकर रा. पाषाणे, ता. कर्जत, जि. रायगड यांचे सांगणेनुसार व माहितीनुसार सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

वर वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांचे मालकीची व कब्जा वहिवाटीची मिळकत आहे. सदरील मिळकतीशी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा संबंध नाही.

सदरील मिळकतीच्या ७/१२ सदरी काही क्षेत्राला कै. शंकर राघो विशे उर्फ पाटील यांचे वारसांनी व श्री. हरिश्चंद्र गणु शेळके यांनी बेकायशीरपणे त्यांचे नावाची नोंद केलेली आहे.

सदरील मिळकतीबाबत मा. उपविभागीय अधिकारी साहेब कर्जत यांचे कोर्टामध्ये आरटीएस अपिल नं. ०२/२०२६ हे अपिल प्रलंबित आहे. तसेच सदरील मिळकतीबाबत आमचे अशिल मा. दिवाणी न्यायालयामध्ये दावा दाखल करणार आहे.

कै. शंकर राघो विशे उर्फ पाटील यांचे वारस व श्री. हरिश्चंद्र गणु शेळके हे सदरील मिळकतीमध्ये त्यांचे नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवुन सदरील मिळकत विकण्याची तसेच सदरील मिळकतीमध्ये अतिक्रमण करणेची शक्यता आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणीही आमचे अशिलांचे व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीशी किंवा इसमाशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. किंवा अतिक्रमण करणेचा प्रयत्न करु नये. तसेच सदरील मिळकतीच्या लगत कब्जेदारांनी देखील शासकीय मोजणी केल्याशिवाय कंपाउंड करु नये.

अशा प्रकारचा कोणताही व्यवहार वरील मिळकती बाबत कोणीही केल्यास किंवा अतिक्रमण केल्यास त्या सर्व व्यक्तींवर आमचे अशिल फौजदारी स्वरुपाची कारवाई करतील.

असा कोणताही व्यवहार वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणीही केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/०६/२०२६

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु.सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४, ९२७१८६९२०२

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील ०-०४-९० हे. आर एवढे क्षेत्र व घर मिळकत विद्यमान मालक श्री. संजय गोपाळ सावंत, रा. रुम नं. ३७, राणेवाडी, नटवरनगर, रोड नं.५, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई ४०००६० यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग जि. रायगड | १७३ | एकूण ०-०९-९० | ५-९७ |

वर नमुद मिळकतींपैकी ०-०४-९० हे. आर क्षेत्र व त्यामधील ग्रूप ग्रामपंचायत चौल, घर मिळकत क्र. ५२७ अ क्षेत्र २५०० चौ. फूट

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ५.६.२०२६

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील विद्यमान मालक १) शोभा दिलीपकुमार डे, २) आदित्य किनाचंद (खिनचंद) व ३) आवंतिका किनाचंद (खिनचंद) यांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी./स्पिड पोस्ट अे.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून मिळकतीच्या मालकी हक्काच्या निर्वेधतेचे प्रमाणपत्र देण्यात येईल. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ठ**
**ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| मापगांव | ५७/१ | ०-६०-९०<br>०-४८-७०<br>१-०९-६०<br>पो. ख. ०-०६-९०<br>एकूण १-१६-५०<br>(पैकी ० हे. ९४.९० आर, आकार ६ रूपये १३ पैसे एवढी मिळकत) | ७.६३ |
| मापगांव | ५७/२ | ०-४०-०० | ३.०० |

अलिबाग
तारीख : ६/६/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात
### जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि. रायगड

क्रमांक/आरटीएस/अपील क्र. ११/२०२६
दिनांक :- २७/०५/२०२६

१. श्रीम. अंजना नामदेव वाल्हेकर
२. श्री. महेश नामदेव वाल्हेकर
३. श्री. सुमित नामदेव वाल्हेकर
सर्व रा. वाल्हेकर वाडी, कोंडीबा नगर, चिंचवड, पुणे - ३३ — अपिलार्थी
४. श्रीम. अनिता राजेंद्र घाग
रा. सर्व्हे नं. ६३८/१, जगदाळे चाळ, बिबवेवाडी, पुणे - ३७
५ श्रीम. चारुलता शेखर तिकोणे
रा. प्लॉट नं. १५, चिंचवड, पुणे - ३३

विरुद्ध

१. श्री. जयराम धोंडू यादव
रा. बी-१३, फ्लॅट नं. १०३, कतार गांवजवळ, सिगणपूर, मगन नगर -२, पुष्पासागर अपार्टमेंट, सुरत, गुजरात - ३९५००४
२ श्रीम. पिंकी प्रकाश यादव
रा. सोनारवाडी, शिरसाड, ता. माणगाव, जि. रायगड
३ श्री. तुकाराम धोंडू यादव
रा. सोनारवाडी, शिरसाड, ता. माणगाव, जि. रायगड
४ श्री. सिताराम धोंडू यादव
रा. जिवन रणछोडदास पटेल चाळ नं. १. रुम नं. ३. ईश्वर नगर, काजूपाडा, बोरीवली, पू. मुंबई - ४०० ०६६ — उत्तरार्थी
५. श्रीम. निर्मला प्रकाश यादव
रा. सोनारवाडी, चाच, ता. माणगाव, जि. रायगड
६ श्रीम. अंकिता अनंत मोरे
रा. भट्टवाडी, हनुमान नगर कॉलनी, - ४०० ०८६
७ श्री. अमन प्रभू चंदनानी
रा. पदम छुगम सागर, ब्लॉक सी ३/१२, उल्हासनगर
८. उपविभागीय अधिकारी माणगाव

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे शिरसाड, ता. माणगांव, जि. रायगड येथील स.नं./गट नं. ५३/१, क्षेत्र १.०९.०० हे. आर. आकार ०.५० रु. पैसे, या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि. ०५/०१/२०२६ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि. ०९/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी उपविभागीय अधिकारी, माणगाव यांचे कार्यालय, माणगाव येथे निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वत: अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : माणगांव
दिनांक : २७/०५/२०२६

सही/-
अपर जिल्हाधिकारी रायगड
अलिबाग करीता

### ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा
**ता. माणगांव, जि. रायगड.** नोटीस बोर्ड दिनांक :- ०४/०६/२०२६
**जाहीर निविदा**

सर्व खालील साहित्य व सेवा पुरवठादार कळविण्यात येते की, ग्रामपंचायत मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड यांना सन२०२६/२०२७ या आर्थिक वर्षाच्या कालावधीमध्ये खालील दर्शविल्याप्रमाणे साहित्य सेवा आवश्यकतेनुसार कमी अधिक प्रमाणात लागणार आहेत. तरी इच्छुक पुरवठादार यांनी खालील साहित्याचे कामाचे तपशिलासह व सर्व करांसहीत असलेले आपले दरपत्रक निविदा ग्रामपंचायत कार्यालय मोर्बा येथे दि. १२/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सादर करावेत. सदर दरपत्रक मंजूर वा नामंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत.

| अ.नं | साहित्याचे/कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | निधीचा स्त्रोत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यालयीन स्टेशनरी (नमुना रजिस्टर) साहित्य पुरविणे. | गरजेप्रमाणे | ग्रा.प फंड | सन २०२६/२७ |
| २ | ग्रामपंचायत कर्मचारी यांना गणवेश, रेनकोट, छत्री इ. पूरविणे. | गरजेप्रमाणे | ग्रा.प फंड | सन २०२६/२७ |
| ३ | घंटागाडी व टॅक्टर दुरुस्ती करणे. | गरजेप्रमाणे | ग्रा.प फंड | सन २०२६/२७ |
| ४ | दिवाबत्ती साहित्य<br>१) LED बल्प (मान्यताप्राप्त कंपनी) २) होल्डर ३) वायर | गरजेप्रमाणे | ग्रा.प फंड | सन २०२६/२७ |
| ५ | पाणी शुध्दीकरण टी.सी.एल. व मेडीक्लोर पुरविणे. | गरजेप्रमाणे | वित्त आयोग/ ग्रामपंचायत फंड | सन २०२६/२७ |
| ६ | कार्बोलिक व शेवाळी पावडर पुरविणे. | गरजेप्रमाणे | वित्त आयोग / ग्रामपंचायत फंड | सन २०२६/२७ |
| ७ | कचरा गोळा करण्याकरिता आवश्यक साहित्य व कर्मचारी पुरविणे | गरजेप्रमाणे | वित्त आयोग/ ग्रामपंचायत फंड | सन २०२६/२७ |
| ८ | JCB पुरविणे. | गरजेप्रमाणे | ग्रा.प. फंड | सन २०२६/२७ |
| ९ | डंपिंग ग्राउंडला संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे. | ३.६० लक्ष | ग्रा.प फंड | ३ महिने |
| १० | ग्रामपंचायत हद्दीमधील गटार सफाई करणे. | ३.०० लक्ष | ग्रामनिधी | १ महिने |
| ११ | मोर्बा अंतर्गत गटार बांधकाम करणे. (२२-२३) | ४.०० लक्ष | १५ वित्त आयोग | ६ महिने |
| १२ | पाणीपुरवठा दुरूस्ती साहित्य पुरविणे | गरजेप्रमाणे | ग्रामनिधी/ पाणीपुरवठा | सन २०२६/२७ |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि. १२/०६/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता ग्रा. पं. मोर्बा येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच मोर्बा यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रक्कमा कपात केल्या जातील. मा. उपभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.
४) कामाचे देयकातून शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्या नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सूरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

सही/-
**ग्रामविकास अधिकारी**
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड

सही/-
**ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा**
ता. माणगाव, जि. रायगड



## राशीभविष्य

- **मेष** : स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील. प्रवासाचे बेत शक्यतो रद्द करावे. मित्र–नातलगांचं सहकार्य लाभेल
- **वृषभ** : महत्त्वाचे करार मार्गी लागतील. रखडलेल्या कामांना गती येईल. व्यावसायिक उन्नती साधू शकाल.
- **मिथुन** : उत्कर्षाच्या संधी चालून येतील. कौटुंबिक सुख–समाधान लाभेल. नव्या योजनांना गती मिळेल.
- **कर्क** : खरेदीचा मार्ग सुकर होईल. विवाहाच्या प्रस्तावाला मान्यता मिळेल. आर्थिक ताण दूर होतील.
- **सिंह** : महत्त्वाच्या भेटी समाधान देतील. खर्चाचं प्रमाण वाढेल. व्यवसायात पुरेशी काळजी घ्यायला हवी.
- **कन्या** : मौल्यवान वस्तू नीट सांभाळाव्या. विद्यार्थ्यांना प्रगतीच्या संधी लाभतील. बाकी चिंता करू नये.
- **तूळ** : कामानिमित्त प्रवास लाभदायी ठरेल. रखडलेली येणी वसूल होतील. जुनी दुखणी पुन्हा उद्‌भवतील.
- **वृश्चिक** : कौटुंबिक वाद–विवाद संभवतात. बोलताना शब्दांचा वापर जपून करा. मानसिक ताण राहील.
- **धनु** : मनासारखं सारं घडत जाईल. वाद–विवाद वेळीच टाळावेत. प्रक्रिया उद्योगात प्रगती करता येईल.
- **मकर** : नव्या विचारांना चालना मिळेल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल.
- **कुंभ** : महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांचं भान ठेवा. सरकारी कामं रखडतील. प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील.
- **मीन** : अपेक्षित वार्ता कानी येईल. व्यवसायात साधारण स्थिती राहील. आर्थिक प्रश्नांचा ताण राहील.

## ६ जून

दिन विशेष

**२००२** : ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांचे निधन.

**२००४** : भारताच्या राष्ट्रपतींनी तमिळ ही शास्त्रीय भाषा म्हणून घोषित केली.

**२०१५** : अमेरिकेच्या सेरेना विल्यम्सने फ्रेंच ओपन महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले.

**२०१७** : माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गोविंदराव आदिक यांचे निधन.

आरोग्यमंत्र

## आहार तिशीनंतरचा

चयापचय क्रियेचा वेग कमी–अधिक होण्याचे काही परिणाम दिसतात. उदाहरणार्थ हा वेग मंदावल्यामुळे थकल्यासारखं वाटतं. वजन वाढू लागतं. चेहरा निस्तेज दिसू लागतो, केस गळू लागतात. सर्वसाधारणपणे तिशीनंतर हा वेग मंदावतो. या समस्येवर मात करायची असल्यास वयाच्या या टप्प्यानंतर शरीराला लोह, कॅल्शियम आणि पोटॅशियमसारख्या घटकांचा पुरेसा पुरवठा व्हायला हवा. याविषयी...✻ ओट्‌समधल्या बीट ग्लुकेंस फायबरमुळे शरीरात वाईट कोलेस्टेरॉलची निर्मिती होत नाही. सहाजिकच हृदयविकाराची शक्यता कमी होते. ✻ बदामातल्या रायबोफ्लेविनमुळे मेंदूची क्षमता वाढते. स्मरणशक्ती सुधारते. ✻ माश्यांमधल्या ओमेगा ३ फॅटी ॲसिडमुळे रक्ताभिसरणाची क्रिया सुधारते. यामुळे उच्च रक्तदाब, स्ट्रोकपासून बचाव होतो. ✻ टोमॅटोमधल्या फायबर आणि फ्लेवोनाईड्‌समुळे वजन कमी व्हायला मदत होते. शिवाय सांधेदुखीची समस्या कमी होऊ शकते. ✻ दह्यामुळे पचनशक्ती सुधारते. शरीरातला ओलावा टिकून राहतो. केस लवकर पांढरे होत नाहीत. ✻ दुधातल्या कॅल्शियम आणि प्रथिनांमुळे हाडं बळकट होतात. ✻ पूर्णधान्याच्या सेवनामुळे रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात राहते. मधुमेह तसंच रक्तदाबासारख्या विकारांची शक्यता कमी होते. ✻ डार्क चॉकलेटमधल्या अँटिऑक्सिडंट्‌समुळे चेहऱ्यावर सुरकुत्या पडत नाहीत. ताणतणावांपासूनच बचाव होतो. ✻ पालकातल्या लोहामुळे रक्तातल्या हिमोग्लोबिनचं प्रमाण संतुलित राहतं.



टेक फन

## कमाल ‘वन फूट टॉलर’ची

छोट्यांनो, तुमची उंची कमी असते. त्यामुळे गर्दीत उभं राहिल्यावर समोरचं काहीच दिसत नाही. पाय उंचावून, उड्या मारून आपण बघण्याचा प्रयत्न करतो. लांबच्या रांगेत बसून बघायचं म्हटलं ती उंची कमी असल्यामुळे बरेचदा तुम्हाला उभं रहावं लागतं. बुटक्या माणसांचीही हीच समस्या असते. अशा परिस्थितीत करायचं तरी काय? पाय उंच करून, स्टूल किंवा खुर्चीवर उभं राहून बघण्याशिवाय पर्याय नसतो. खूप गर्दी असेल तर समोरचं काहीच दिसत नाही. मात्र आता तुमची ही चिंता मिटू शकेल. कारण इंग्लंडच्या डॉमिनिक विलकॉक्स यांनी भन्नाट चष्मा तयार केला आहे. या चष्म्याला पॅरिस्कोप ग्लासेस म्हटलं जातं. वन फूट टॉलर असं नाव याला देण्यात आलं आहे. या चष्म्यातून समोर उभ्या असणाऱ्या उंच व्यक्तीच्या आरपार बघता येणार आहे. हा चष्मा ४५ अंशांमध्ये फिरू शकतो. त्याच पद्धतीने तो तयार करण्यात आला आहे. यात ॲक्रेलिक शीट बसवण्यात आली आहे. या छोट्या चष्म्याच्या वरच्या बाजूच्या काचांमधून मागच्या रांगेत उभं राहूनही तुम्ही आरामात स्टेजवरचा कार्यक्रम बघू शकता.

ब्युटी टॉक

## बनवा फळांचं बॉडी लोशन

फळं खाल्ल्यामुळे आरोग्य उत्तम रहातं. त्याप्रमाणे फळांपासून तयार केलेल्या बॉडीलोशनमुळे त्वचा तजेलदार दिसते. फळांचं हे बॉडी लोशन तुम्ही घरच्या घरी तयार करू शकता. फ्रूट बॉडीलोशन बनवण्यासाठी अर्धा कप मँगो बटर, अर्धा कप खोबरेल तेल, प्रत्येकी एक चमचा पपई, डाळिंब आणि पॅशन फ्रूटच्या बियांचं तेल, इसेन्शियल ऑईलचे दहा थेंब, ५ थेंब व्हाय लँग व्हाय लँग इसेन्शियल ऑईल हे साहित्य घ्या. सर्वात आधी कढईत मँगो बटर वितळवून घ्या. यात खोबरेल तेल घालून मंद आचेवर ठेवा. गॅस बंद करा. मिश्रण गार झाल्यावर दहा मिनिटं फ्रीजमध्ये ठेवा. हे मिश्रण थोडं घट्ट होईल. या मिश्रणात फळांच्या बियांची तेलं आणि इसेंशियल ऑईल घाला. हे सर्व घटक एकत्र करून घट्ट मिश्रण तयार करा. हे मिश्रण म्हणजे तुमचं फ्रूट बॉडी लोशन. यानंतर एका डबीत हे मिश्रण भरून ठेवा. याच्या नियमित वापरामुळे त्वचा छान नितळ आणि मुलायम होईल. घरी तयार केलेल्या या लोशनमध्ये केमिकल्स नसतील. त्यामुळे त्याचा वापर अगदी बिनधास्त करता येईल. विकतच्या बॉडी लोशनपेक्षा हे स्वस्तही पडेल.

### पंचांग

**शनिवार, ६ जून २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ कृ. ६, चंद्रराशी : मकर,
नक्षत्र : श्रवण, योग : ऐंद्र,
सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.१२

### फॉरवर्ड्स

**दिल क़े रिश्तें हमेशा क़िस्मत से हीं बनतें हैं...**

**वरना मुलाक़ात तो रोज़ हजारों सें होतीं हैं...!**

### फॅशन पॅशन

✻ निऑन ग्रीनसारखे फ्लोरोसंट रंग ट्राय करण्यात मुलं हात आखडता घेत नाहीत. विशेष म्हणजे हा रंग फक्त व्यायामाच्या कपड्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही तर या रंगाचे कोट आणि जॅकेट्‌सही मिळतात. फॅशन शोजमध्येही या रंगाची चलती असते. ✻ मिलिट्री ग्रीन रंग कधीच आउट ऑफ फॅशन होत नाही. मिलिट्री प्रिंट्‌सही छान दिसतात. या रंगाचे शर्ट, टी शर्टस किंवा ट्रॅक पँट्‌स तुम्ही घेऊ शकता. ✻ मुलांच्या फॅशनविश्वात केशरी रंगानेही घुसखोरी केली आहे. या ब्राईट रंगाचे शर्टस, टी शर्टस खूपच उठून दिसतात. फ्लोरोसंट ऑरेंजही खूप छान दिसतो.

करिअरवाटा

## संस्था समन्वय साधणाऱ्या

कामातील कौशल्य आणि आवश्यक ती सगळी शैक्षणिक प्रमाणपत्रं असली तरी अनुभव नसल्याचं कारण देत नोकरीच्या अनेक संधी गमवाव्या लागतात. मात्र काही संस्था अशा उमेदवारांसाठी मोठं काम करतात. नुकत्याच शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना नोकरी प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेलं प्रॅक्टिकल ज्ञान आणि कामाचा अनुभव या दोन्हींचा समन्वय अशा संस्था साधतात. यात एक्स्पीरियन्स डेव्हलपमेंट इंटर्नशीप प्रोग्राम या अभ्यासक्रमाचा समावेश असतो. हा अभ्यासक्रम पूर्ण करताना विद्यार्थी संबंधित संस्थेतच काम करतात. प्रत्यक्ष काम हाच ट्रेनिंगचाच भाग असतो. अनुभव घेण्यासाठी नोकरी आणि इंटर्नशीप या दोन्हींवरही भर दिला जातो. या काळात उमेदवार कामं करेल आणि अनुभव घेईल, अशी रचना असते. आजकाल विद्यार्थ्यांना परीक्षेत भरपूर गुण मिळतात. परंतु विशेष प्रशिक्षण वा अनुभवाअभावी नोकऱ्या मिळणं कठीण जातं. खरं तर अनेकांकडे काही कौशल्यं उपजत असतात किंवा ती वातावरणातून निर्माण होतात, संस्कारातून बाणली जातात. मात्र या तिन्ही कारणांनी ही कौशल्यं नसतील तर ती निर्माण करण्याचा प्रयत्न अशा संस्थांमधून केला जातो.




खेचाखेची

## जीवनात हा गडी

सकाळपासून अर्धांगिनी ‘जीवनात ही घडी अशीच राहू दे’, हे गाणं गुणगुणत होती.

तो आपला चहा पिऊन गपचुप भांडी घासत होता. ‘वर्क फ्रॉम होम’!

भांडी घासून संपली , भांड्यांचा आवाज थांबला आणि त्यानं नीट कान देऊन ऐकलं, तर ती...

‘जीवनात हा गडी असाच राहू दे’, असं गात होती!!!

वेगळं काही

ग्वाल्हेरच्या जीवाजी विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांनी आंब्याच्या पानांपासून मद्य तयार केलं आहे. यात ८ ते १२ टक्क्यांपर्यंत अल्कोहोल असेल. ते आरोग्यासाठी लाभदायी ठरणार असल्याचं शास्त्रज्ञाचं म्हणणं आहे. या मद्यामुळे मधुमेहावर नियंत्रण मिळवता येईल, असा दावा केला जात आहे. यासोबतच शरीरातले फॅट्स कमी करून रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठीही हे मद्य उपयुक्त ठरू शकतं. हे मद्य तयार करण्यासाठी ४५ ते ५० दिवसांचा कालावधी लागला. यासाठी ग्लुकोज, कर्बोदकं आणि पेप्टॉन प्रोटिन्सचा वापर करण्यात आला. हे मद्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोठ्या कंपनीसोबत करार करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

रुचिरा

## बनवा चविष्ट टोफु खिमा

पनीरच्या त्याच त्याच डिशेसचा कंटाळा येतो. तुम्हीही याच कारणामुळे त्रासला असाल तर टोफु खिमाचा पर्याय समोर ठेवा. चला तर मग, कृती जाणून घेऊ या.

**साहित्य :** तेल, जिरं, चिरलेला कांदा, लसणाची पेस्ट, आल्याची पेस्ट, चिरलेला टोमॅटो, पाचशे ग्रॅम सोया पनीर (टोफु), दीडशे ग्रॅम मटार, लाल तिखट, दोन टेबलस्पून जलपिनो मिरची, कोथिंबीर इत्यादी.



**कृती :** कढईमध्ये तेल तापवून जिरं, कांदा, आलं–लसूण पेस्ट, टोमॅटो हे सगळं चांगलं परतून घ्यावं. त्यानंतर यात सोया पनीर आणि मटार घालावे. मिश्रण शिजल्यावर त्यात लाल तिखट, मीठ आणि जलापिनो मिरची टाकून व्यवस्थित हलवून घ्यावं. पाच ते सात मिनिटं शिजवल्यावर कोथिंबीरीने डिश सजवावी. टोफु खिमा तयार आहे. सोया टोफु घरच्या घरीही बनवता येतो. चारशे ग्रॅम सोया टोफु बनवण्यासाठी दोन लिटर सोया दुधाची आवश्यकता असते. हे दूध उकळवून घ्यावं. त्यानंतर त्यात सायट्रिक ॲसिडचे दोन थेंब टाकावेत. दुध फाटल्यावर पाणी काढून दूध गाळून घ्यावं. वरती सोया टोफु राहील. सगळं पाणी निघून अर्ध्या तासाने टोफु तयार असेल.

## सुडोकू ११३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | | ६ | ५ | | ७ | | |
| ४ | | | | | | | १ | |
| ३ | १ | ५ | | ७ | | ९ | | |
| ५ | | | ९ | १ | | २ | | |
| १ | | | | | | | | ९ |
| | | ८ | | ३ | २ | | | ७ |
| | | ३ | | २ | | ५ | ४ | ८ |
| | ५ | | | | | | | २ |
| | | ४ | | ८ | ७ | | | १ |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ११२चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | ४ | ५ | २ | ७ | ३ | ६ | १ |
| १ | ७ | २ | ९ | ६ | ३ | ८ | ४ | ५ |
| ५ | ६ | ३ | ८ | १ | ४ | ९ | ७ | २ |
| ९ | ८ | ७ | ६ | ३ | ५ | १ | २ | ४ |
| ४ | १ | ५ | ७ | ९ | २ | ६ | ८ | ३ |
| २ | ३ | ६ | ४ | ८ | १ | ५ | ९ | ७ |
| ३ | ५ | ९ | २ | ४ | ८ | ७ | १ | ६ |
| ७ | २ | ८ | १ | ५ | ६ | ४ | ३ | ९ |
| ६ | ४ | १ | ३ | ७ | ९ | २ | ५ | ८ |

## शब्दकोडे क्रमांक ११३



**आडवे शब्द :–**
१) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
५) मल्ल
८) तपस्या
१०) तापविणारा सूर्य
११) नावापुरता अधिकार असलेला
१२) वेळ
१४) टीका करणारा
१६) माफ करण्याजोगे
१७) अरण्य
१८) घोडा
१९) वसुंधरा
२१) रस्ता
२४) खोदकाम
२६) कृष्णासारखा श्रेष्ठपुरुष
२८) शेराचा आठवा भाग
३०) बारा महिन्याचा काळ
३१) सूर्याचे पहिले नाव
३२) इमारतीच्या पायात भरण्याचा दगडी प्रकार
३४) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
३६) पाठ्यपुस्तकातील गीत
३८) रविवार
४०) स्त्रियांच्या गळ्यातील एक दागिना
४१) उपहास
४३) धातूचा धागा
४४) निमगोरा
४७) सहाय्य
४९) उलट,विरुद्ध
५१) आकाशवाणी
५२) वेदनेने भरलेले
५५) शंकराला वाहण्याचे त्रिदल
५६) बाण
५७) जेव्हा
५९) शेळी
६१) लक्ष्मीचे एक नाव
६३) घेणेच्या विरुद्ध
६४) कोर्टातील दावा
६६) हालचाल
७०) क्रिकेटमधील रन
७१) समुदाय,समूह
७३) घेणे, अंगीकार
७५) गंध
७६) युक्ती
७९) सरबत इ.पेय
८१) हिंमत,धैर्य
८२) सुस्ती
८३) खिशातील चौकोनी वस्त्र
८४) लोणी
८७) कंटाळवाणी बडबड
८८) दुसरे नक्षत्र
८९) भ्रमर,भुंगा

**उभे शब्द:–**
१) रात्रभर
२) बारा वर्षांचा काळ
३) जंगली
४) तादाम्य,एकरूप
५) तपासनीस
६) वल्लरी
७) मत्सरी,माणूसघाणा
८) मलई
९) श्री विष्णूचे एक नाव
११) चौक
१३) चिंतन
१५) गोजी,पाडी,जनावरांचे पिल्लू
२०) पत्रातील थोडक्यात साष्टांग नमस्कार विनंती विशेष
२२) भीती
२३) पाणी
२५) वर–वधू
२७) खोडण्याचे साधन
२८) खसखस लावलेला एक कडक व गोड पदार्थ
२९) पर्जन्यकाळ
३१) गावाखालची जमीन
३३) यमुना नदीचे एक नाव,सूर्यपुत्री
३४) चामखीळ
३५) गव्हाचे पीठ
३७) थाळी
३९) घाव,दिवस
४२) रम्य
४५) वर्तुळ,गोलाकार
४६) लग्नाचा मुलगा
४८) शिवधनुष्य
४९) भाजी चिरण्याचे एक साधन
५०) घोड्याचे घर
५१) राष्ट्र
५३) जोडीतील एक चर्मवाद्य
५४) काळी मिरी
५८) प्रमाणपत्र
६०) झकास,मस्त
६१) मनाचा ओढा
६२) लहरी,निधड्या छातीचा,मन स्वाधीन असलेला
६५) भरीव मोठे,ठळक
६७) बारीक मऊ केस
६८) पक्के साश्वासन
६९) मयूर
७०) पळापळ
७१) सत्वांश
७२) किंमत,पैसा
७४) स्त्री,नारी
७५) दिवस
७७) गाढव
७८) युवती
७९) दिल्लीच्या विमानतळाचे नाव
८०) सुवर्ण
८२) आरोप,संशय
८५) आशीर्वाद,उर्ध्व दिशा
८६) बूड,सर्वात खालचा भाग

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नि | ग | डि | त | ■ | पा | न | क | ■ | मा | द | क | ■ | खा | स | ■ |
| ग | र | ■ | ला | वा | ला | वी | ■ | झे | ला | ■ | ल | ख | ल | खी | त |
| र | ज | त | व | णी | ■ | न | शा | ■ | मा | रा | मा | री | ■ | ला | ट |
| ग | ■ | ड | ■ | कि | ल्ली | ■ | हि | मा | ल | य | ■ | प | खा | ल | ■ |
| ट | र | क | हा | णी | ■ | अ | स्ते | य | ■ | व | र्ण | ■ | र | ■ | को |
| ■ | त्ना | ■ | र | चा | ई | ■ | खा | ना | व | ळ | ■ | अ | ट | क | ळ |
| ट | क | ट | क | ■ | श्व | स | न | ■ | स | ■ | सा | ज | ■ | ळी | ■ |
| च | र | क | ■ | प | र | त | ■ | म | न | ग | ट | ■ | वा | ■ | ल |
| ट | ■ | म | ख | र | ■ | रं | ज | न | ■ | र्द | ■ | का | न | शी | ल |
| ची | ■ | क | ड | ■ | रा | जी | व | ■ | स | न | द | शी | र | ■ | ना |
| त | प | ■ | क | स | ब | ■ | स | म | र | ■ | मा | या | ■ | गो | ■ |
| ■ | र | जा | ■ | क | ता | र | ■ | ज | का | त | ■ | त्रा | स | ■ | ट |
| खं | त | ■ | पा | ल | ■ | ग | रा | ■ | र | पा | टा | ■ | ■ | भा | व |
| ■ | प | र | वा | ■ | प | ■ | ज | ड | ■ | स | क | ट | नि | क | ट |
| पा | र | वा | ■ | डो | हा | ळे | पु | र | वि | णे | ■ | पा | ■ | र | वी |
| ■ | त | ळ | त | ळा | ट | ■ | त्र | ■ | ष | ■ | ब | ल | क | ■ | त |

# कलासक्त

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा ‘राज्याभिषेक’ म्हणजे भारतीय इतिहासातील एक सुवर्णपान असून, राष्ट्राची आन–बान–शान आहे. शिवरायांचा हा राज्याभिषेक रायगडावर ६ जून १६७४ रोजी संपन्न झाला. त्यानिमित्ताने आज ६ जून २०२६ रोजी रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जात आहे. सुमारे साडे तीन शतकांचा सुवर्णकाळ लोटला. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकामुळे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर, भारताच्या इतिहासात एका नव्या युगाला प्रारंभ झाला. महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यात लावलेले हे स्वराज्याचे रोपटे पहाता पहाता बहरलं. काही काळानं मोठं झालं. त्याचं भव्यदिव्य वटवृक्ष झालं. अन् त्या वृक्षाच्या पारंब्या भारताच्या आठही दिशांना पसरल्या. त्यामुळेच मध्ययुगीन भारताच्या इतिहासात शिव राज्याभिषेकाची घटना सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली. त्यातूनच एक नवे युग अवतरले, याचा मराठी माणसाला सार्थ अभिमान आहे.





**डॉ.श्रीकांत लता एकनाथ शिंदे**
खासदार,कल्याण लोकसभा क्षेत्र



## शिवछत्रपतींच्या स्मरणार्थ किल्ले रायगडावर सुरू झाली...

# अखंड पुष्पहार अर्पण सेवा

मित्रहो, राजे शिवाजींचा राज्याभिषेक ही भारतीय इतिहासातली एक अभूतपूर्व, अलौकिक व अविस्मरणीय घटना म्हटली जाते. भारतीय इतिहासात अनेक राजे–राजवाडे आले अन् गेले. पण शिवाजी महाराज आणि अन्य राजांमध्ये एक मूलभूत फरक होता. तो म्हणजे बहुतांशी राजे हे आपापल्या पूर्वजांच्या राजगादीवर विराजमान झाले. परंतु शिवाजी महाराज हे त्याला अपवाद होते. कारण ते स्वतःच राज्यनिर्माते होते. शून्यातून विश्‍व निर्माण करण्याची जिद्द व धाडस त्यांच्या अंगी होती. अत: शिवछत्रपतींना त्रिवार मानाचा मुजरा!

शिवरायांनी वयाच्या १६ व्या वर्षीच हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न पाहिले होते अन् ते त्यांनी शौर्य, मुत्सद्देगिरी व आत्मविश्‍वासाच्या बळावर साकारही केलं. शिवरायांच्या जडणघडणीत मांसाहेब जिजाऊ यांचं मोठं योगदान होतं.शिवबाचा राज्याभिषेक ह्याची देही ह्याची डोळा पहावा, हीच जिजाऊमातेची अंतिम इच्छा होती. जिजाऊंनी एक स्वप्न पाहिले होते, ते म्हणजे शिवबाला हिंदवी स्वराज्याचा आदर्श राजा बनवायचा.पण त्याआधी जिजाऊंना शिवबाचा राज्याभिषेक करून त्याला छत्रपती बनवायचं होतं. शिवबाचे वडील शहाजीराजे हे आदिलशहाकडे मोठे सरदार होते. त्यामुळे शिवबाच्या जडणघडणची पूर्ण जबाबदारी जिजाऊंच्या खांद्यावर आली. राज्याभिषेक होऊ नये, या दुष्ट हेतूने तथाकथित कर्मकांडी पंडित कटकारस्थाने करत होते. त्याची तमा न बाळगत या सर्व अप्रिय गोष्टींवर मात करत जिजाऊंनी अखेर शिवबाचा राज्याभिषेक काशीच्या गागा भट्ट यांच्या हस्ते करण्यास शिक्कामोर्तब केलं अन् ते प्रत्यक्षात साकारलं. यास्तव माँ जिजाऊंना आम्ही मराठी भूमिपुत्र नतमस्तक होतो.

१६७४ साल उजाडलं अन् महाराष्ट्राच्या इतिहासात एक नवं पर्व सुरू झालं. आपल्या राज्यातल्या अन् आसपासच्या राज्यातल्या कर्मकांडी पंडितांना डावलून जिजाऊंनी काशीच्या गागाभट्टाकडे शिवराज्याभिषेकाचे पौराहित्य सोपविले. राज्याभिषेकासाठी रायगड नटूनथटून सज्ज झाला होता.याप्रसंगी राजगडावर मोठी अभूतपूर्व गर्दी उसळली होती. ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६ हा राज्याभिषेकाचा मुहूर्त निश्‍चित झाला. देश– परदेशातील राजे राजवाड्यांनी किल्ले

रायगडावर आवर्जून हजेरी लावली. महत्वाचे म्हणजे या मंगलमय प्रसंगी कवी भूषण यांची प्रमुख उपस्थिती होती.त्यांनी श्रीशिवराजभूषण हा ग्रंथ शब्दबद्ध करून शिवरायांना समर्पित केला.

परमपूज्य गागा भट्ट आणि त्यांच्या पंडितांनी राज्याभिषेकाच्या विधीचा शुभमुहूर्तावर शुभारंभ केला. त्यानंतर चांदी व अन्य धातू तसेच साखर, फळे यांचीही तुला करण्यात आली. तुलादान झाल्यावर मुंज अन् समंत्रक विवाह विधी करण्यात आला.

मंगलस्नान अन् वस्त्रभूषण परिधान केल्यावर शिवरायांनी उपस्थित दिग्ज्जांना नमन करून सिंहासनरोहन केलं. त्यानंतर गागाभट्ट आणि पंडितांनी मंत्राक्षतांची व सुवर्णरौप्य पुष्पांशी शिवरायांवर वृष्टी केली. पहाटे पाचच्या सुमारास सनई चौघडे, तुतारींच्या निनादात अन् गगनभेदी जयघोषातून शिवराज्याभिषेक मोठ्या थाटामाटात संपन्न झाला, अन् या सोहळ्याचे महत्व महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरलं गेलं.

याप्रसंगी गागा भट्टांनी पुढे येऊन राजांच्या डोक्यावर मोत्यांची झालर ठेवत शिवछत्रपती हा शब्द उच्चारला. यावेळी पुरोहित पंडितांना तसेच उपस्थित जनांना मोठ्या प्रमाणात धनधान्य वाटण्यात आले. त्याप्रसंगी सोळा प्रकारचे महादान करण्यात आले. या मंगलमय प्रसंगी गागा भट्ट अन् अन्य पंडितांना नवरत्नादिक, सुवर्णकमळे व मौल्यवान वस्त्रे दानरूपात देण्यात आली. यावेळी सर्वजण मनोमनी तृप्त झाल्याचे दृष्टोत्पत्तीस आले. खरं तर, दानधर्म करणं हा शिवशाहीतील थोर परंपराच होती. दरम्यान सिंहासनावर आरूढ होण्याआधी शिवरायांनी गुरुजनांचे, गागा भट्ट अन् मातोश्रींचे चरणस्पर्श करून आशिर्वाद घेतले. त्यानंतर छत्रपती हत्तीवर स्वार होऊन त्यांची किल्ले रायगडावर मिरवणूक निघाली. यावेळी सोबतच अष्टप्रधान मंडळ व सैन्यदल चालत होते. मिरवणूक प्रस्थान करत असताना लोक

फुले उधळत महाराजांचा जयघोष करत होते. किल्ले रायगड वरील विविध मंदिरांमध्ये जाऊन देवांचे दर्शन–आशिर्वाद घेतल्यावर पहाता... पहाता शिवछत्रपतींनी हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ केली. राज्याभिषेकाच्या दिवसापासून स्वराज्यातील राजपत्रावर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती असे नमूद करण्यास सुरुवात झाली. इतकेच नव्हे तर, त्या दिवसापासून नवीन शक सुरू होऊन शिवराय हे शककर्ते राजे झाले. त्यासह हिंदवी स्वराज्यात महाराजांच्या नावाची नाणी चलनात आली. परकीय सत्ता व संस्कृतीचे सावट दूर करून, मराठी साम्राज्याच्या राजकीय, सामाजिक व पारमार्थिक संस्कृतीची मूल्ये रुजविण्यात आली. खऱ्या अर्थानं हिंदवी स्वराज्याची मूल्ये साकार झाल्याने हिंदवी राष्ट्र स्थापन झाले. वास्तवात ही एक अद्वितीय ऐतिहासिक घटना होय.

बंधू भगिनींनो, सर्वात मोठी आनंदाची गोष्ट म्हणजे शिवरायांचा राज्याभिषेक ह्याची देही ह्याची डोळा पाहिल्याने जिजाऊ माँसाहेब धन्य झाल्या. त्या तृप्त झाल्या. त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यांना आकाशही ठेंगणं वाटत होतं. त्यांच्या डोळ्याचं पारणं फिटलं होतं. या मंगलमय प्रसंगी शिवछत्रपतींची दृष्ट काढत मां जिजाऊ मोठ्या आवेशात म्हणाल्या, शिवबा तुम्ही महाराष्ट्राचे राजा झालात. रयतेचे राजा झालात. महत्वाचे म्हणजे तुम्ही छत्रपती राजे शिवाजी महाराज झालात.

विजयीभव : या शुभप्रसंगी श्रीकांत शिंदे आपल्या मुलाखतीत म्हणतात, ‘‘महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्गे दुर्गेश्‍वर किल्ले रायगड येथील शिवछत्रपतींच्या पुतळ्याला अखंड पुष्पहार अर्पण करण्याचा नवोदित उपक्रम सुरू केला आहे. त्यास आज ६ वर्षे पूर्ण होत असून, पुढेही हा उपक्रम असाच अखंडपणे चालूच राहील.सदर उपक्रम डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे

ओएसडी मंगेश चिवटे यांचे चिवटे बंधूंचे मुक्ताई गारमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यान्वित केला जात आहे. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक प्रमुख मंगेश चिवटे हे या उपक्रमावर लक्ष ठेऊन असतात. इतकेच नव्हे तर, तेथील विविध धार्मिकस्थळांना पुष्पहार अर्पण करणे अन् परिसराची स्वच्छता ठेवणे ही कामेदेखील सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्याचे मंगेश चिवटे यांच्या परिवाराकडून तनमनधनाने केली जात आहेत. या अद्वितीय संकल्पनेची कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराजांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. या उपक्रमामुळे शिवरायांच्या वैभवात आणखी एक मानाचा शिरपेच खोवला गेला आहे, याचा मनस्वी अभिमान वाटतो.

खासदारसाहेब पुढे म्हणतात, ‘‘महत्वाचे म्हणजे शिवराज्याभिषेकचे औचित्य साधून माझ्या मतदारसंघाच्या क्षेत्रातील डोंबिवली पूर्व येथील शिवसेनेच्या मध्यवती शाखेजवळील शिवस्मारकावर मेघडंबरीसह शिवछत्रपतींच्या सिंहासनरूढ पूर्णाकृती पुतळ्याचे मागील वर्षी अनावरण झाल्याने मला विशेष आनंद होतो’’.

**जय जिजाऊ माँसाहेब**
**जय शहाजीराजे भोसले**
**जय शिवछत्रपती**
**जय छत्रपती शंभुराजे**
**जयहिंद**
जयमहाराष्ट्र ●●

**सुधाकर लाड**



## छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराचे पहिले नौदल सेनापती

# दर्यावीर मायनाईक भंडारी

कोकणच्या समुद्रकिनारी, खाडी किनारी राहणाऱ्या भंडारी समाजाला दैदिप्यमान असा इतिहास आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मराठी स्वराज्यासाठी लढणाऱ्या सैन्यात महाराष्ट्रातील अठरा पगड जातीतील मूळनिवासी असलेले ‘भंडारी’ लोक मोठ्या संख्येने होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारातील लढावू जहाजांवर व व्यापारी जहाजांवर सेनापती आणि खलाशी पदांवर पट्टीचे दर्यावर्दी असलेले ‘भंडारी’ समाजातील लोक होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराचे नौदल सेनापती दर्यावीर मायनाईक भंडारी (मायाजी भाटकर) हे पहिले आरमाराचे सेनापती ‘भंडारी’ समाजातील होते.

‘भंडारी’ हा संस्कृत शब्द असून ‘भंडार’ म्हणजे खजिना यावरून तो अस्तित्वात आल्याचे भंडारी सांगतात. भंडारी जातीच्या लोकांची वस्ती प्रामुख्याने समुद्र किनारपट्टीवर, खाडी किनारी आढळते. ताडीमाडी काढणे, मासेमारी हा त्यांचा परंपरागत व्यवसाय असून शेती, मजुरी, सुतारकाम, गवंडीकाम, होड्या, मचवे चालवणे इत्यादी कामे हे लोक करतात. भंडारी जातीत देवळी उर्फ बंदे, शेषवंशी, शिंदे, हेटकरी, कित्ते उर्फ उपरकरी, गावंड व क्रियापळ या सहा शाखा आहेत. यापैकी कित्ते भंडारी आणि हेटकरी या पोटजाती विशेष प्रगत आहेत. भंडारी जातीतील लोक भगवान महादेव, कालिकादेवी व इतर काही देवतांना भजतात. भंडारी जातीत अनेक कुळे असून कदंबवृक्ष त्यांचे प्रमुख देवक आहे. या व्यतिरिक्त वड, पिंपळ, आंबा, उंबर इत्यादी देवके असतात. त्यांच्या लग्नात लाजा होम, सप्तपदी व शिलारोहण इत्यादी विधींना प्राधान्य असते.

**(संदर्भ : रायगड जिल्हा गॅझेटिअर)**

छत्रपती शिवाजी महाराजांनी इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच, डच, सिद्दी यांच्या सागरी सत्तांना पायबंद घालण्यासाठी व कोकण किनारपट्टीचे संरक्षण करण्यासाठी सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, पद्मदुर्ग, खांदेरी, कुलाबा हे सागरी किल्ले बांधले. कल्याणला इ.स. १६५७ ला पहिले आरमारी जहाज बनवून आरमाराची मुहूर्तमेढ रोवली. आरमारी सामर्थ वाढवले. (संदर्भ : जेधेशकावली पृष्ठ ४) छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील आद्य व्यापारी असलेल्या वैशांना इ.स. १६६५ साली मस्कत आणि अरबस्तानात व्यापार करण्यासाठी पाठवले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी मध्ययुगीन कालखंडात हिंदुधर्मातील ‘मनुस्मृति’ व ‘कलिवर्ज्य प्रकरण’ या धर्मग्रथांनी समुद्र प्रवासाला, व्यापाराला घातलेली बंदी मोडली. आणि सागरी मार्ग सर्वांसाठी खुला केला. छत्रपती शिवाजी महाराज भारतीय आरमाराचे जनक होते. त्याचबरोबर सागरी व्यापाराचेही ‘जनक’ होते. छत्रपतींनी कल्याण, वसई, भिवंडी, पनवेल, खारपाडा, वेंगुर्ला, राजापुर, मालवण, चौल, खारेपाटण येथे आरमारी लढावू जहाजे आणि व्यापारी जहाजे बांधण्याच्या गोद्या बांधल्या. या गोद्यांत तयार केलेली शिवाड, तराडी, मचवा, पगार, महागिऱ्या, तारू, दुबार, तिरकाटी, गल्लीव्हट इत्यादी प्रकारची ७०० लढावू जहाजे होती. (संदर्भ : कृष्णा अनंत सभासद व मल्हार रामराव चिटणीस बखर)

धाडसीपणा आणि पट्टीचे दर्यावर्दी असलेल्या कोकणपट्टीत राहणाऱ्या ‘भंडारी’ समाजातील लोकांना छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या आरमारात दाखल करून घेतले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारातील ‘भंडारी’ समाजातील पट्टीच्या दर्यावर्दींनी सागराच्या लाटांवर स्वार होवून सागरांगणावर पराक्रमाची शर्थ करून इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, सिद्धी या सागरी सत्ताधीशांवर सागरी गनिमी काव्याने आपला धाक बसवला होता. सभासद बखरीत शिवाजी महाराजांच्या आरमाराबद्दल लिहिले आहे; ‘राजीयांनी समद्रास पालाण घातले’. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सागरी आरमारी लढावू जहाजांवर व व्यापारी जहाजांवर नारखोडा, मालिम, नाखवा, तांडेल हे अधिकारी होते तर दर्यासारंग, मायनाईक ही सागरी आरमारातील प्रमुख सेनापतींची पदे होती. ज्याची सागरावर सत्ता आणि ज्याच्या जवळ आरमार त्याचा समुद्र हे सुत्र छत्रपती शिवाजी महाराजांना माहित होते.

मुंबई बेटात येणाऱ्या शत्रुचे पारिपात्य करणे सोपे जावे, यासाठी मुंबई बंदराचे शेपूट म्हणून ओळखले जाणारे खांदेरी हे इंग्रजांच्या ताब्यातील राजकीय व व्यापारीदृष्ट्या अत्यंत महत्वाचे असे. मुंबईच्या दक्षिणेस १७.६ कि.मी. अंतरावरील बेट इ.स. १६७२ मध्ये ताब्यात घेण्याचा छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रयत्न केला होता. त्यावेळी छत्रपतींचे आरमार प्रमुख मायनाईक भंडारी (मायाजी भाटकर) दर्यासारंग दौलतखान नागावकर यांनी खांदेरी बेटावर मजुर माणसे उतरवून किल्ल्याची दगडी तटबंदी बांधण्यास सुरूवात केली. परंतु इंग्रजांनी त्यांना विरोध केला त्यामुळे त्यांना माघार घ्यावी लागली. त्यानंतर पुन्हा सात वर्षांनी इ.स. १६७९ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमाराचे सेनापती मायनाईक भंडारीला खांदेरी बेटावर तटबंदी बांधण्याचे आदेश दिले.

मायनाईक भंडारी याने खांदेरी बेटाचा ताबा घेतला आणि चुना किंवा शिसे यांचा उपयोग न करता मजुरांच्या मदतीने एकावर एक दगड रचून झटपट वैशिष्ट्यपूर्ण अशी तटबंदी बांधण्यास सुरूवात केली. खांदेरी बेटावर आढळणाऱ्या समुद्राच्या लाटा आणि इंग्रजांच्या आरमारी हल्ल्याला न जुमानता खांदेरी बेटावर मराठ्यांनी तटबंदी बांधण्यास सुरूवात केल्याचे समजल्यावर इंग्रजांनी कॅप्टन एनलाईन डॅनियल यास तीन शिवाडे (युद्धनौका) देवून खांदेरी बेटावर नांगर टाकण्याचे आदेश दिले. मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरने खांदेरी बेट मुंबई बेटाच्या परिसरात असल्यामुळे कायदेशीरपणे इंग्रजांच्या मालकीचे आहे ते मराठ्यांनी सोडून द्यावे, असे मायनाईक भंडारी (भाटकर) यांस कळिवले.

तेव्हा आम्ही फक्त छत्रपती शिवाजी महाराजांच्याच आज्ञेचे पालन करतो असे इंग्रजांना ठणकावून सांगितले आणि खांदेरी बेटाचा ताबा सोडण्यास मायनाईक भंडारीने नकार दिला. तेव्हा इंग्रजांनी कॅप्टन एनलाईन डॅनियलच्या मदतीस युद्ध साहित्य व सैनिक रिव्हेंज जहाजांतून पाठविले. १४, १५, १६ सप्टेंबर, १६७९ रोजी मराठी आरमारातील गुराबा युद्धनौका वादळी पावसाचा फायदा घेऊन इंग्रजांच्या आरमाराला गुंगार देऊन खांदेरी बेटावर रसद, बांधकाम साहित्य आणि आणखी मजुर घेवून पोहचल्या होत्या. मायनाईक भंडारी आणि दर्यासारंग दौलतखान नागावकर यांनी इंग्रजांशी लढत असतांना ‘खांदेरी’ बेटावर दगडी तटबंदी बांधण्याचे काम सुरू ठेवले होते. खांदेरी बेटाचा ताबा घेण्यासाठी इंग्रजांनी कॅप्टन रिचर्ड केगविन याची नेमणूक केली. इंग्रजांच्या आठ युद्ध नौका व दोनशे सैनिक या लढाईत गुंतले होते. १८–१९ ऑक्टोबर १६७९ रोजी इंग्रज व मराठे यांच्यात जोरदार लढाई झाली. नागावच्या खाडीतून छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराने थळ जवळील इंग्रज आरमारावर जलदगतीने हल्ला चढवला कॅप्टन रिचर्ड कॅगविनच्या गुराब व पाच तारवे मराठ्यांनी पकडून नेले. या चकमकीत इंग्रजांचे तीन नाविक अधिकारी मारले गेले.

२० सप्टेंबर रोजी इंग्रज रिव्हेज युद्ध नौकेवरील कॅप्टनने खांदेरी बेटाजवळ येऊन बेटावर इंग्रज सैनिकांना उतरविण्याचा प्रयत्न केला पण त्याचा तो प्रयत्न अयशस्वी झाला. कॅप्टन केगविनने खांदेरीची नाकेबंदी केली. तरीही खांदेरीवरील मराठ्यांचा असलेला ताबा इंग्रज काढून घेऊ शकले नाहीत. इंग्रजांनी फॉरच्यून जहाज व दोन शिवाडात युद्ध साहित्य भरून खांदेरी बेटावर पाठविले. परंतु मराठा आरमारापुढे आपला टिकाव लागणार नाही हे पटल्यावर मुंबईचा डेप्युटी गव्हर्नर जॉन चाईल्ड याने १८ जानेवारी १६८० या दिवशी मराठ्यांशी तह केला. इंग्रजांनी खांदेरीवरील मराठ्यांचे प्रभुत्व मान्य केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी इंग्रजांच्या ताब्यातील जिंकलेल्या या बेटाला ‘खांदेरी’ हे नांव दिले. खांदेरीचा अर्थ ‘खांद्यावरून वाहिलेले ओझे असा होतो. समुद्राच्या खांद्यावर स्वराज्याचे ओझे वाहणारा असा होतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सागरी आरमाराचे प्रमुख दर्यावीर मायनाईक भंडारी (मायाजी भाटकर) दर्यासारंग दौलतखान नागावकर यांनी खांदेरी बेटावर वर्चस्व प्रस्तापित करून मराठी स्वराज्याचा भगवा ध्वज अखेर खांदेरी बेटावर फडकवला. ‘खांदेरी किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या मराठी स्वराज्यात सामील केला. रत्नागिरी शहरापासुन ४ कि.मी. अंतरावर असलेल्या भाटये गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सागरी आरमाराचे प्रमुख दर्यावीर मायनाईक भंडारी (भाटकर) यांची समाधी आहे. मायनाईक भंडारी यांचे वंषज भाटये गावात राहतात. दिलीप भाटकर यांच्याकडे छत्रपती शिवाजी महाराजांनी मायनाईक भंडारी (भाटकर) यांना दिलेली सनद आहे.

सरकारी अनास्तेमुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराचे प्रमुख असलेल्या दर्यावीर मायनाईक भंडारी (भाटकर) यांचे भाटये हे मूळ गांव आणि समाधीस्थान उपेक्षित राहिले आहे, दुर्लक्षित राहिले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराचे सेनापती मायनाईक भंडारी (मायाजी भाटकर) यांनी घडवलेल्या इतिहासातून प्रेरणा घेवून शिवप्रेमींनी नवा इतिहास घडवायला हवा! नवा इतिहास घडवायला हवा !!

**संदर्भ ग्रंथ :–**
**१. रायगड जिल्हा गॅझेटीअर, २. जेधे षकावली, ३. सभासद बखर, ४. मल्हार रामराव चिटणीस बखर, ५. दै. सामना, दै. सकाळ**

**सुधाकर काशिनाथ नरसिंह लाड**
**(ज्येष्ठ पत्रकार/इतिहास संषोधक/लेखक)**
**भ्रमणध्वनी : ९२२४२३२९६३**



# बालांगण

## झिरकोनियमची बहुउपयुक्तता

झिरकोनियम हे एक महत्त्वाचे धातू खनिज आहे. त्याचा रंग चंदेरी करडा असतो. हा धातू मजबूत आणि हलका असतो. याला कधीही गंज लागत नाही. झिरकोनियम थेट शुद्ध स्वरूपात जमिनीत सहसा सापडत नाही. तो प्रामुख्याने 'झिरकॉन' नावाच्या खनिजामध्ये आढळतो. झिरकॉन हे लहान चमकदार दाण्यांसारखे दिसते. काही वेळा ते तपकिरी, पिवळसर, लालसर किंवा पारदर्शकही दिसू शकते. झिरकोनियम जमिनीच्या आत खडकांमध्ये तयार होते. खूप वर्षांपूर्वी पृथ्वीतील गरम द्रवरूप खडक थंड होत गेले, तेव्हा वेगवेगळी खनिजे तयार झाली. त्या प्रक्रियेत झिरकॉन खनिज तयार झाले. नंतर पाऊस, वारा आणि नद्यांमुळे खडक झिजत गेले आणि झिरकॉनचे लहान कण वाळूत मिसळले. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावरील वाळूमध्येही झिरकॉन सापडते. भारतात केरळ, तामिळनाडू, ओडिशा व आंध्र प्रदेशच्या किनारी भागांत झिरकॉन आढळते. समुद्रकिनाऱ्यावरील काही विशेष काळसर वाळूमध्ये हे खनिज मिळते. जगात ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि चीन या देशांमध्ये झिरकोनियम मोठ्या प्रमाणात मिळते.



झिरकोनियम मिळवण्यासाठी प्रथम झिरकॉन असलेली वाळू किंवा खडक गोळा केले जातात. त्यानंतर विशेष पद्धतीने त्यातील झिरकॉनचे कण वेगळे केले जातात. या खनिजावर उष्णता आणि रासायनिक प्रक्रिया करून शुद्ध झिरकोनियम धातू तयार केला जातो. झिरकोनियमचा सर्वात महत्त्वाचा उपयोग अणुऊर्जा निर्मितीत होतो. अणुभट्ट्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या काही भागांसाठी झिरकोनियम उपयुक्त असते, कारण ते खूप उष्णता सहन करू शकते आणि सहज खराब होत नाही. वैद्यकीय क्षेत्रातही झिरकोनियम महत्त्वाचे आहे. काही कृत्रिम दात, दातांचे क्राऊन आणि शरीरात बसवायच्या काही वस्तूंमध्ये याचा उपयोग केला जातो. कारण शरीराच्या आत राहिले तरी झिरकोनियम गंजत नाही.

**माहिती खनिजांची**

याशिवाय झिरकोनियमचा उपयोग मातीच्या भांड्यांमध्ये, चमकदार फरशा बनवण्यात, उष्णता सहन करणाऱ्या वस्तू, काही रसायने, काही घड्याळे आणि दागिन्यांमध्येही केला जातो. त्याच्या उपयोगी गुणधर्मांमुळे त्याला अणुऊर्जा, वैद्यकीय साधने, दागिने अशा अनेक क्षेत्रांत मोठी मागणी आहे. एकूणच, झिरकोनियम हे फारसे माहीत नसलेले पण अत्यंत महत्वाचे आणि उपयुक्त खनिज आहे.

## पावसाळ्यात राहा दुर्गंधीमुक्त

पावसाळा लवकरच सुरू होत आहे. या दिवसांत कपडे ओलसर राहिल्यामुळे, सूर्यप्रकाशाच्या अभावामुळे कपड्यांना तसेच त्यामुळे शरीराला दुर्गंधी येऊ शकते. ओलाव्यामुळे बॅक्टेरिया वाढू लागतात आणि तेच दुर्गंधी निर्माण करतात. मित्रांनो, ती दूर करण्यासाठी काही घरगुती उपाय करता येतील. आज त्याबद्दलची माहिती घेऊया.



**करा हे उपाय**

✲ लिंबू आणि गुलाबपाणी मिसळून लावल्याने कुबट वास निघून जातो. लिंबूमध्ये सायट्रिक ॲसिड असते, जे त्वचेची पीएच पातळी संतुलित करते आणि बॅक्टेरिया वाढण्यापासून देखील रोखते. गुलाबपाणी त्वचा थंड करते आणि त्याचा सुगंध देखील दुर्गंधी कमी करतो. म्हणूनच यासाठी अर्धा लिंबू एक चमचा गुलाबपाण्यात पिळून कापसाच्या मदतीने काखेखाली आणि इतर घामाच्या ठिकाणी लावा. १५-२० मिनिटे असेच राहू द्या आणि नंतर पाण्याने धुवा. यामुळे तुम्हाला स्वच्छ वाटेल. शरीराला येणारी दुर्गंधी कमी होईल.

✲ बेकिंग सोडा कुबट, घामाचा वास शोषून घेतो आणि नैसर्गिक दुर्गंधीनाशक म्हणून काम करतो. नारळाच्या तेलात ॲंटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. ते शरीरावर बॅक्टेरिया वाढण्यापासून रोखतात. हे मिश्रण लावल्याने शरीराची दुर्गंध निघून जातो. त्यासाठी दोन चमचे बेकिंग सोड्यात एक चमचा नारळ तेल मिसळून पेस्ट करा आणि त्वचेवर लावा. १०-१५ मिनिटे तसेच राहू द्या. यानंतर कोमट पाण्याने धुवा. यामुळेही पावसाळ्यातील दमटपणाने शरीराला येणारी दुर्गंधी दूर होईल.

✲ घामाचा वास दूर करण्यासाठी ॲपल सायडर व्हिनेगरही खूप प्रभावी आहे. त्यात ॲंटी-बॅक्टेरियल आणि ॲंटी-फंगल गुणधर्म असतात जे घामाचा वास कमी करतात. इतकेच नव्हे तर ते घामामुळे होणाऱ्या बॅक्टेरियाच्या वाढीस देखील प्रतिबंधित करतात. याचे लाभ मिळवण्यासाठी एक कप पाण्यात दोन चमचे सफरचंद सायडर व्हिनेगर मिसळा आणि कापसाच्या मदतीने घाम येतो त्या भागांवर लावा. १० मिनिटे तसेच राहू द्या, नंतर थंड पाण्याने स्वच्छ करा. तुम्ही हे मिश्रण दररोज वापरू शकता.



## होर्मुझची सामुद्रधुनी

सामुद्रधुनी म्हणजे दोन मोठ्या समुद्रांना किंवा जलभागांना जोडणारा अरुंद समुद्री मार्ग. हा मार्ग दोन भूभागांच्या म्हणजेच जमिनींच्या मध्ये असतो. एका समुद्रातून दुसऱ्या समुद्रात जाण्यासाठी हा जवळचा मार्ग असल्याने जहाजे, बोटी आणि व्यापारासाठी सामुद्रधुनीला खूप महत्त्व असते. हॉर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाच्या समुद्री मार्गांपैकी एक मानली जाते. ही सामुद्रधुनी पश्चिम आशियातील पर्शियन आखात आणि गल्फ ऑफ ओमान यांना जोडते. पुढे हा मार्ग अरबी समुद्र आणि हिंद महासागराकडे जातो. जगभरातील तेलवाहतूक आणि व्यापारासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे.

इराण आणि ओमान या देशांच्या मधोमध हॉर्मुझ सामुद्रधुनी आहे. उत्तरेकडील किनारा इराणचा असून, दक्षिणेकडे ओमान आणि त्याचा मुसंदम भाग आहे. ही सामुद्रधुनी साधारण १६० किलोमीटर लांब आहे. तिची रुंदी ठिकठिकाणी बदलते. सर्वात अरुंद भाग सुमारे ३३ किलोमीटर रुंद आहे. मात्र जहाजांना सुरक्षितपणे जाण्यासाठी वापरला जाणारा समुद्री मार्ग याहून खूप अरुंद, साधारण ३ किलोमीटरचा असतो. खोलीही ठिकठिकाणी बदलते. काही भागांमध्ये ती ६० मीटरपेक्षा जास्त आहे, त्यामुळे मोठमोठी तेलवाहू जहाजे येथे जाऊ शकतात.

**भू-गोल**

ही सामुद्रधुनी हजारो वर्षांपासून वापरात असल्याचे मानले जाते. प्राचीन काळात या भागातून मसाले, मोती, वस्त्रे आणि इतर वस्तूंची देवाण-घेवाण होत असे. नंतर तेलाचा शोध लागल्यानंतर तिचे महत्त्व अनेक पटींनी वाढले. हॉर्मुझ सामुद्रधुनी अनेक देशांना समुद्री मार्गाने जोडते. विशेषतः सौदीअरेबिया, इराक, कुवेत, कतार, बहारीन आणि युनायटेड अरब अमिरात या आखाती देशांच्या तेल आणि नैसर्गिक वायूनिर्यातीसाठी हा प्रमुख समुद्री मार्ग आहे. हे देश आपले बहुतांश तेल या मार्गाने जगभर पाठवतात. इराणचा किनारा मोठा आणि सामरिकदृष्ट्या प्रभावी असल्याने या भागात त्याचा प्रभाव जास्त मानला जातो. कधी कधी राजकीय तणाव वाढला की इराण हॉर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याची धमकी देतो. त्यामुळे जगभरातील तेलाच्या किमती वाढण्याची भीती निर्माण होते. व्यापारी दृष्टिने हॉर्मुझ सामुद्रधुनीला जगाचे तेलाचे प्रवेशद्वार म्हटले जाते. जगातील कच्चे तेल आणि द्रवरूप नैसर्गिक वायूचा मोठा हिस्सा याच मार्गाने नेला जातो. हा मार्ग काही दिवस बंद झाला तरी अनेक देशांमध्ये इंधनटंचाई निर्माण होऊ शकते आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अनेक महासत्ता या भागावर सतत लक्ष ठेवून असतात.

## फोन भिजल्यास घ्या ही काळजी...

पावसाळ्यात फोन भिजण्याचा, त्यात पाणी शिरण्याचा मोठा धोका असतो. वेगवेगळ्या कारणांसाठी सतत स्मार्टफोन वापरावा लागत असल्यामुळे पावसात भिजला की, भलतीच काळजी वाटते. असे झाल्यास तुम्हीही घाबरत असाल. लगेच फोन सुरू करण्याचा किंवा सुकवण्याचा प्रयत्न करत असाल. परंतु तुम्हाला अजिबात घाई करण्याची गरज नाही. कारण तुमची एक छोटीशी चूक फोन कायमचा खराब करू शकते. तेव्हा फोन भिजल्यास कोणत्या चुका टाळायच्या हे जाणून घ्या.

**या चुका करू नका**

✲ पावसात भिजल्यानंतर बरेचजण फोन तपासण्याचा प्रयत्न करतात आणि तो योग्यरित्या काम करत आहे की नाही हे पाहण्यासाठी लगेचच चार्ज करतात. पण ही एक मोठी चूक आहे. यामुळे फोनमध्ये शॉर्ट सर्किट होऊ शकते. मोठा अपघात संभवतो. म्हणूनच फोन ओला असताना कधीही चार्जिंगला लावू नका.

✲ पावसात फोन भिजल्यानंतर काही मुले तो हेअर ड्रायर किंवा हीटरने वाळवण्यास सुरुवात करतात, परंतु तुम्ही असे अजिबात करू नये. हेअर ड्रायर आणि हीटरमधून येणाऱ्या उष्णतेमुळे फोनच्या अंतर्गत भागांचे नुकसान होऊ शकते. यामुळे संवेदनशील घटक वितळू शकतात आणि स्क्रीन आणि बॅटरीलाही नुकसान होऊ शकते. म्हणून अशी चूक अजिबात करू नका.




✲ फोन भिजल्यास तो तांदळात ठेवल्यामुळे लवकर सुकतो, असे काहींना वाटते. परंतु यामुळे फोनमधील ओलावा पूर्णपणे निघून जात नाही. बऱ्याच वेळा तांदूळ चार्जिंग पोर्टमध्ये अडकतो. त्यामुळे हा उपायही अयोग्य आहे.

✲ फोन हलवल्याने आतील पाणी निघून जाईल असे काहींना वाटते. परंतु उलट असे केल्याने पाणी फोनच्या इतर भागांमध्ये जाऊ शकते.

## प्रकाशसंश्लेषण

### वनस्पतींची अन्ननिर्मितीप्रक्रिया

प्रकाशसंश्लेषण ही झाडांची अन्न तयार करण्याची अतिशय महत्त्वाची आणि आश्चर्यकारक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळेच पृथ्वीवर जीवन टिकून आहे. झाडे इतर सजीवांप्रमाणे अन्न शोधत नाहीत, तर स्वतःचे अन्न स्वतः तयार करतात. म्हणून झाडांना 'स्वयंपोषी' असे म्हटले जाते. झाडांच्या पानांमध्ये हिरव्या रंगाचे एक विशेष द्रव्य असते. त्याला हरितद्रव्य म्हणतात. हे हरितद्रव्य सूर्यप्रकाश शोषून घेते. सूर्यप्रकाश हा प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेचा मुख्य भाग असतो. झाडे मुळांद्वारे जमिनीतून पाणी शोषून घेतात. तसेच पानांवर असलेल्या अतिशय छोट्या छिद्रांमधून (रंध्रे) हवेतला कार्बन डायऑक्साइड वायू शोषतात. सूर्यप्रकाश, पाणी आणि कार्बन डायऑक्साइड यांच्या मदतीने झाडे पानांमध्ये अन्न तयार करतात. हे अन्न साखरेसारखे असते. त्यामुळे झाडांना ऊर्जा मिळते. ही ऊर्जा वापरून झाडे वाढतात. नवीन पाने तयार होतात. फुले येतात आणि फळे लागतात. काही अन्न झाडे मुळे, खोड किंवा फळांमध्ये साठवून ठेवतात. उदाहरणार्थ, बटाट्यामध्ये आणि गाजरामध्ये अन्न साठवलेले असते.



प्रकाशसंश्लेषण करताना झाडे एक खूप महत्त्वाचा वायू बाहेर सोडतात. तो म्हणजे ऑक्सिजन. माणसे, प्राणी आणि इतर सजीव श्वास घेण्यासाठी ऑक्सिजन वापरतात. म्हणूनच झाडांना 'पृथ्वीचे हिरवे फुप्फुस असेही म्हटले जाते. झाडे नसती तर हवेत ऑक्सिजन कमी झाला असता आणि जीवसृष्टीला जगणे खूप कठीण झाले असते.

**रंजक विज्ञान**

दिवसा सूर्यप्रकाश असताना प्रकाशसंश्लेषण जास्त होते. रात्री सूर्यप्रकाश नसल्यामुळे ही प्रक्रिया थांबते. म्हणून झाडे दिवसाच्या वेळी जास्त सक्रिय असतात. जास्त हिरवी पाने असलेल्या झाडांमध्ये ही प्रक्रिया अधिक चांगली चालते. समुद्रातील लहान हिरव्या वनस्पती आणि शेवाळेदेखील प्रकाशसंश्लेषण करतात. त्यामुळे पृथ्वीवरील मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन तयार होतो. म्हणून जंगलांचे, झाडांचे आणि निसर्गाचे संरक्षण करणे खूप गरजेचे आहे. आपण खातो त्या अन्नाचाही प्रकाशसंश्लेषणाशी संबंध आहे. आपण खात असलेली भाजी, फळे, धान्य हे झाडांनी तयार केलेल्या अन्नातूनच मिळतं. अगदी दूध, अंडी किंवा मांस खाणाऱ्या प्राण्यांचे अन्नही शेवटी झाडांवरच अवलंबून असतं. सध्या वाढत्या लोकसंख्येला अन्न कसं पुरवावं? हा संपूर्ण जगाला भेडसावणारा प्रश्न आहे. सध्या तरी मनुष्य अन्नासाठी वनस्पतीवरच अवलंबून आहे. परंतु जी रासायनिक प्रक्रिया वनस्पती त्यांच्या कोशिकेत म्हणजेच पेशीत घडवून आणतात, तशी प्रक्रिया मनुष्याला त्या प्रयोगशळेतून घडवून आणता येऊ लागली म्हणजे वाढत्या लोकसंख्येला अन्न पुरवण्याचा प्रश्न सुटेल.

पृथ्वीवरील जवळजवळ सर्व अन्नाचा पाया प्रकाशसंश्लेषण आहे. म्हणूनच झाडे लावणे, त्यांची काळजी घेणे आणि जंगलांचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. झाडे आपल्याला अन्न, सावली, औषधे, लाकूड आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शुद्ध हवा देतात आणि आपले जगणे आनंददायी बनवतात.

## माहिती कॉफीची

कॉफीची लागवड करण्यापासून पूड तयार करण्यापर्यंतची प्रक्रिया बरीच मोठी आहे. कॉफी नेमकी कशी तयार होते याबाबतची ही रंजक माहिती...



**माहिती आहे?**

कॉफीच्या बिया असतात. नव्याने पेरलेलं कॉफीचं रोपट वाढून त्याला फळं लागेपर्यंत तीन ते चार वर्षांचा कालावधी लागतो. कॉफीच्या फळाला 'चेरी' म्हटलं जातं. कॉफीची पिकलेली चेरी लाल रंगाची असते. कॉफीच्या मळ्यात काम करणारे लोक कोणत्याही यंत्राचा वापर न करता हातांनी तोडूनच कॉफीच्या झाडावरची फळं काढतात. एक कर्मचारी दिवसभरात साधारणपणे १०० ते २०० पाउंड कॉफी चेरी वेचतो. यापासून २० ते ४० पाउंड कॉफी बीन्सची म्हणजेच कॉफीच्या बियांची निर्मिती होते. कॉफीची लागवड साधारणपणे पावसाळ्याच्या आसपास मातीत ओलावा असताना केली जाते.

फळं वेचल्यानंतर कॉफी निर्मितीच्या प्रक्रियेला लगेच सुरूवात करावी लागते. नाहीतर फळं खराब होऊ शकतात. सर्वप्रथम कॉफीची फळं उन्हात वाळवून घेतली जातात. या चेऱ्यांमधला ओलावा निघून गेल्यानंतरच कॉफी तयार केली जाते. यासाठी काही आठवडे किंवा महिनेही लागू शकतात. आकारानुसार आणि प्रकारानुसार कॉफीच्या बियांची निवड केली जाते. खराब झालेल्या बिया टाकून दिल्या जातात. चांगल्या दर्जाची कॉफी निर्यात केली जाते.



## स्पेस सायन्समधील स्कोप

लहानपणापासूनच आपल्याला आकाशात दिसणाऱ्या सूर्य, चंद्र, तारे यांबद्दल जिज्ञासा असते. तुम्हालाही अंतराळात दडलेली गुपितं उलगडावीशी वाटत असतील. पण यासाठी तुम्हाला अंतराळ संशोधक म्हणजे स्पेस सायंटिस्ट व्हावं लागेल. 'इस्रो'मध्ये स्पेस सायंटिस्ट बनण्यासाठी तुम्हाला गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय घेऊन बारावी उत्तीर्ण व्हावं लागेल. यासोबतच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजीची प्रवेश परीक्षाही द्यावी लागेल. एअरोस्पेस इंजिनिअरींग, मॅकेनिकल इंजिनिअरींग, रेडिओ इंजिनिअरींग आदी शाखांमध्ये पदवी मिळवणारे विद्यार्थी अंतराळ संशोधन क्षेत्रात जाऊ शकतात. इस्रो अशा गुणवंतांच्या शोधात असतं. मात्र इथे प्रवेश मिळवण्यासाठी तुमच्याकडे प्रचंड हुशारी हवी. त्याचबरोबर तुमच्यात अंतराळाची ओढ, उत्सुकता, कल्पकता हे गुणही हवेत. 'इस्रो'तर्फे आयसीआरबी परीक्षेचं आयोजन केलं जातं. ही परीक्षा इलेक्ट्रॉनिक, मॅकेनिकल आणि कॉम्प्युटर अशा तीन विभागांत घेतली जाते. बीई, बी.एस्सी. तसंच आयआयटी या विषयात पदवीला ६५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवलेले विद्यार्थी ही प्रवेश परीक्षा देऊ शकतात. या परीक्षेसाठी बरीच तयारी करावी लागते. तेव्हा तयारीला लागा!

**कोण होणार?**

## प्लॅस्टिकला करा बायबाय




प्लॅस्टिकमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची तुम्हाला माहिती आहे. एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकमुळे प्रदूषणात मोठी भर पडते. प्लॅस्टिकच्या पिशव्या, ग्लास, शीतपेयांच्या बाटल्या, स्ट्रॉ यासारख्या वस्तूंची गणना सिंगल यूज प्लास्टिकमध्ये होते. या वस्तू आपण एकदाच वापरतो आणि टाकून देतो. म्हणूनच हळूहळू सिंगल युज प्लॅस्टिकचा वापर कमी करत त्यावर पूर्णपणे बंदी घालण्याची योजना आखली जात आहे. मित्रमैत्रिणींनो, तुम्हीही प्लास्टिकचा वापर कमी करायला हवा. प्लॅस्टिकच्या पिशव्या वापरणं बंद करायला हवं. फक्त पिशव्याच नव्हे तर तुमच्या शालेय साहित्यातल्या बऱ्याच वस्तूही प्लास्टिकच्या असतात. त्यातील बरंच साहित्य एकदा वापरून टाकून दिलं जातं. अर्थात या वस्तूंना पर्यायही सापडायला हवेत. प्लॅस्टिकचं विघटन होण्यास काही हजार वर्षांचा कालावधी लागतो. प्लॅस्टिकच्या पिशव्या किंवा इतर वस्तू रिसायकल केल्या नाहीत तर त्या पर्यावरणासाठी घातक ठरू शकतात.

**महत्त्वाचे काही**

### स्मार्ट टिप्स

#### नियोजन करा



अभ्यास आटपण्यासाठी वेळेचं नियोजन करणं गरजेचं आहे. यासाठी दिवसभरातल्या कामांची यादी करून घ्या. अभ्यासाचा प्राधान्यक्रम ठरवा. कोणत्या विषयाचा अभ्यास कधी करायचा हे आधी ठरवून घ्या. मग अभ्यासाला लागा. यामुळे तुमचं काम सोपं होईल.

### ट्राय इट


#### चीज कॉर्नफ्लेक्स



आवडत असल्यास तुम्ही चिज कॉर्नफ्लेक्स खाऊ शकता. यासाठी एक कप कॉर्नफ्लेक्स, अर्धा कप भाजलेले दाणे, दोन चमचे किसलेलं चीज, पाव चमचा लाल तिखट, एक चमचा बटर आणि चवीनुसार मीठ असं साहित्य घ्या. सर्वात आधी मायक्रोवेव्ह १८० अंश सेल्सियसला प्रीहिट करून घ्या. गरज असल्यास यासाठी मोठ्यांची मदत घ्या. आता एका काचेच्या बाऊलमध्ये कॉर्नफ्लेक्स, बटर, दाणे, चीज, तिखट आणि मीठ असं साहित्य घाला. नीट हलवून घ्या. यानंतर बाऊल मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. दोन मिनिटं गरम करा. गरमागरम चीज कॉर्नफ्लेक्स खा.

### प्राणीजगत

#### जग पेंग्विनचं



पेंग्विन हा एक पक्षी आहे. पण त्याला उडता येत नाही. हे पक्षी मासे खातात. ते दक्षिण गोलार्धात, थंड वातावरणात रहातात. न्यूझीलंडमध्येही पेंग्विन आढळतात. त्यांचे डोळे पिवळ्या रंगाचे असतात. लिटिल ब्लू पेंग्विन ही पेंग्विनची सर्वात लहान प्रजाती आहे. या पेंग्विनची उंची फक्त १६ इंच असते तर एम्परर पेंग्विनची उंची जवळपास तीन फूट असते. पेंग्विन बर्फावर तुरूतुरू चालतात.

### योगा टाईम

#### कशासाठी... पोटासाठी...



पोटाचं आरोग्य उत्तम असायला हवं. म्हणूनच पोटासाठी काही योगासनं आहेत जी नियमितपणे करायला हवी. त्यापैकी एक आसन म्हणजे पादोगुष्ठनासा स्पर्शासन. या आसनामुळे पाठ आणि मानेचे स्नायू बळकट होतात. पचनक्रिया सुधारते. पोटाच्या बारिकसारीक तक्रारी दूर होतात. त्यामुळे या आसनाची माहिती घ्या आणि नियमितपणे करा.

## निवडक

### केएस भरतची तडकाफडकी निवृत्ती

**नवी दिल्ली :** भारताचा यष्टीरक्षक-फलंदाज केएस भरतने गुरुवारी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. ३२ वर्षीय भरतने सोशल मीडियावर भावनिक पोस्ट शेअर करत आपल्या क्रिकेट कारकिर्दीतील सर्व सहकाऱ्यांचे, प्रशिक्षकांचे आणि कुटुंबीयांचे आभार मानले. केएस भरतने भारताकडून सात कसोटी सामने खेळले. त्याने आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीला विश्वासार्ह यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून ओळख निर्माण केली. तसेच तो २०२३ मधील आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये भारतीय संघाचाही भाग होता. मात्र, सातत्यपूर्ण कामगिरी करण्यात अपयश आल्याने त्याला भारतीय संघातील स्थान कायम राखता आले नाही.निवृत्तीची घोषणा करताना भरत म्हणाला की, अत्यंत अभिमान आणि कृतज्ञतेसह, मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेत आहे. माझ्या देशासाठी खेळणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा सन्मान ठरला आहे. माझ्या या प्रवासासाठी प्रचंड चिकाटी आणि मानसिक बळाची आवश्यकता होती; कसोटी सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा जो बहुमान मला लाभला, त्यामुळे या प्रवासातील प्रत्येक क्षण माझ्यासाठी अनमोल ठरला. गेल्या दोन दशकांपासून, माझ्या संपूर्ण कुटुंबाने माझ्यासोबतच हे स्वप्न जगले आहे. भरतने आपल्या पोस्टमध्ये भारताचा माजी कर्णधार विराट कोहली यांचेही आभार मानले. माझ्या आयपीएल पदार्पणावेळी विराट कोहली यांनी मला माझी गुणवत्ता दाखवण्याची संधी दिली आणि माझ्यावर विश्वास ठेवला, असे त्याने नमूद केले. तसेच भारतीय कसोटी संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा आणि माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्याबद्दलही त्याने कृतज्ञता व्यक्त केली. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली कसोटी पदार्पण करण्याची संधी मिळाल्याचे सांगत त्याने हा क्षण आपल्या कारकिर्दीतील सर्वात संस्मरणीय क्षणांपैकी एक असल्याचे म्हटले.



### विराट जायबंदी; रोहितबाबत संभ्रम

**नवी दिल्ली :** भारताचा तारांकित फलंदाज विराट कोहली स्नायूंच्या दुखापतीमुळे अफगाणिस्तान संघाविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेला मुकणार आहे. बीसीसीआय लवकरच याविषयी अधिकृत घोषणा करेल. मात्र बहुतांशी इंग्रजी संकेतस्थळांसह पीटीआयने विराटला किमान २-३ आठवडे विश्रांतीचा सल्ला देण्यात आल्याचे वृत्त दिले आहे. तसेच रोहित शर्माच्या तंदुरुस्तीबाबतही संभ्रम असल्याचे समजते. आयपीएलचा १९वा हंगाम नुकताच संपन्न झाला. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात टी-२० विश्वचषक उंचावल्यानंतर आता अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी सामन्याद्वारे भारतीय संघ आंतरराष्ट्रीय क्रिकेटला पुन्हा प्रारंभ करणार आहे. ६ जूनपासून भारत-अफगाणिस्तान यांच्यात मुल्लानपूर येथे कसोटी सामना रंगणार असून त्यानंतर उभय संघांत ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका होणार आहे. ३७ वर्षीय विराटच्या उजव्या पायाचे स्नायू आयपीएलच्या अंतिम सामन्यात ताणले गेले होते. त्यावेळी विराट धावताना काहीसा अडखळतानाही दिसला. तरीही विराटने नाबाद अर्धशतकी खेळी साकारून बंगळुरूला जेतेपद मिळवून दिले होते. मात्र आता तो अफगाणिस्तानविरुद्ध तिन्ही सामन्यांना मुकणार आहे. १३ जून रोजी धरमशाला येथे पहिला, तर १७ व २० जून रोजी अनुक्रमे लखनऊ व चेन्नई येथे दुसरा व तिसरा एकदिवसीय सामना होईल. स्नायूंच्या दुखापतीमुळे विराट एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. अंतिम सामन्यादरम्यान तो जायबंदी झाला होता. स्कॅनमध्ये त्याच्या पायाच्या स्नायूला गंभीर दुखापत झाल्याचे समोर आले आहे. ही एक दुर्मिळ दुखापत असून यामध्ये गुडघ्याच्या खालील हाडाच्या आतील भागाला स्नायू जोडणारा जाड अस्थिबंध प्रभावित होतो, असे बीसीसीआयच्या पदाधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

### समीरला हातोडाफेकमध्ये सुवर्ण

**पुणे :** ७४ व्या महाराष्ट्र राज्य वरिष्ठ गटाच्या मैदानी स्पर्धेत भंडाऱ्याच्या समीर देशमुखने पुरुषांच्या हातोडाफेकमध्ये विक्रमासह सुवर्णपदक पटकावले, तर महिलांच्या भाला फेकमध्ये पुण्याच्या सृष्टी सिंहने सलग तिसऱ्यांदा सुवर्णयश मिळवले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत पुरुषांच्या हातोडाफेकमध्ये भंडाऱ्याच्या समीर देशमुखने ५८.४५ मीटर कामगिरी नोंदवून नवा विक्रम प्रस्थापित केला. यापूर्वी, २०१९मध्ये मिराज अलीने ५६.८६ मीटर कामगिरीसह विक्रम प्रस्थापित केला होता. अमरावतीच्या मुन्सिफ अली शेखने ५३ मीटर कामगिरीसह रौप्य, तर पुण्याच्या अनुज डेंगळेने ५०.१७ मीटर कामगिरीसह ब्राँझ मिळवले.महिलांच्या भालाफेकमध्ये पुण्याच्या सृष्टीसिंहने ४५.८२ मीटर कामगिरी नोंदविताना सुवर्णपदक पटकावले. साताऱ्याच्या दूर्वा शेवाळेने रौप्यपदक तर कोल्हापूरच्या अदिती पाटीलने ब्राँझपदक मिळवले. सृष्टीचे हे या स्पर्धेतील सलग तिसरे सुवर्ण ठरले. यापूर्वी, सृष्टीने २०२५मध्ये झालेल्या राज्य स्पर्धेत ४३.१५ मीटर कामगिरीसह, तर २०२४मध्ये राज्य स्पर्धेत ३८.४७ मी. कामगिरीसह सुवर्ण मिळवले होते.

# लॉर्ड्स कसोटीत गोलंदाजांचा कहर

## पहिल्याच दिवशी १६ विकेट्स, जेमिसनचा पंच,रॉबिन्सनचं ३ विकेट्स मेडन षटक

**। लॉर्ड्स । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिला सामना लॉर्ड्सच्या मैदानावर खेळवला जात आहे. लॉर्ड्स कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी गोलंदाजांचा दबदबा पाहायला मिळाला. पहिल्या दिवशी दोन्ही संघांच्या एकूण १६ विकेट्स पडल्या आहेत आणि फलंदाजांना धावा काढण्यासाठी अक्षरशः संघर्ष करताना दिसले. दरम्यान काईल जेमिसनने ५ विकेट्स आणि ऑली रॉबिन्सनने तीन विकेट मेडन षटक टाकलं.



न्यूझीलंडचा संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर असून पहिल्याच सारन्यात लॉर्ड्सच्या खेळपट्टीने दोन्ही संघांच्या फलंदाजांसाठी कर्दनकाळ ठरलं. असमान उसळी असलेल्या खेळपट्टीवर पहिल्याच दिवशी तब्बल १६ विकेट्स पडल्या. ढगाळ वातावरणामुळे वेगवान गोलंदाजांना हवेत आणि खेळपट्टीवरूनही भरपूर मदत मिळत होती, त्यामुळे फलंदाजांसाठी मात्र मोठं आव्हान होतं.

नाणेफेक जिंकून न्यूझीलंड क्रिकेट संघाने प्रथम गोलंदाजीचा योग्य निर्णय घेतला आणि त्यांच्या वेगवान गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवलं. सीमर्सना मिळालेल्या अनुकूल परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेत त्यांनी चेंडूने विकेट्सची रांग लावली आणि प्रतिस्पर्धी फलंदाजांना सतत अडचणीत टाकलं. किवी संघाच्या चार वेगवान गोलंदाजांनी इंग्लंडच्या फलंदाजीला खिंडार पाडलं. विशेषतः काईल जेमिसनने खेळपट्टीच्या अतिरिक्त उसळीचा आणि सीमचा पुरेपूर फायदा घेतला. इंग्लंडची आक्रमक बॅझबॉल फलंदाजी अयशस्वी ठरली आणि संघाने पहिल्या १० षटकांत केवळ २४ धावा केल्या.

बेन डकेट (१९), जेकब बेथेल (६) आणि जो रूट (१) झटपट बाद झाले, त्यामुळे इंग्लंडची धावसंख्या ४ गडी बाद ३३ झाली. पावसामुळे डावात व्यत्यय आला आणि यादरम्यान न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीला पाठीच्या दुखापतीमुळे बाहेर पडावं लागलं, परंतु किवी गोलंदाजांनी आपलं वर्चस्व कायम ठेवलं. इंग्लंडकडून पुन्हा एकदा हॅरी ब्रुकने संघाचा डाव सावरला. ब्रुकने एका टोकाकडून विकेट्स पडत असताना आपली आक्रमक फलंदाजी कायम ठेवली. रचिन रवींद्र व डेव्हॉन कॉन्वे यांच्यामुळे ब्रुकला दोन वेळा जीवदान मिळालं. ब्रुकने १० चौकारांच्या मदतीने ५६ धावांची खेळी केली. ब्रुक बाद झाल्यानंतर इंग्लंडचा डाव १४० धावांवर आटोपला. न्यूझीलंडच्या काईल जेमिसनने ६४ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. त्याने कारकिर्दीत सहाव्यांदा ५ विकेट्स घेण्याचा पराक्रम केला. तर नॅथन स्मिथने ३ विकेट्स घेतल्या.

१४० धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमनाचा आनंद साजरा करणाऱ्या इंग्लंडचा वेगवान गोलंदाज ऑली रॉबिन्सनने आपल्या पहिल्याच षटकात तीन बळी घेत किवींच्या आघाडीच्या फळीला उद्ध्वस्त केलं. रॉबिन्सनने सर्वप्रथम डेव्हॉन कॉन्वेला (१) पायचीत केलं. त्यानंतर त्याने अनुभवी फलंदाज केन विल्यमसनला (०) शॉर्ट लेगला झेलबाद केलं. पुढच्याच चेंडूवर त्याने रचिन रवींद्रला शून्यावर बाद करून न्यूझीलंडचं कंबरडं मोडलं.

त्यानंतरगसॲटकिन्सननेकर्णधार टॉम लॅथमला (३) बाद केलं आणि रॉबिन्सनने डॅरिल मिचेलला बाद करत चौथी विकेट पटकावली. जोश टंगने टॉम ब्लंडेलला बाद करून आपली ५०वी कसोटी विकेट पूर्ण केली. एके वेळी न्यूझीलंडची धावसंख्या २९ धावांवर ६ गडी बाद अशी होती, परंतु दिवसाचा खेळ संपेपर्यंत त्यांनी ६१ धावा केल्या होत्या. पण, किवी संघ अजूनही इंग्लंडपेक्षा ७९ धावांनी मागे आहे. दुसऱ्या दिवसाची सुरुवात ग्लेन फिलिप्स आणि नॅथन स्मिथ यांच्या फलंदाजीने होईल, जे अनुक्रमे ३१ आणि ६ धावांवर नाबाद खेळत आहेत.



### शॉन टेट यांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** शॉन टेट यांनी बांगलादेशच्या वेगवान गोलंदाजी प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला आहे. टेट यांनी कौटुंबिक कारणांचा हवाला देत परस्पर संमतीने राजीनामा दिला. टेट यांचा करार २०२७च्या विश्वचषकापर्यंत होता, जो त्यांनी मध्येच सोडला आहे.बांगलादेशला हा धक्का ९ जूनपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू होणाऱ्या घरच्या मालिकेपूर्वीच बसला आहे. या दौऱ्यावर ३ एकदिवसीय आणि ३ टी-२० सामने खेळले जातील. टेट यांच्या जाण्यानंतर बांगलादेशचे माजी वेगवान गोलंदाज तल्हा जुबैर यांना संघाचे नवे प्रशिक्षक बनवले जाऊ शकते.

# विराटच्या दुखापतीमुळे ऋतुराजला लॉटरी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टीम इंडिया विरुद्ध अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामना हा ६ जूनपासून खेळवण्यात येणार आहे. तर १३ जूनपासून एकदिवसीय मालिकेला सुरुवात होणार आहे. त्याआधीच टीम इंडियाचा अनुभवी फलंदाज विराट कोहली याला दुखापतीमुळे अफगाणिस्तान विरूद्धच्या एकदिवसीय मालिकेला मुकावं लागणार असल्याचं म्हटलं जात आहे.



भारतीय संघात विराट कोहली याच्या जागी ऋतुराज गायकवाड याचा समावेश केला जाऊ शकतो, असा दावा करण्यात आला आहे.

टीम इंडियात विराट कोहली याच्या जागी ऋतुराज गायकवाड याचा समावेश केला जाऊ शकतो. विराटला दुखापतीमुळे या मालिकेतून बाहेर रहावं लागणार आहे. इंडिया ए टीम काही दिवसांनी श्रीलंका दौऱ्यावर जाणार आहे. ऋतुराजचा काही दिवसांआधी श्रीलंका दौऱ्यासाठी इंडिया ए टीममध्ये रियान पराग याच्या जागी समावेश करण्यात आला होता.

ऋतुराजला उपकर्णधार म्हणून संधी देण्यात आली होती. मात्र आता ऋतुराज अफगाणिस्तान विरूद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघात असणार असा दावा केला जात आहे. त्यामुळे ऋतुराजच्या जागी इंडिया ए टीममध्ये कुणाला संधी मिळणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

विराटला हॅम्स्ट्रिंगचा त्रास असल्याची माहिती आहे. त्यामुळे ऋतुराजचं नाव विराटच्या जागेसाठी आघाडीवर आहे. ऋतुराजला संधी मिळाल्यास टीम इंडियाला दुहेरी फायदा होईल.एक म्हणजे फलंदाज मिळेल. दुसरा फायदा म्हणजे ओपनर म्हणून पर्याय मिळेल.दरम्यान ऋतुराजला विराटच्या जागी संधी मिळाल्यास इंडिया ए टीममधील १ स्थान रिक्त होईल. त्यामुळे त्या जागी रजत पाटीदार याला संधी मिळण्याची शक्यता आहे.

# सिंधू इंडोनेशिया ओपनमधून बाहेर

**। जकार्ता । वृत्तसंस्था ।**

भारताची स्टार शटलर पीव्ही सिंधू जकार्ता येथे सुरू असलेल्या इंडोनेशिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या राउंड ऑफ-१६ मधून बाहेर पडली. गुरुवारी तिला जागतिक क्रमवारीत नंबर-१ आणि ऑलिम्पिक चॅम्पियन एन से यंगने २१-१७, २१-१४ अशा फरकाने हरवून स्पर्धेतून बाहेर केले.यंगने सिंधूला सलग १०व्या सामन्यात हरवले आहे. दक्षिण कोरियाच्या यंगने सिंधूला गेल्या आठवड्यात सिंगापूर ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीतही हरवून स्पर्धेतून बाहेर काढले होते. सलग दुसऱ्या पराभवामुळे दक्षिण कोरियाच्या खेळाडूविरुद्ध सिंधूचा विक्रम आणखी खराब झाला आहे. सिंधूने आतापर्यंत एन से यंगला एकदाही हरवले नाही.



# एलिस पेरीचा युवा खेळाडूंना सल्ला

**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

जेव्हा १६ वर्षांची एक मुलगी २००७ मध्ये ऑस्ट्रेलियाची जर्सी घालून डार्विनमधील एका छोट्या मैदानावर आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यासाठी उतरली होती, तेव्हा कदाचित कुणी विचारही केला नसेल की तीच खेळाडू एक दिवस शतकातील सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू म्हणून निवडली जाईल.



जवळपास दोन दशकांनंतर एलिस पेरीच्या नावावर विक्रमांचा डोंगर आहे, पण तिच्यासाठी सर्वात मोठीउपलब्धीम्हणजेखेळासोबतचे ते नाते आहे, ज्याने तिला सतत पुढे जाण्याची प्रेरणा दिली. ३५ वर्षीय अष्टपैलू पेरी म्हणते की, तिच्या कारकिर्दीतील सर्वात सुंदर पैलू हा होता की, दरवर्षी काहीतरी नवीन शिकण्याची आणि स्वतःला अधिक चांगले बनवण्याची संधी मिळाली. क्रिकेट सतत बदलत राहिले. विशेषतः टी २० मध्ये नवीन शॉट्स आणि नवीन तंत्र शिकणे तिच्यासाठी आव्हान तसेच आनंदही होता. तिच्या मते, खेळात खरा आनंद तेव्हा मिळतो, जेव्हा तुम्ही तुमच्या मर्यादा ओळखून त्यांना पुढे नेण्याचा प्रयत्न करता.

इंग्लंडविरुद्धचे ॲशेस कसोटी सामने देखील पेरीच्या आठवणींचा महत्त्वाचा भाग आहेत. विशेषतः २०१७ मध्ये नॉर्थ सिडनी ओव्हलवर केलेले द्विशतक. ती म्हणते की, त्या खेळीतील सर्वात मोठा आनंद हा होता की तिचे वडील स्टँडमध्ये बसून ते पाहत होते. क्रिकेट शिकवण्यापासून ते प्रत्येक सामन्यापूर्वी बोलण्यापर्यंत, तिचे वडील आजही तिची सर्वात मोठी ताकद आहेत. पेरी आपल्या यशाचे सर्वात मोठे श्रेय कुटुंबाला देते. तिच्यासाठी आई प्रेरणा आहे, वडील मार्गदर्शक आणि मोठा भाऊ सर्वात चांगला मित्र आहे.

नवीन पिढीतील खेळाडूंना सल्ला देताना पेरी म्हणते की, फक्त एका खेळापुरते मर्यादित राहू नका. जेवढे जास्त खेळ खेळाल आणि जेवढे जास्त अनुभव मिळवाल, तेवढे चांगले खेळाडू आणि माणूस बनाल. तिच्या मते, खेळाचा खरा उद्देश आनंद आहे. जर मजा संपली, तर खेळाचा सर्वात सुंदर भाग देखील हरवून जाईल.

# फॉर्ममधल्या खेळाडूंना संधी मिळाली पाहिजे

## दिलीप वेंगसरकर यांचे प्रतिपादन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सिलेक्टरला व्हिजन हवे. योग्य गुणवत्तावान खेळाडू ओळखण्याची नजर हवी. असा निवड समिती सदस्य आणि संघाचा कप्तान व संघाचा प्रशिक्षक जेव्हा एकाच 'वेव्हलेन्थ' वर (विचारधारेवर) असतात त्यावेळी संघ जिंकतो, असे प्रतिपादन भारताचे माजी कसोटी कर्णधार तथा निवड समितीचे माजी अध्यक्ष दिलीप वेंगसरकर यांनी केले. वेंगसरकर यांचे शालेय क्रिकेटमधील सहकारी संजय साटम यांनी लिहिलेला ''ए लेजंड्स वुईथ डिफरन्स'' या दिलीप वेंगसरकर यांच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणाऱ्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.




आपला मुद्दा अधिक विस्तृतपणे मांडताना वेंगसरकर म्हणाले की, मी जेव्हा सर्वप्रथम निवड समिती समितीचा अध्यक्ष झालो, त्यावेळी भारतीय संघ जागतिक क्रिकेटमध्ये पाचव्या क्रमांकावर होता. मात्र, त्यावेळी आम्हा सर्व निवड समिती सदस्यांमध्ये 'एकवाक्यता' होती. संघाचा कर्णधार व प्रशिक्षक व निवड समिती एकाच 'वेव्हलेन्थ'वर होतो. त्यामुळे मी निवृत्त होताना भारतीय संघ तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये अव्वल स्थानावर पोहोचला होता. निवड समिती कशी असावी यावर भाष्य करताना वेंगसरकर म्हणाले की, खेळाडू ज्यावेळी फॉर्ममध्ये आणि फिटनेस राखून असतो, त्यावेळेस त्याला संधी मिळाली पाहिजे. तरचतो आपल्या गुणवत्तेला न्याय देऊ शकतो. गेली दोन वर्ष उत्तम कामगिरी करणाऱ्या जम्मू-काश्मीरच्या नवी या मध्यमवती गोलंदाजाबाबत बोलताना रणजी करंडक जिंकूनहीं या संघात सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूला जर संधी मिळत नसेल तर ते अयोग्य आहे, असे ते पुढे म्हणाले.

त्यांनी आपला मुद्दा ठामपणे मांडताना सांगितलं की, ''ना पहिले, ना बाद में, तुरंत! क्रिकेट प्रशासन व्यवस्थेत जर क्रिकेटपटू असेल, तर तो क्रिकेट संदर्भातील निर्णय, योग्य आणि परिणामकारकरित्या, घेऊ शकतो. कसोटी क्रिकेट एकदिवसीय क्रिकेट आणि टी-२० क्रिकेट हे क्रिकेटचे तिन्ही प्रकार महत्त्वाचे आहेत. मात्र, कसोटी क्रिकेट हे सर्वाधिक महत्त्वाचे आहे. कसोटी क्रिकेट जर चांगले असेल, तर तुम्ही इतर प्रकारच्या क्रिकेटमध्ये देखील चांगली कामगिरी करू शकता. सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये तुमच्या संघाकडे राखीव फळी देखील तेवढीच सक्षम असू शकते, जी गोष्ट भारताच्या कसोटी क्रिकेटच्या बाबतीत सध्या घडत नाही. त्यामुळे आपण भारतामध्ये देखील आता कसोटी मालिका गमावायला लागलो आहोत.

भारतीय संघाने कसोटी मालिका गमावली ती फिरकी गोलंदाजीचा सामना न करता आल्यामुळे. याबाबत आपले मत मांडताना वेंगसरकर म्हणाले की, भारतीय फलंदाज, वेगवान गोलंदाजी सध्या उत्तम खेळत आहेत. मात्र, स्थानिक क्रिकेटमध्ये, प्रमुख खेळाडू कमी खेळत असल्यामुळे, त्यांना खराब खेळपट्टीवर आणि चांगल्या फिरकी गोलंदाजांचा सामना करण्याची जास्त संधी मिळत नाही. त्यांचा सराव देखील त्यानुसार होत नाही. त्यामुळे परदेशी संघ भारतात येताना उत्तम फिरकी गोलंदाज घेऊन येतात आणि आपल्याविरुद्ध कसोटी मालिका जिंकत आहेत.

दरम्यान, पुस्तक प्रकाशन समारंभ प्रसंगी वेंसरकर यांचे भारतीय संघातील सहकारी बलविंदर सिंग संधू, कर्सन घावरी, राजू कुलकर्णी, चंद्रकांत पंडित, संजय मांजरेकर यांनी वेंगसरकर क्रिकेट मधील विविध वैशिष्ट्य सांगितली.

**फिफा वर्ल्डकप स्पर्धा | स्पर्धेचं यंदाचं २३वं पर्व**

# पाच मोठे संघ स्पर्धेतून आऊट

**। कॅनडा । वृत्तसंस्था ।**

फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला १२ जूनपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेचं यजमानपद अमेरिका, मॅक्सिको आणि कॅनडा या देशांकडे आहे. यंदा स्पर्धेत भाग घेणाऱ्या संघांची संख्या ३२ वरून ४८ झाली आहे. त्यामुळे जेतेपदाच्या शर्यतीत यंदा ४८ संघ असणार आहेत. त्यामुळे यंदा हा वर्ल्डकप खास असणार आहे. पण या ४८ संघात चार वेळा जेतेपद मिळवणारा इटली संघ नाही. त्यासोबत अजून चार संघही या स्पर्धेसाठी पात्र ठरू शकलेले नाहीत. त्यामुळे फुटबॉलप्रेमींना आश्चर्याचा धक्का बसला आहे. इटलीसोबत नायजेरिया, डेनमार्क, पोलँड आणि युक्रेन या देशाचे संघ स्पर्धेसाठी पात्र ठरू शकलेले नाहीत. इटली या स्पर्धेत पात्र ठरू न शकल्याने सर्वात जास्त आश्चर्य वाटत आहे. कारण इटलीने चार वेळा जेतेपदाला गवसणी घातली आहे.

इटली स्पर्धेसाठी अपात्र ठरला, कारण की इटलीने १९३४ मध्ये पहिल्यांदा फिफा वर्ल्डकप जेतेपद मिळवलं होतं. त्यानंतर १९३८ मध्ये जेतेपद राखण्यात यश मिळवलं होतं. म्हणजेच सलग दुसऱ्यांदा जेतेपद मिळवलं होतं. त्यानंतर १९८२ मध्ये तिसऱ्यांदा चॅम्पियन ठरला. तर २००६ मध्ये चौथ्यांदा जेतेपदाचा चौथा गोल मारला होता. त्यानंतर जेतेपदासाठी संघर्ष करताना दिसला. इतकंच काय तर सलग तिसऱ्या वर्ल्डकप स्पर्धेसाठी पात्र ठरू शकलेला नाही. २०१८ मध्ये रशियात, २०२२ मध्ये कतार आणि २०२६ मध्येही पात्र ठरू शकला नाही. २०२६ च्या पात्रता फेरीत पेनल्टी शूटआऊटमध्ये बोस्निया आणि हर्झे गोविनाकडून पराभव झाल्यामुळे फिफा विश्वचषकासाठी पात्र ठरू शकला नाही. फिफा जागतिक क्रमवारीत इटलीचा संघ १२व्या स्थानी आहे.



इटलीप्रमाणे डेन्मार्कची स्थितीही तशीच आहे. पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव झाला आणि वर्ल्डकप स्पर्धेला मुकला. फिफा जागतिक क्रमवारीत डेन्मार्क संघ २०व्या स्थानी आहे. मागील फिफा विश्वचषकात एक अनपेक्षित दावेदार मानले जात होता. पण यंदा पात्र ठरू शकला नाही. फिफा क्रमवारीत २६ व्या स्थानावर असलेला नायजेरिया देश यावर्षी फिफा वर्ल्डकप स्पर्धेत पात्र ठरला नाही. ३२व्या क्रमांकावर असलेला युक्रेन संघ यंदाही पात्र ठरला नाही. पोलँडची स्थितीही तशीच आहे. मागच्या वर्षी स्पर्धेत खेळला आणि बाद फेरीपर्यंत पोहोचला होता. पण यंदा स्पर्धेतून आऊट झाला आहे.

# अंजली वेताळची सुवर्णझळाळी

**मुरगूड :** येथील लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय साई कुस्ती संकुलची पैलवान अंजली संतोष वेताळ हिने राष्ट्रीय पातळीवर दमदार कामगिरी करत आशियाई कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय संघात स्थान मिळविले आहे.



नवी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडिअमवरझालेल्या१५वर्षांखालील आशियाई अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत अंजलीने ६२ किलो वजनगटात सुवर्णपदक पटकावत ही उल्लेखनीय कामगिरी केली.अंजलीची थायलंड येथे होणाऱ्या आशियाई कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड निश्चित झाली असून, ती आता आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. विशेष म्हणजे, स्पर्धेपूर्वी अंजलीला गंभीर दुखापतीचा सामना करावा लागला होता. मात्र, जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या जोरावर तिने दुखापतीवर मात प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले.अंजलीच्या या यशामुळे मुरगुडसह जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिच्या या कामगिरीबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)